CMYK

सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | बुधवार, दि. २२ एप्रिल २०२६ | वर्ष – ४ थे | अंक ९ | पाने : ८ | किंमत रु. ६/– | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# सावधान.! १८७७ पेक्षाही शक्तिशाली अल नीनो ची पुनरावृत्ती होणार ?

## प्रचंड उष्म्याने तब्बल ४ टक्के लोकसंख्येची झाली होती वाफ !

**वृत्तसंस्था**

नवी दिल्ली : जगात १८७७ नंतरचा सर्वात शक्तीशाली अल नीनो तयार होत आहे. त्यावेळी संपूर्ण जगात उष्णतेची लाट आली होती. अनेक ठिकाणी दुष्काळ, महामारी पसरली होती. यात पृथ्वीवरील जवळपास ४ टक्के लोकसंख्या कमी झाली होती. आता शास्त्रज्ञांनी २०२६ – २७ मध्ये याची पुनरावृत्ती होण्याची शक्यता वर्तवली आहे.अल नीनो ही एक नैसिर्गिक हवामानासंदर्भातील घटना असते. यात पॅसिफिक महासागरातील उष्णकंटीबंधीय भागातील पाणी असामान्य पद्धतीनं गरम होतं. सामान्य अल नीनो प्रत्येक २ ते ७ वर्षात येतात. मात्र यावेळी सुपर किंवा मेगा स्ताराचा अल नीनो तयार होत आहे. समुद्रातील उष्टतेची लाट पॉझिटिव्ह पॅसिफिक मेरिडियनल मोड आणि उष्ण दक्षिणी हवा ही त्याची कारणे आहेत.



बेन नॉल सारख्या हवामान शास्त्रज्ञांच्या म्हणण्यानुसार या उष्णतेच्या लाटा अल नीनोला अजूनच बळ देत आहेत. उष्णता आणि आद्रता वाढल्यामुळं पश्र्िचमेकडील देशांमध्ये उष्णता वाढली असून उष्णतेच्या लाटा वेगवान होऊ शकतात. गेल्या १४० वर्षात असा पॅटर्न तयार झाला नव्हता आता तो तयार होत आहे,असं शास्त्रज्ञांचे मत आहे. सध्याच्या घडीला पॅसिफिक महासागरात ८०४६ किलोमीटर लांब उष्णतेची लाट पसरली आहे. ही माईक्रोनेशियापासून सुरू होते ते कॅलिफोर्नियापर्यंत पोहचत आहे. कॅलिफोर्नियाच्या जवळ याला ब्लॉब असं म्हटलं गेलं आहे. इथं समुद्राच्या पृष्ठभागाचे तापमान रेकॉर्ड स्तरावर पोहचलं आहे. छज–– च्या अहवालानुसार ही लाट ज्या स्तरावर तयार होत आहे ती महाकाय आहे. ही लाट अल नीनोला वेगानं बळ देत आहे. त्यामुळं याचा परिणाम समुद्रातील जीवांवर पडत आहे. हवामानाचा पॅटर्न पूर्णपणे बदलत आहे. वैज्ञानिकांच्या म्हणण्यानुसार ही उष्णतेची लाट अल नीनोला अजून वाढवू शकते. त्यामुळं संपूर्ण वर्षभर हवामान अनियमीत राहू शकते.

## शेअर बाजारात उसळी

नवी दिल्ली :अमेरिका इराण युद्धामुळे शेअर बाजारात मोठ्या घडामोडी घडत होत्या. गुंतवणूकदार यामुळे चांगलेच धास्तावाले होते. त्यामुळे शेअर बाजारात देखील मोठी पडझड पहायला मिळत होती. हे युद्ध लवकरात लवकर थांबावे अशी आशा सर्वानाच होती पण कधी अमेरिकेतून तर कधी इराणमधून निराशा समोर येत होती. असे असले तरी सध्या युद्ध काही दिवसांसाठी बंद आहे. अशातच अमेरिकेतून अशी काही गुडन्यूज समोर आली आहे आहे की शेअर बाजारात मोठी उसळी दिसून आली. विशेष म्हणजे आखाती देशातील युद्धाची धग कायम असतानाही शेअर बाजाराने मोठी उसळी मारली आहे.

## मणिपुरमध्ये भूकंप

**इंफाळ : मणिपुरच्या अनेक भागांमध्ये आज म्हणजेच मंगळवार २१ एप्रिल रोजी पहाटे भूकंपाचे जोरदार धक्के जाणवले. रिश्टर स्केलवर या भूकंपाची तीव्रता ५.२ इतकी नोंदवण्यात आली असून, त्याचे केंद्र कामजोंग जिल्ह्यात होते.नॅशनल सेंटर फॉर सिस्मोलॉजीच्या माहितीनुसार, हा भूकंप सकाळी ५.५९ वाजता झाला. धक्के जाणवताच कामजोंग आणि आसपासच्या भागातील नागरिकांमध्ये घबराट पसरली आणि अनेकजण घाबरून घराबाहेर पडले.**

**भूकंपाचे केंद्र अक्षांश २४.७०३ उत्तर आणि रेखांश ९४.४१५ पूर्व येथे, सुमारे ६२ किलोमीटर खोलीवर असल्याचे सांगण्यात आले. या धक्क्यांचा परिणाम शेजारच्या नागालँड आणि आसाम राज्यांमध्येही जाणवला.**

## आठवण ’ ऑपरेशन सिंदूर ’ ची

**मुंबई : जम्मू–काश्मीरच्या पहलगाम येथे २२ एप्रिल २०२५ रोजी पाकिस्तानी दहशतवाद्यांनी २६ हिंदू पर्यटकांचे टार्गेट किलींग केले होते. या भ्याड हल्ल्याची उद्या म्हणजेच बुधवार २२ एप्रिल रोजी वर्षपूर्ती असून त्याच्या पूर्वसंध्येला भारतीय लष्कराने ट्विटरवर (एक्स) पोस्ट करत मर्यादा ओलांडू नका, भारत विसरत नाही असे सांगत ‘ऑपरेशन सिंदूर’ची आठवण करवून दिली आहे.यासंदर्भातील पोस्टमध्ये भारतीय सेनेने नमूद केले की, जेव्हा मानवतेच्या मर्यादा ओलांडल्या जातात, तेव्हा उत्तरही ठाम आणि निर्णायक असते. न्याय मिळाला आहे. भारत एकजूट आहे. यासोबतच एका ग्राफिकमध्ये काही मर्यादा कधीही ओलांडल्या जाऊ नयेत. भारत विसरत नाही, असा संदेश देण्यात आला.**

# अमेरिका–भारत व्यापार करारासाठी भारतीय शिष्टमंडळ या आठवड्यात वॉशिंग्टनला भेट देणार

**वृत्तसंस्था**

**नवी दिल्ली** : भारत आणि अमेरिका यांच्यातील द्विपक्षीय व्यापार करारासंदर्भातील प्रयत्न आता अंतिम आणि सर्वात महत्त्वाच्या टप्प्यात पोहोचले आहे. या कराराला अंतिम स्वरूप देण्यासाठी भारतीय प्रतिनिधीमंडळ या आठवड्यात वॉशिंग्टनला पोहोचत आहे. अमेरिकेचे राजदूत सर्जिओ गोर यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर याबाबत माहिती दिली आहे.

सर्जिओ गोर यांनी एका ट्विटद्वारे अधिकृत पुष्टी करत सांगितले की, भारतीय व्यापार प्रतिनिधीमंडळ या आठवड्यात वॉशिंग्टनला पोहोचत आहे. या महत्त्वाच्या दौऱ्याचा मुख्य उद्देश द्विपक्षीय व्यापार कराराला अंतिम स्वरूप देणे हा आहे. भारत– अमेरिका द्विपक्षीय व्यापार कराराशी संबंधित औपचारिकता पूर्ण करण्यासाठी विशेष भारतीय व्यापार प्रतिनिधीमंडळ याच आठवड्यात वॉशिंग्टन दौऱ्यावर जाणार आहे.



अमेरिकेचे राजदूत सर्जिओ गोर यांनी या दौऱ्याचे स्वागत करत, व्यापार कराराला अंतिम रूप देण्याच्या दिशेने हे मोठे पाऊल असल्याचे म्हटले आहे. या कराराच्या आर्थिक परिणामांवर भाष्य करताना अमेरिकन राजदूत म्हणाले की, हा आगामी करार भारत आणि अमेरिका या दोन्ही देशांसाठी ‘विन–विन’ म्हणजेच फायदेशीर ठरणार आहे.अमेरिकन राजदूतांच्या विधानामुळे ट्रम्प प्रशासन हा द्विपक्षीय करार दोन्ही देशांसाठी परस्पर लाभदायक मानत असल्याचे स्पष्ट झाले आहे. आता उद्योगजगताचे लक्ष या आठवड्यात वॉशिंग्टनमध्ये होणाऱ्या महत्त्वाच्या बैठका आणि करारावर अंतिम शिक्का कधी बसतो याकडे लागले आहे.

## गुजरातेत लग्नातीलअन्नातून विषबाधा

गांधीनगर : गुजरातमध्ये अन्नातून विषबाधा होण्याच्या प्रकरणांमध्ये मोठी वाढ होताना दिसत आहे. ताजी घटना दाहोद जिल्ह्यातील अभलोड गावात घडली असून, येथे एका लग्न समारंभात जेवण केल्यानंतर ४०० हून अधिक जणांची प्रकृती बिघडली. यापैकी अनेकांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.गेल्या काही आठवड्यांत राज्यात अशा अनेक घटना समोर आल्याने चिंतेचे वातावरण पसरले आहे.’पीटीआय’ने दिलेल्या वृत्तानुसार, दाहोद जिल्ह्यातील अभलोड गावात विवाहाचे आयोजन करण्यात आले होते. जेवणाच्या कार्यक्रमानंतर अचानक आरोग्य आणीबाणीसारखी परिस्थिती निर्माण झाली. संशयित विषबाधेमुळे ४०० हून अधिक पाहुणे आजारी पडले. बाधितांना तातडीने रुग्णालयात हलवण्यात आले असून आरोग्य विभागाने या प्रकरणाच्या चौकशीचे आदेश दिले आहेत. नेमक्या कोणत्या पदार्थामुळे ही विषबाधा झाली, याचे कारण अद्याप अस्पष्ट आहे. दाहोद हा पूर्व गुजरातमधील आदिवासी बहुल जिल्हा असून, येथे यापूर्वीही अन्न सुरक्षेशी संबंधित अशा घटना घडल्या आहेत.अहमदाबादमधील मेमनगर येथील एका मुलींच्या वसतिगृहात ५ एप्रिल रोजी विषबाधेचा प्रकार समोर आला होता . पटेल समाजाद्वारे संचालित या वसतिगृहातील सुमारे ५७ विद्यार्थिनींना जुलाब, मळमळ आणि उलट्यांचा त्रास सुरू झाल्याने रुग्णालयात नेण्यात आले. २४ तासांच्या आत रुग्णालयात दाखल विद्यार्थिनींची संख्या ३८ वर पोहोचली, उपचार सुरू आहेत.

# नवी मुंबई–पनवेलमध्ये अवकाळी पावसाची हजेरी

तभा वृत्तसेवा

नवी मुंबई : गेल्या काही दिवसांपासून तीव्र उकाड्याने हैराण झालेल्या नवी मुंबई आणि पनवेल परिसरातील नागरिकांना आज सकाळी अचानक आलेल्या अवकाळी पावसाने मोठा दिलासा मिळाला. दमट हवामानामुळे पावसाची शक्यता वर्तवली जात असतानाच सकाळी सुमारे आठ वाजण्याच्या सुमारास पनवेलसह नवी मुंबईत पावसाने जोरदार हजेरी लावली. ढगांचा गडगडाट आणि विजांच्या कडकडाटासह आलेल्या या पावसामुळे कामासाठी घराबाहेर पडलेल्या नागरिकांची चांगलीच तारांबळ उडाली. रेल्वे स्थानके, मुख्य रस्ते, बाजारपेठा आणि चौकांमध्ये अचानक गोंधळाचे वातावरण निर्माण झाले.दुचाकीस्वारांना या पावसाचा सर्वाधिक फटका बसला असून अनेकांनी झाडांच्या आडोशाला किंवा बसथांब्यांवर आसरा घेतला. काही ठिकाणी वाहतुकीवरही तात्पुरता परिणाम झाला. तरीही या सरींसोबत आलेल्या गार वाऱ्यामुळे वातावरणात सुखद गारवा निर्माण झाला आणि उकाड्याने त्रस्त झालेल्या नागरिकांनी या पावसाचा मनमुराद आनंद घेतला. लहान मुलांनी तर पावसात भिजत खेळण्याचा आनंद लुटला. मात्र कार्यालयात जाणारे कर्मचारी, शाळकरी विद्यार्थी आणि प्रवासी वर्ग यांना पावसामुळे भिजतच प्रवास करावा लागला.दरम्यान, हवामान खात्याने आधीच उकाड्यासोबतच काही भागांत पावसाची शक्यता व्यक्त केली होती. बदलत्या हवामानामुळे पुढील दोन ते तीन दिवस अशाच हलक्या सरी पडण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. आजचा पाऊस हा केवळ हवामानातील बदल नसून उकाड्याने हैराण झालेल्या नागरिकांसाठी दिलासादायक ठरला आहे.



## खा. पप्पू यादवचे महिलांबाबत वादग्रस्त विधान

पाटणा : राजकीय नेते आणि वादग्रस्त विधान हे समीकरण पक्के आहे. वादग्रस्त विधानांसाठी तर देशातील उत्तर पट्ट्यातील नेत्यांमध्ये तर स्पर्धाच सुरू असते. आता राजकारणात सक्रिय असणाऱ्या महिलांविषयी अत्यंत खालच्या पातळीवर विधान बिहारमधील पूर्णियाचे अपक्ष खासदार पप्पू यादव यांनी केले आहे. पाटणा : राजकीय नेते आणि वादग्रस्त विधान हे समीकरण पक्के आहे. वादग्रस्त विधानांसाठी तर देशातील उत्तर पट्ट्यातील नेत्यांमध्ये तर स्पर्धाच सुरू असते. आता राजकारणात सक्रिय असणाऱ्या महिलांविषयी अत्यंत खालच्या पातळीवर विधान बिहारमधील पूर्णियाचे अपक्ष खासदार पप्पू यादव यांनी केले आहे. कौटुंबिक हिंसाचार कोण करत आहे? महिलांवर कोणाची नजर आहे?

# अमेरिका-इराण अखेर दुसऱ्या चर्चेसाठी राजी

## युद्धविराम संपण्याच्या काही तास आधी होणार करार ?

**वृत्तसंस्था**

**वॉशिंग्टन डी सी :** पाकिस्तानमध्ये होणार्या शांतता चर्चेसाठी अखेर अमेरिका आणि इराण या दोन्ही देशांनी आपली सहमती दर्शविली आहे. ही बोलणी होतात की नाही, याविषयी उलटसुलट संकेत दिले जात होते. मात्र सोमवारी ही संदिग्धता दूर झाली.या चर्चेसाठी अमेरिकेचे उपाध्यक्ष जे. डी. व्हान्स मंगळवारी वॉशिंग्टनहून इस्लामाबादकडे रवाना होण्याची अपेक्षा आहे. दोन इराणी अधिकार्यांनीही त्यांच्या देशाच्या सहभागाबाबत होकार दिला. चर्चेत व्हान्स सहभागी झाल्यास मागील चर्चेच्या फेरीत सहभागी झालेले प्रभावशाली राजकीय आणि लष्करी नेते मोहम्मद बाघेर घालिबाफ हे उपस्थित राहणार आहेत. दोन्ही देशांनी एकमेकांना धमक्या दिल्यानंतर चर्चेची शक्यता अधिकाधिक धूसर होत गेली होती. त्यातच युद्धविराम मुदत संपायला अवघ्या काही तासांचा अवधी उरल्याने तणाव वाढला होता. पण आता युद्धविराम संपण्याच्या काही तास आधीच करार होण्याची शक्यता आहे.अमेरिकेने युद्धविराम सात एप्रिल रोजी जाहीर केला. तो नेमका किती वाजता संपेल हे जाहीर केले नाही. मात्र, पाकिस्तानी सूत्रांनी सांगितले की, बुधवारी पहाटे साडेतीन वाजता ही वेळ संपेल. अमेरिकेने होर्मुझजवळ एका इराणी मालवाहू जहाजाचा ताबा घेतल्याबद्दल इराणने प्रत्युत्तराच्या धमक्या अधिक तीव्र केल्या आणि त्याला ‘समुद्री दरोडा’ असे म्हटले. हे परस्परविरोधी संकेत पहिल्या चर्चे पूर्वी इराणने दिलेल्या संकेतांसारखेच होते. त्या पहिल्या फेरीचा शेवट युद्ध समाप्त करण्याच्या कराराविना झाला होता. इराणने त्या चर्चा होणार की नाही याबाबत शंका व्यक्त केली होती. पण काही तासांनी त्यांचे शिष्टमंडळ तेथे पोहोचले होते.होर्मुझ सामुद्रधुनीत दोन्ही देशांच्या नाकेबंदीमुळे जागतिक तेल पुरवठ्यावर मोठा परिणाम झाला आहे. जगातील सुमारे २० टक्के तेल आणि गॅस वाहतूक या मार्गाने होते. या तणावामुळे तेलाच्या किमतीत सहा टक्केपेक्षा अधिक वाढ झाली असून, शेअर बाजारातही अस्थिरता दिसून आली आहे; तर युरोपीय शेअर बाजार घसरले.

## चिमुकलीचा मृत्यू

नाशिक : नाशिकमध्ये कचरा टाकण्यासाठी आईसोबत गेलेल्या १३ महिन्यांच्या आराध्या मामुलकर हिच्यावर बिल्डिंगचे गेट कोसळून तिचा मृत्यू झाला. गंभीर जखमी अवस्थेत तिला जिल्हा रुग्णालयात नेण्यात आले, मात्र उपचारापूर्वीच तिचा मृत्यू झाला. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होत असून, गंगापूर पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

## नवदांपत्याचा मृत्यू

सातारा : सातारा जिल्ह्यातील पाटण तालुक्यात येरफळे येथे पिकअप आणि दुचाकीची भीषण धडक होऊन नवदाम्पत्याचा मृत्यू झाला. राजू झोरे (२५) जागीच ठार झाला, तर गंभीर जखमी राणी झोरे (२३) हिने उपचारासाठी नेत असताना वाटेत प्राण सोडले. अवघ्या दहा दिवसांपूर्वीच विवाह झालेल्या या दाम्पत्यावर नातेवाईकाच्या लग्नाला जाताना काळाने झडप घातल्याने परिसरात शोककळा पसरली आहे.

# देवस्थान इनाम जमिनींबाबत येत्या अधिवेशनात कायदा : महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

मुंबई : देवस्थान इनाम जमिनींचा प्रलंबित प्रश्र्न मार्गी लावण्यासाठी राज्य सरकार विधिमंडळाच्या येणाऱ्या अधिवेशनात कायदा करणार आहे. याबवतची तयारी सुरू झाली असून, नागरिकांनी आपल्या हरकती व सूचना नोंदविण्यासाठी कायद्याचा मसुदा लवकरच संकेतस्थळावर प्रसिद्ध केला जाईल, असे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मंगळवारी सांगितले.रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण तालुक्यातील ऐतिहासिक पेढे परशुराम देवस्थानच्या इनामी जमिनींचा प्रलंबित प्रश्र्न मार्गी लावण्यासंदर्भात महसूलमंत्र्याच्या दालनात झालेल्या बैठकीत त्यांनी ही माहिती दिली. बैठकीला आमदार शेखर निकम, रत्नागिरीचे जिल्हाधिकारी मनुज जिंदाल आणि महसूल विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.देवस्थान जमिनींबाबत कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी सरकार सकारात्मक आहे. नवीन कायद्याची प्रक्रिया राबवताना लोकभावना आणि तांत्रिक बाबींचा विचार केला जाणार आहे. सर्वसामान्य नागरिकांना आणि संबंधित पक्षकारांना आपली मते मांडता यावीत, यासाठी ही माहिती ऑनलाइन उपलब्ध करून दिली जाणार असल्याचे मंत्र्यांनी स्पष्ट केले. कोकणातील फळबागायतदारांसाठीही या बैठकीत एक दिलासादायक निर्णय घेण्यात आला. फळबागांचे पीकपाणी नोंद दरवर्षी करण्याऐवजी ते दर तीन वर्षांनी करण्यात यावी, यासाठी जमाबंदी विभाग व फलोत्पादन विभागाने संयुक्त प्रस्ताव सादर करावा, अशा सूचना महसूलमंत्र्यांनी दिल्या आहेत. यामुळे शेतकऱ्यांचा दरवर्षीचा प्रशासकीय त्रास कमी होण्याची शक्यता आहे.जिल्ह्यातील रोपवाटिका चालकांसाठी माती उपलब्ध करून देताना त्यावर कोणतीही रॉयल्टी आकारली जाऊ नये, असा प्रस्ताव सादर करण्याचे आदेश महसूलमंत्र्यांनी रत्नागिरी जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत. या निर्णयामुळे जिल्ह्यातील फळबाग लागवडीला आणि रोपवाटिका व्यवसायाला मोठी चालना मिळण्याची चिन्हे आहेत.



# मी येऊ शकत नाही, पण तुम्ही सुनेत्रा पवारांना विजयी करा!

## शरद पवारांचं बारामतीकरांना भावनिक आवाहन

तभा वृत्तसेवा

मुंबई : बारामती विधानसभा पोटनिवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना विजयी करण्याचं आवाहन शरद पवारांनी केलं आहे. अजित पवार यांच्या अकाली निधनामुळे बारामतीत पोटनिवडणूक होत आहे.

या निवडणुकीत कोणत्याही प्रमुख पक्षानं सुनेत्रा पवार यांच्या विरोधात उमेदवार दिलेला नाही. प्रकृती अस्वास्थामुळे राष्ट्रवादी काँग्रेस शपचे अध्यक्ष शरद पवार यांना बारामतीच्या पोटनिवडणुकीत मतदान करता येणार नाही. त्या पार्श्र्वभूमीवर शरद पवारांनी बारामतीकरांसाठी भावनिक पोस्ट केली आहे. सुनेत्रा पवारांना भरभरुन मतदान करण्याचं आवाहन शरद पवारांनी बारामतीकरांना केलं आहे. मी १९६७ मध्ये लढविलेल्या पहिल्या निवडणुकीपासून बारामती मतदारसंघातील माझ्या मतदानाचा हक्क अखंडपणे बजावला. आता २०२६ मध्ये बारामती विधानसभा मतदारसंघात महाराष्ट्राचे एक लाडके व लोकप्रिय नेते स्व. अजित पवार यांच्या दुर्दैवी, अपघाती निधनाच्या शोकात्म पार्श्र्वभूमीवर ही पोटनिवडणुक होत आहे. या पोटनिवडणुकीसाठी बारामती येथे येऊन आतापर्यंतच्या प्रघातानुसार मतदान करण्याचे मी ठरवले होते. दुर्दैवाने माझी प्रकृती बिघडल्याने मला मुंबईत रुग्णालयात दाखल व्हावे लागले. डॉक्टरांनी मला उपचार आणि सक्तीची विश्रांती या कारणास्तव मुंबईबाहेर जाण्यास मनाई केली आहे.

त्यामुळे अत्यंत नाईलाजास्तव मतदानाचा हक्क बजावण्यापासून मला वंचित रहावे लागत आहे, हे मी अत्यंत व्यथित आणि खेदपूर्ण अंत:करणाने सांगू इच्छितो. माझ्यावर अथक प्रेम व विश्र्वास असलेले बारामतीचे नागरिक, मतदार व कार्यकर्ते मला समजुन घेतील याची मी खात्री बाळगतो.आमच्या पक्षाने (राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष – शरदचंद्र पवार) या पोटनिवडणुकीत श्रीमती सुनेत्रा अजित पवार यांना पाठिंबा जाहिर केला आहे.

CMYK

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## –स्मार्ट कार्ड नसले तरी एसटी प्रवासाची सवलत पूर्वीप्रमाणेच सुरूलातूर विभाग नियंत्रकांचे अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २१ :राज्य परिवहन महामंडळाच्या एनसीएमसीस्मार्ट कार्ड प्रवास योजनेअंतर्गत ज्या पात्र लाभार्थ्यांनी अद्याप नोंदणी केलेली नाही,अशा सर्व प्रवाशांना सवलतीचा प्रवास पूर्वीप्रमाणेच सुरू राहणार असल्याचे स्पष्टीकरण लातूर विभागाचे विभाग नियंत्रक विलास राठोड यांनी दिले आहे.महामंडळामार्फत ६५ ते ७५ वर्षांपर्यंतचे ज्येष्ठ नागरिक,७५ वर्षांवरील अमृत ज्येष्ठ नागरिक,दिव्यांग आणि महिला प्रवाशांसह इतर विविध घटकांना सवलती दिल्या जातात आणि मोठ्या प्रमाणात प्रवासी या योजनांचा लाभ घेत आहेत. मात्र,स्मार्ट कार्ड उपलब्ध नसल्यास सवलत मिळणार नाही अशी चुकीची अफवा काही ठिकाणी पसरली आहे. या पार्श्र्वभूमीवर,ज्यांच्याकडे सध्या स्मार्ट कार्ड नाही अशा पात्र लाभार्थ्यांना नियमानुसार सवलतीचा लाभ दिला जात असून तो यापुढेही सुरूच राहील,असे विभागाने स्पष्ट केले आहे. स्मार्ट कार्ड नोंदणीची कार्यप्रणाली सध्या राबविली जात असून पात्र प्रवाशांनी अधिकृत संस्थेद्वारे लवकरात लवकर आपले कार्ड काढून घ्यावे आणि कोणत्याही अफवांवर विश्र्वास ठेवू नये,असे आवाहनही राठोड यांनी केले आहे.



## विविध वृत्त...

### विद्यार्थी सहायक मंडळाच्या अध्यक्षपदी डॉ. नागोराव कुंभार

तभा वृत्तसेवा

**लातूर, दि. २१ एप्रिल :** लातूर येथील विद्यार्थी सहाय्यक मंडळाचे अध्यक्ष डॉ. जनार्दन वाघमारे यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या अध्यक्षपदी ज्येष्ठ विचारवंत डॉ. नागोराव कुंभार यांची तर कार्याध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिक प्रा. फ. ग. शहाजिंदे यांची बिनविरोध एकमताने निवड करण्यात आली. विद्यार्थी सहाय्यक मंडळाची शिवनगर येथील डॉ. नागोराव कुंभार यांच्या आई निवासस्थानी वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. यावेळी विद्यार्थी सहाय्यक मंडळाची २०२६ ते २०३१ या पाच वर्षांसाठी कार्यकारिणी निवडण्यात आली. बात अध्यक्ष डॉ. नागोराव कुंभार, कार्याध्यक्ष प्रा.फ.म.शहाजिंदे, सचिव डॉ. नागनाथ मोटे, कोषाध्यक्ष प्रा. बी.एस. पळसकर, उपाध्यक्ष डॉ. कुसुमताई गोरे, विक्रम कदम, डॉ. मन्मथ भातांब्रे, पांडुरंग अडसुळे, प्रा. डॉ. सुनीता गिरवलकर, प्रा. सुधीर साळुंके, प्रा. ओमप्रकाश होळीकर, प्रा. सूचेता वाघमारे, ॲड. इरफान शेख यांची एकमताने निवड करण्यात आली.

### लग्नाचे आमिष दाखवून विद्यार्थिनीवर अत्याचार

तभा वृत्तसेवा

**लातूर, दि. २१ एप्रिल :** लग्नाचे आमिष दाखवून आरोपीने एका अल्पवयीन विद्यार्थिनीवर सलग एक वर्ष लॉजमध्ये नेऊन बलात्कार केल्याची घटना उघडकीस आली आहे.

आरोपी दीपक ज्ञानोबा जाधव (रा. राणी सावरगाव, ता. गंगाखेड, जि. परभणी) याने लातूर येथे शिक्षण घेणाऱ्या एका अल्पवयीन पीडित विद्यार्थिनीसोबत ओळख वाढविली. तिला लग्नाचे आमिष दाखवून तिच्यासोबत लातूरजवळील हॉलिडे इन लॉजवर नेऊन बलात्कार केला. नग्न फोटो नातेवाईकांना पाठवून देण्याची धमकी देत आरोपीने पीडितेसोबत दि.२० एप्रिल २०२५ ते २१ मार्च २०२६ या एक वर्षाच्या कालावधीत लॉजवर नेऊन बलात्कार केले. याप्रकरणी पीडितेच्या फिर्यादीवरून आरोपीविरूध्द एमआयडीसी पोलीस ठाण्यात पोक्सोचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### मातंग समाजाचात्या' कृतीला विरोधच

तभा वृत्तसेवा

**लातूर, दि. २१ एप्रिल :** आरक्षण उपवर्गीकरणाचा विरोध केलेल्या काँग्रेस नेते नाना पटोले यांच्या निषेधार्थ केलेल्या आंदोलनात काहींनी माजीमंत्री आ. अमित देशमुख यांच्या प्रतिमेला जोडे मारून त्यांचा अवमान केला. या कृतीला मातंग समाजाचा तीव्र विरोध आहे. काही कार्यकर्त्यांनी जाणीवपूर्वक आ. देशमुख यांची प्रतिमा मलिन करण्यासाठी केलेला हा स्टंट होता. या कृतीचा मातंग समाजाच्यावतीने सोमवारी अण्णाभाऊ साठे चौकात निषेध करण्यात आला. या आंदोलनात माजीमंत्री आ. अमित देशमुख यांचा कोणताही संबंध नसताना, काही कार्यकर्त्यांनी जाणीवपूर्वक चुकीचे आरोप करीत त्यांच्याविरोधात फोटो काढून घोषणाबाजी केली. ही कृती संपूर्ण मातंग समाजाची भूमिका नाही. एखाद्या लोकप्रतिनिधीची प्रतिमा मलिन करण्याच्या उद्देशाने करण्यात आलेले अत्यंत दुर्दैवी कृत्य आहे. या घटनेचा समाज बांधवांच्या वतीने निषेध करण्यात आला. अशा प्रकारच्या गैरजबाबदार कृतींना समाज कधीही पाठिंबा देणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले. यावेळी समाजातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. नगरसेवक विकास कांबळे, डॉ. शिवाजी जवळेकर, सुनील बसपुरे, माजी नगरसेवक जी. ए. गायकवाड, दिनेश कांबळे, ॲड. अंगद सूर्यवंशी, अंगद वाघमारे, ॲड. अंगद गायकवाड, पिराजी साठे, दत्ताभाऊ भुरे, काशिनाथ वाघमारे, काका कांबळे, संजय गव्हाणे, राजू गायकवाड, लक्ष्मण गव्हाणे, राम जाधव उपस्थित होते.

### चर्मकार महासंघातर्फे डॉ. सुनीता वाघमारे यांचा सत्कार

तभा वृत्तसेवा

**लातूर, दि. २१ एप्रिल :** येथील राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने निलंगा पंचायत समितीच्या नूतन सभापती डॉ. सुनिता संतोष वाघमारे यांचा सत्कार राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष – सी. के. मुरळीकर यांच्या हस्ते करण्यात आला.यावेळी बोलताना मुरळीकर म्हणाले, आपल्या पदाचा उपयोग करून सर्वसामान्यांच्या अडचणी दूर करण्याचे प्रयत्न करावेत आणि समाजाचा नावलौकिक वाढवावा. डॉ. सुनिता वाघमारे या आपल्या समाजातील पहिल्या महिला सभापती आहेत, याचा समाजाला सार्थ अभिमान आहे. यावेळी रवी कुरील व डॉ. वाघमारे यांनी मनोगत व्यक्त केले.

## माजी खासदार डॉ. गोपाळराव पाटील यांचे निधन

तभा वृत्तसेवा



**लातूर, दि. २१ एप्रिल :** येथील शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष, माजी खासदार डॉ. गोपाळराव पाटील यांचे मंगळवारी सकाळी वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्युसमयी त्यांचे वय ९५ वर्षे होते. डॉ. गोपाळराव पाटील एक अजातशत्रू व्यक्तिमत्वाचे धनी होते. त्यांच्या निधनाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शोक व्यक्त करुन निःस्पृह सेवावृत्ती काळाच्या पडद्याआड गेल्याची भावना व्यक्त केली आहे. अनेक नेत्यांनी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे.डॉ. गोपाळराव पाटील हे सन १९८५ पासून आजतागायत लातूरच्या शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष होते. चार दशकाहून अधिक काळ त्यांनी संस्थेची धुरा समर्थपणे सांभाळली. निस्पृह, प्रामाणिक, पारदर्शक कारभाराचा आदर्श त्यांनी घालून दिला. गुणवत्तेवर कर्मचारी भरती प्रक्रिया, प्रवेश प्रक्रिया राबविण्यासाठी त्यांनी पाठबळ दिले. त्यांच्या अथक परिश्रमाने आणि दिशादर्शक मार्गदर्शनामुळे संस्थेने नावलौकिक मिळविला. ते प्रख्यात बालरोग तज्ञ होते. त्याचबरोबर त्यांचा शिक्षण साहित्य, राजकारण, समाजकारण या विषयांमध्ये व्यासंग होता. शिक्षण, राजकारण, समाजकारण अशा विविध क्षेत्रात त्यांनी कार्य केले. लॉयन्स क्लबच्या माध्यमातूनहीत्यांनी उल्लेखनिय कार्य केले आहे. काँग्रेसचे दिवंगत ज्येष्ठ नेते शिवराज पाटील चाकूरकर यांना त्यांनी १९९८ च्या लोकसभा निवडणुकीत दिलेली कडवी लढत लातूरकर कधीच विसरू शकत नाहीत. या निवडणुकीत चाकूरकरांना३ लाख २२ हजार २६५ मते मिळाली होती तर त्यांचे प्रतिस्पर्धी असणाऱ्या डॉ. गोपाळराव पाटील यांना ३ लाख १८ हजार ९३८ मते मिळाली होती. त्या निवडणुकीत चाकूरकर केवळ ३ हजार ३२७ मतांनी विजयी झाले होते. निवडणुकीपुरतेरजकारणकरणाऱ्या नेत्यातडॉ. गोपाळराव पाटील यांचा क्रमांक अग्रभागी होता, हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही.

**शाळा महाविद्यालयांना सुट्टी...**

डॉ. गोपाळराव पाटील यांच्या निधनाची वार्ता कळल्यानंतर शिव छत्रपती शिक्षण संस्थेच्या अंतर्गत येणाऱ्या राजर्षी शाहू महाविद्यालयासह सर्व शाळांना मंगळवार दि. २१ एप्रिल २०२६ रोजी सुट्टी जाहीर करण्यात आली. संस्थेचे सचिव बी.बी. ठोंबरे उपाध्यक्ष डॉ. अजय जाधव, सहसचिव डॉ शिवाजीराव सूर्यवंशी, उद्धवराव पाटील यांनी शोकभावना व्यक्त करून संस्थांतर्गत आठ ८ दिवसांचा दुःखवटा जाहीर केला. शैक्षणिक व इतर सर्व कार्यक्रम स्थगित करण्यात आहेत. डॉ. गोपाळराव पाटील यांच्या त्यांच्या पश्र्चात पत्नी शांताबाई, मुलगा, सच्चिदानंद पाटील, सून स्नेहल पाटील, कन्या स्नेहलता देशमुख, डॉ. गीतांजली पाटील, तारका शिंदे, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे.माजीखासदार डॉ. गोपाळराव पाटील यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निःस्पृह सेवावृत्ती काळाच्या पडद्याआड गेल्याची भावना व्यक्त केली. त्यांच्या निधनाने राज्याच्या वैद्यकीय सेवा, शिक्षण क्षेत्र व सामाजिक क्षेत्राची अपरिमित हानी झाल्याचे मुख्यमंत्र्यांनी बोलून दाखविले आहे; पालकमंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी आपल्या भावना व्यक्त करताना लातूरच्या शैक्षणिक क्रांतीचा महामेरू हरपल्याची बोलून दाखवले. सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी डॉ. गोपाळराव पाटील यांच्या निधनाने सामाजिक व शैक्षणिक हानी झाल्याची भवन व्यक्त केली. माजी मंत्री दिलीपराव देशमुख,आ. रमेशप्पाकराड, आ. अमित देशमुख, आ. संभाजी पाटील निलंगेकर , आ. संजय बनसोडे, आ. विक्रम काळे यांसह अनेक मान्यवरांनी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

### प्राथमिक शाळांतील शिक्षकांचे समायोजन ३० एप्रिलला

तभा वृत्तसेवा

**लातूर, दि. २१ एप्रिल :** खाजगी आणि जिल्हा परिषद शाळांतील अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन ३० एप्रिलपर्यंत होईल, अशी माहिती जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागातून देण्यात आली.

अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन प्रथम तालुकास्तरावर व नंतर जिल्हास्तरावर अशा दोन टप्प्यांत होणार आहे. प्राथमिक शिक्षण विभाग प्रक्रिया पूर्ण करण्याची तयारी करीत असून, खाजगी शाळांतील सव्वादोनशे ते अडीचशे तर जिल्हा परिषद प्राथमिक शाळांतील सुमारे शंभरच्या आसपास अतिरिक्तांची संख्या आहे. माध्यमिक शिक्षण विभागाने गेल्या सात एप्रिल रोजीच अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन केले. आता प्राथमिक शिक्षण विभाग अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करणार असून, त्याची प्रक्रिया सध्या सुरू आहे. येत्या ३० एप्रिल २०२६ पर्यंत खाजगी व जिल्हा परिषद प्राथमिक शाळांतील अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन होईल. सध्या शिक्षकांत अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजनावरून बरीच चर्चा सुरू आहे. समायोजन करावे, अशी शिक्षकांची मागणी आहे.

## विहिरीत उडी घेऊन आईची २ चिमुकल्यांसह आत्महत्या

तभा वृत्तसेवा



**लातूर, दि. २१ एप्रिल :** औसा तालुक्यातील खरोसा येथे कौटुंबिक वादातून किरकोळ कारणावरून एका २२ वर्षीय विवाहितेने आपल्या २ चिमुकल्यांसह विहिरी उडी घेऊन आत्महत्या केल्याची हृदय घटना घडली.रविवारी रात्री मयत निकिता दीपक भुरे (२२, रा. खरोसा) हिने किरकोळ कौटुंबिक वादातून डोक्याला मनस्ताप करून टोकाचे पाऊल उचलले व आपले दोन चिमुकले १ मुलगा व १ मुलगी यांना सोबत घेऊन गावाजवळील विहिरीत उडी मारून आत्महत्या केली. कौटुंबिक वादातून विवाहितेने टोकाचे पाऊल उचलल्याने हळहळ व्यक्त केली जात आहे. फिर्यादी मनोज भरत भुरे यांनी दिलेल्या अर्जावरून किल्लारी पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली. तिच्या २ चिमुकल्याची नावे शिवानी आणि शिवांश अशी आहेत. विवाहितेने चिमुकल्यांसह आत्महत्या केल्याने दोन्ही चिमुकल्या बहीण–भावाचा दुर्दैवी मृत्यू झाला. प्राथमिक माहितीनुसार कौटुंबिक वादातून हे टोकाचे पाऊल उचलण्यात आल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. ही घटना खरोसा येथील घराच्या शेजारील विहिरीत घडली असल्याचे समोर आले. घटनेची माहिती मिळताच किल्लारी पोलिस घटनास्थळी दाखल झाले असून पंचनामा करण्याचे काम सुरू केले. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. विहिरीतून मृतांना बाहेर काढून लामजना येथील रुग्णालयात शवविच्छेदन करण्यात आले. अंन्त्यविधीसाठी नातेवाईकांना प्रेत देण्यात आले.

## न्या.बद्दर अहवालाचे प्रतिकात्मक सामुहिक दहन

तभा वृत्तसेवा

**लातूर, दि. २१ एप्रिल :** अनुसूचित जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाच्या विरोधात दि. २० एप्रिल रोजी सकाळी शहरातील महात्मा गांधी चौकात मोठ्या प्रमाणावर तीव्र आंदोलन करण्यात आले असून या आंदोलनाने जिल्ह्यातील सामाजिक व राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे. यावेळी न्या.बद्दर अहवालाचे प्रतिकात्मक सामुहिक दहन करून शासनाच्या भूमिकेचा जाहीर निषेध नोंदविण्यात आला.या आंदोलनाच्या पार्श्र्वभूमीवर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना जिल्हाधिकारीमार्फत सविस्तर निवेदन सादर करण्यात आले.या निवेदनात नमूद करण्यात आले की, न्या. बद्दर आयोगाचा अहवाल राज्यातील जनतेसमोर सादर न करता ऑनलाईन पद्धतीने हरकती मागविणे ही प्रक्रिया लोकशाही मूल्यांना धरून नसून पूर्णपणे बेकायदेशीर आहे. अहवालाचा संपूर्ण मजकूर,निष्कर्ष आणि शिफारसी सर्वसामान्य नागरिकांसाठी खुल्या केल्याशिवाय कोणतीही हरकत नोंदविणे शक्य नाही, त्यामुळे शासनाने प्रथम पारदर्शकता ठेवून अहवाल सार्वजनिक करावा, अशी ठाम भूमिका आंदोलनकर्त्यांनी मांडली. भिक्खू पथ्यानंद थेरो यांनी यावेळी मार्गदर्शन करताना सांगितले की, अनुसूचित जाती प्रवर्गातील कोणत्याही जाती समूहाचा अद्याप सर्वांगीण विकास झालेला नाही. शासनाने अनेक वर्षे आरक्षणाची पूर्ण अंमलबजावणी न करता केवळ धोरणात्मक घोषणा केल्या आहेत. राज्यात अनुसूचित जातींसाठी असलेले १३ टक्के आरक्षणही प्रत्यक्षात पूर्ण क्षमतेने लागू झालेले नाही. अशा परिस्थितीत उपवर्गीकरणाचा निर्णय घेणे हे वास्तवापासून दूर जाणारे असून समाजात फूट पाडणारे ठरू शकते. ते पुढे म्हणाले की, काही जाती समूहांना आरक्षणाचा अपेक्षित लाभमिळाला नसला तरी त्यासाठी त्या समाजघटकांना जबाबदार धरणे चुकीचे आहे. शिक्षणाचा अभाव, विशेषतः उच्च शिक्षणाच्या संधींची कमतरता, ही या समस्येची मुख्य कारणे आहेत. त्यामुळे शासनाने उपवर्गीकरणावर भर न देता शिक्षण, कौशल्यविकास आणि आर्थिक सक्षमीकरण यावर लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे. 'अ, ब, क, ड', असे उपवर्गीकरण केल्यानेही शिक्षण नसेल तर लाभ कोण घेणार? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. आंदोलनादरम्यान समितीच्या वतीने शासनाकडे पुढील प्रमुख मागण्या करण्यात आल्या न्या. बदर आयोग व त्याचा अहवाल तात्काळ रद्द करावा, अनुसूचित जातींची जातीनिहाय जनगणना करावी, क्रिमीलेयरची अट पूर्णपणे रद्द करावी, अ, ब, क, ड उपवर्गीकरणाची प्रक्रिया तात्काळ थांबवावी, तसेच संविधानात कोणत्याही प्रकारची छेडछाड करू नये. याशिवाय, अहवाल प्रथम जनतेसमोर खुला करून त्यानंतरच हरकती मागविणे आवश्यक असल्याचेही स्पष्ट करण्यात आले. यावेळी आंदोलनकर्त्यांनी ठामपणे नमूद केले की, शासनाकडे उपवर्गीकरण करण्याचा कोणताही घटनात्मक अधिकार नसताना ही प्रक्रिया राबविणे असंवैधानिक आहे. या निर्णयामुळे अनुसूचित जाती प्रवर्गामध्ये मतभेद आणि तणाव निर्माण होत असून, यासाठी शासन जबाबदार राहील, असा इशाराही देण्यात आला. तसेच, अनुसूचित जाती प्रवर्गातील सुमारे ५८ जाती समूहांनी या उपवर्गीकरणाला तीव्र विरोध दर्शविल्याचे सांगण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने समाजबांधव, कार्यकर्ते, युवक व महिलांनी सहभाग नोंदवत घोषणाबाजी करत शासनाविरोधात रोष व्यक्त केला. दिसून आले. शेवटी आंदोलनकर्त्यांनी शासनाला कडक इशारा देत म्हटले की, जर त्यांच्या मागण्या तात्काळ मान्य करण्यात आल्या नाहीत, तर राज्यभर व्यापक आणि तीव्र आंदोलन छेडले जाईल. लातूरमधील या आंदोलनामुळे उपवर्गीकरणाचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, येत्या काळात या विषयावर सामाजिक आणि राजकीय पातळीवर मोठी चर्चा होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. यावेळी चंद्रकांत चिकटे, प्रा. अनंत लांडगे, मोहन माने, प्रा. कल्याण कांबळे, गोविंद कांबळे, संदीपान सूर्यवंशी, व्यंकट कीर्तने, सोपान डुमने, भारत गडेराव, त्र्यंबक कवठेकर, सुभाष चव्हाण, गौतम चिकाटे, सूर्यभान कांबळे, सविता चिकाटे, यांच्यासह मोठ्या संख्येने आंदोलकांची उपस्थिती होती.

## लातूर जिल्हा वकील मंडळाच्या संयुक्त विद्यमानान न्यायालय परिसरात पक्ष्यांना पिण्याच्या पाण्याची सोय

तभा वृत्तसेवा



**लातूर, दि. २१ एप्रिल :** प्रभुराज प्रतिष्ठाण व लातूर जिल्हा वकील मंडळच्या सयुंक्त विद्यमाने पक्षांनां पाणी पिण्याची सोय करण्यासाठी जिल्हा न्यायालय परीसरात प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश संजय भरूका यांच्याहस्ते झाडांना येळणी बांधून पक्षांना पाण्याची सोय करण्यात आली.

पाण्याचा अपव्यय टाळून पक्षांसाठी पाणी वाचून त्यांची तहान भागवावी, उन्हाळ्याच्या दिवसात चारा पाण्याविना पक्षाची भटकंती होत आहे. पाण्याच्या शोधात वणवण भटकत असल्याचे दिसून येत असल्याने त्यांची भटकंती कमी करण्यासाठी प्रभुराज प्रतिष्ठाणच्या वतीने वृक्षांना येळण्या बांधण्यात आल्या आहेत. लातूर जिल्हा जिल्हा न्यायालय येथे पक्षांसाठी येळनी बांधून पक्षांसाठी पाण्याची सोय करण्यात आली आहे.

प्रत्येक सुजाण नागरिकांनी आपल्या छतावर व अंगणात असलेल्या झाडाला पक्षांसाठी पिण्याच्या पाणीची सोय करावी, जेणे करून एक सामाजिक उपक्रम आपल्या साह्याने राबविला जाईल. उन्हाच्या तीव्रतेमुळे पशुपक्ष्यांचे हाल होत आहे आणि चारा पाण्याचा प्रश्र्न निर्माण होतो. तो अडचण दूर करण्यासाठी हा उपक्रम राबविला जात आहे.

यावेळी जिल्हा न्यायाधीश नं. १ आर. आर. भोसले, जिल्हा वकील मंडळाचे अध्यक्ष शिवकुमार जाधव, प्रभुराज प्रतिष्ठाणचे ॲड. अजय कलशेट्टी, विशेष जिल्हा सरकारी वकील संतोष देशपांडे, प्रबंधक बालाजी राऊत, ॲड. सुरेश सलगरे, ॲड. सतीश दिवान, वकील मंडळाचे उपाध्यक्ष लहू चामे, सचिव गुरुप्रसाद येरटे, ॲड. मीरा कुलकर्णी, ॲड. सविता मोतीपवळे, ॲड. शिरीष धहिवाल, ॲड. एस. के. जोशी, ॲड. संजय जगदाळे, ॲड. सादिक शेख, ॲड. मंगेश महिंद्रकर, ॲड. सुनंदा इंगळे, ॲड. अमोल पोतदार, ॲड. विजयकुमार खाणापुरे, ॲड. सतीश साळुंके, ॲड. दयानंद मिटकरी व इतर कर्मचारी वर्ग आदी उपस्थित होते.

## शक्तिपीठ महामार्ग रद्द करावा

तभा वृत्तसेवा

**लातूर, दि. २१ एप्रिल :** प्रस्तावित शक्तिपीठ महामार्ग रद्द करावा, शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी द्यावी, ऊस उत्पादक शेतकऱ्यांची थकीत बिले तात्काळ अदा करावीत, सरसकट पीकविमा अदा करावा, जंगली प्राण्यांपासून पिकांचे रक्षण करण्यासाठी शेतकऱ्यांना अनुदान द्यावे, हमीभाव, सिंचन सुविधा, वीज प्रश्र्न तसेच शेतमालाला योग्य दर द्यावा, आदी विविध ठराव महाराष्ट्र राज्य किसान सभेच्या लातूर येथील अधिवेशनात मंजूर करण्यात आले. महाराष्ट्र राज्य किसान सभेचे लातूर जिल्हा अधिवेशन खरोळा येथे पार पडले. या अधिवेशनात शेतकऱ्यांच्या विविध प्रश्र्नांवर चर्चा करून तीव्र लढा उभारण्याचा निर्धार करण्यात आला. यावेळी किसान सभेचे अध्यक्ष उमेश देशमुख, उपाध्यक्ष उद्धव पौळ, सहसचिव अजय बुरांडे, सुधाकर शिंदे, संजय मोरे, प्रेमगीर गिरी, जीवनराव देशमुख, व्यंकटराव राऊतराव, बहादूर शेख आदी उपस्थित होते.

यशस्वीतेसाठी दत्ता राऊतराव, ज्ञानोबा वळींग्रे, सोपान बांडे, कोंडीराम कपाळे, प्रकाश देशमुख, सुधाकर जाधव, गोविंद कांबळे, राजकुमार लोहार, वलिसाब, डी.पी. कांबळे, सुरेश कातळे, विक्रम गिरी, ॲड. सुधीर देशमुख, बापू मांदळे, जालिंदर गिरी, विकास गिरी आदींनी सहकार्य केले. राज्य शासनाने शेतकऱ्यांचे संपूर्ण कर्ज माफ करावे, वन्यप्राण्यांपासून होणारे पिकांचे नुकसान झाल्यावर अनुदान देण्यात यावे. कृषीमालाला हमीभाव जाहीर करावा, शेतीसाठी लागणाऱ्या विजेचा पुरवठा सुरळीतपणे करावा. शेतकऱ्यांना दिवसा वीज मिळावी, प्रस्तावीत शक्तिपीठ महामार्ग तातडीने रद्द करण्यात यावा, असा ठराव महाराष्ट्र राज्य किसान सभेच्या जिल्हास्तरीय अधिवेशनात मंजूर करण्यात आला.

यावेळी उमेश देशमुख, उद्धव पौळ, अजय बुरांडे, सुधाकर शिंदे यांनी भूमिका मांडली.

**जाहीर प्रगटन**

लातूर जिल्हा परिसरातील तमाम जनतेस या जाहिर प्रगटना द्वारे सुचीत करण्यात येते की, माझे पक्षकार हणमंत ज्ञानोबा चोथवे, रा. खुलगापुर, ता.जि. लातूर यांनी मला दिलेल्या माहिती व कागदपत्रावरून व वकिल म्हणून अधिकृत केले वरुन सर्व जनतेस खालील प्रमाणे जाहीर प्रगटन देत आहे. माझे पक्षकार यांना गजानन राजकुमार वेदपाठक, रा. मंठाळे नगर, लातूर यांनी खरेदीखत दस्त क्रं. लतर १ ९९९५, दि.१७/१०/२०२५ अन्वये खरेदी मालकीचा व कब्जेवहिवाटीचा मौजे. महाराणा प्रताप नगर, लातूर येथील जमीन सर्वे नंबर ७/३/२ पैकीचा याचा एन.ए झालेला एन.ए नंबर २०१२/जेएमबी/लातूर/सीआर १६२, दि.२२/०२/२०१३ ईसवी अन्वये मे. सब डिव्हीजनल ऑफिस, लातूर यांनी मंजूर केलेल्या पैकीचा प्लॉट याचा लेआऊट नंबर सिडको लातूर /सिडको/प्लॅनिंग/एलटीआर/२०१२/५६९, दि.२४/१२/२०१२ ईसवी अन्वये मे. सिडको ऑफिस, लातूर यांनी मंजूर केलेल्या पकीचा प्लॉट असून याची लांबी पूर्व पश्र्चिम १७.६५ मी. व रुंदी दक्षिण उत्तर ९ मी. असून याचे एकूण क्षेत्रफळ १५८.८५ चौ.मी. (१७०९.२२ चौ. फुट) आहे. याची चतुः सीमा खालील प्रमाणे :- पुर्वेसप्लॉटनंबर४६, पश्र्चिमेस१२मी.रुंदीचारस्ता, दक्षिणेसप्लॉटनंबर४०, उत्तरेसप्लॉटनंबर३८. येणे प्रमाणे वरील चतुःसीमेच्या आतील प्लॉट विद्यमान मालकाकडुन लेखी करार करुन घेऊण, इस्सारापोटी काही रक्कम माझे पक्षकाराकडुन स्विकारुन सदरची मिळकत ही निर्विवाद क निर्जोखीम असल्याची हमी माझे पक्षकारास दिली आहे. तरी सदर मिळकती बाबत जर कोणाचा उजर, आक्षेप, हितसंबंध, हक्कसंबंध, कर्जबोजा, गहाणखत, बक्षीसपत्र, कोर्ट डिग्री, मृत्युपत्र, तारण, लीज, शेजाऱ्याचा वाद, शासकिय अथवा निमशासकिय कर्ज, न्यायालयीन वाद असतील तर त्यांनी सदरचे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून सात (०७) दिवसाच्या आत माझे खालील कार्यालयीन पत्यावर योग्य त्या कागदपत्रांसह लेखी उजर / आक्षेप नोंदवावा मुदतीत जर कोणाचा उजर/आक्षेप नाही आल्यास सदरची मिळकत ही निर्विवाद व निर्जोखीम आहे असे गृहीत धरुन माझे पक्षकार सदर मिळकतीचे नोंदणीकृत खरेदीखत मूळ मालकाकडून आपल्या हक्कात करुन घेतील व त्यानंतर येणारे आक्षेप माझे पक्षकारावर बंधणकारक राहणार नाहीत याची सर्व जनतेने नोंद घ्यावी.दिनांक – २१/०४/२०२६

तर्फे
**ॲड. अशोक ज्ञा. लोखंडे**
नोटरी भारत सरकार.
शाह चौक, लातूर
मो नं.९४२१९ ८६४९५

जाहीर प्रगटन देणार
**हणमंत ज्ञानोबा चोथवे**
रा. खुलगापुर, ता.जि.लातूर
मो. नं.९७६४९७७४३८/८०८७८७०६०१

## संक्षिप्त वृत्त...

### आदिती राऊत व मयुरी थोरात यांच्या सर्वोत्कृष्ट खेळीमुळे महाराष्ट्रास विजेतेपद : पश्चिम विभागीय १७ वर्षाखालील मुलींच्या क्रिकेटची स्पर्धा

**परभणी,/प्रतिनिधी-** पश्चिम विभागीय सतरा वर्षाखालील मुलींच्या क्रिकेट स्पर्धेत महाराष्ट्राच्या संघाने गुजरातचा पराभव करीत विजेतेपद पटकावले. या स्पर्धेत महाराष्ट्र संघाचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या परभणीच्या खेळाडू आदिती राऊत व मयुरी थोरात यांचे मोठे योगदान राहिले.

आदिती राऊत व मयुरी थोरात यांनी केलेल्या फलंदाजी व गोलंदाजीच्या जबरदस्त कामगिरीच्या जोरावर महाराष्ट्र संघाने विजेतेपद पटकावले. या स्पर्धेत मुंबई, गुजरात, सौराष्ट्र, बडोदा व महाराष्ट्र संघाचा सहभाग होता. दरम्यान, परभणी जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष संतोष बोबडे, उपाध्यक्ष शशीकुमार जवळेकर, सचिव ॲड. स. अब्दुल्ला स. रशीद, सुहास पावडे, ज्ञानेश्वर काकडे, स्वाती शाह, सुरेश काकडे, इरशाद भाई आदींनी या दोघींचे अभिनंदन केले.

### जूना पेडगांव रस्त्यावरील गतीरोधक हटवा : संतप्त नागरीकांद्वारे महापौरांना साकडे

**परभणी,/प्रतिनिधी :** महानगरपालिका प्रशासनाने जूना पेडगांव रस्त्यावर अंथरलेले बेकायदेशीर गतीरोधक तातडीने हटवावेत, अशी मागणी संतप्त नागरीकांनी महापौरांना सादर केलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

जूना पेडगांव रस्त्याचे काम दोन वर्षांपूर्वी झाले. या रस्त्यावर दोन वर्षात कोणतेही कायमस्वरुपी किंवा कोणतेही गतीरोधक टाकण्यात आले नव्हते, परंतु, महापालिका निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर या रस्त्यावर ठिकठिकाणी बेकायदेशीरपणे व मनमानी पध्दतीने गतीरोधक अंथरण्यात आले. हे नवीन गतीरोधक अर्धाफ ूट, एक फुट उंच असल्यामुळे दुचाकी, तीनचाकी किंवा चारचाकी वाहनाने प्रवास करणाऱ्या प्रवाशांना या गतीरोधकामुळे मानेचे, पाठीचे व कमरेचे दुखणे सुरु झाले आहे. हे गतीरोधक अर्धा ते एक इंचापेक्षा जास्त उंचीचे व तीन इंच रुंदीच्या पट्ट्याशिवाय जास्त रुंदीचे गतीरोधक कायद्यानुसार उभारता येत नाहीत, गतीरोधकावर रेडीयमचे रिफ्लेक्टर अथवा पांढरा रंग मारलेला असला पाहिजे, परंतु, या ठिकाणी गतीरोधक अंथरतेवेळी कोणतेही नियम पाळल्या गेलेले नाहीत, त्यामुळे रात्रीच्या वेळी वाहनधारकांना हे गतीरोधक दिसत नाहीत, त्याचा परिणाम छोटे छोटे अपघात सातत्याने होऊ लागले आहेत. या पार्श्वभूमीवर महापालिका प्रशासनाने तातडीने या गतीरोधकांची दखल घ्यावी व ते गतीरोधक हटवावेत, अशी मागणी अनंत कापसे, चंदुलाल परशल्लू, सुभाष पेंडलवार, पोटपल्लेवार, विष्णूपुरीकर, एल.के. जोशी, वाय.बी. कोडगीरे, एम.जी. वाघमारे, तुकाराम जवळेकर, दिपक फुटाणे, प्रसाद नवटक्के, शिवकांत कुलथे, संतोष कुलकर्णी, अनिल कुलथे, रोहिदास भांडपे, बाळासाहेब जाधव, सुभाष मेनकुदळे, रावसाहेब शिंदे, रत्नाकर शिंदे, प्रल्हार लोहरकर आदींनी एका निवेदनाद्वारे केली.

### अनोळखी व्यक्तीचा मृतदेह सापडला : ओळख पटेना

**परभणी,/प्रतिनिधी :** येथील जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केलेल्या व उपचार सुरु असतांना मृत्यू झालेल्या एका अनोळखी व्यक्तीची ओळख पटेनाशी झाली आहे.
अंदाजे ४५ वर्षे वय, रंग सावळा, डोक्याचे केस काळे-पांढरे व वाढलेले, दाढी वाढलेली, काळी-पांढरी मिशी, पाच फुट २ इंच उंची, निळ्या व ग्रे रंगाची चौंकडी लुंगी, डाव्या हातावर पीआर असे गोंदलेले आहे. वगैरे वर्णणाच्या या अनोळखी व्यक्तीची ओळख पटावी यासाठी नानलपेठ पोलिसांनी प्रयत्न सुरु केले आहेत.

### शारिरीक शिक्षण शिक्षक महासंघाची कार्यकारणी जाहीर : जिल्हाध्यक्षपदी निलेश यादव, सचिवपदी भालशंकर

**परभणी,/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य युवा शारिरीक शिक्षण शिक्षक महासंघ संलग्न, जिल्हा शारिरीक शिक्षण शिक्षक महासंघाची नूतन कार्यकारणी जाहीर करण्यात आली असून जिल्हाध्यक्षपदी निलेश माधवराव यादव तर जिल्हा सचिवपदी यमनाजी भालशंकर यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावरील शारिरीक शिक्षण या विषयाच्या प्रगतीसाठी व शारिरीक शिक्षण शिक्षक यांचे विविध प्रश्न सोडवणूकीसाठी महासंघाच्या माध्यमातून राज्यभर संघटनात्मक बांधणी होत आहे. या मोहिमेचा एक भाग म्हणून या जिल्ह्याची निवड सभा नुकतीच पार पडली. कैलास माने, कैलास टेहरे, प्रमोद सुरनर, महासंघाचे संस्थापक संदीप मनोरे, राज्य सचिव प्रा. तायाप्पा शेडगे यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यकारणीची निवड करण्यात आली. जिल्हाध्यक्षपदी यादव, उपाध्यक्षपदी जयदीप फड, शेख शाहरुख अजीज, कार्याध्यक्षपदी गणेश नागरगोजे, सचिवपदी भालशंकर, सहसचिवपदी सतीश कदम, महेंद्र गवळी, ज्ञानोबा ठोंबरे, खजीनदारपदी बालाजी मानोलीकर, जिल्हा संघटकपदी राहुल अंबेकर, गणराज गायकवाड, संभाजी बादाड, आदीत्य गायकवाड, आशिष सूर्यवंशी, विठ्ठल राठोड यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. दरम्यान, क्रिडा क्षेत्रातून या कार्यकारणीच्या पदाधिकाऱ्यांचे स्वागत करण्यात येत आहे.

### उमरीतील सिमेंट बंधारा श्रमदान शिबीरातून गाळमुक्त :
### कृषि विभागाद्वारे श्रमदान अभियान : ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**परभणी,/प्रतिनिधी :** परभणी तालुक्यातील उमरी या गावी नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प टप्पा क्रमांक- २ अंतर्गत कृषि विभागाच्या वतीने उभारलेल्या सिमेंट बंधाऱ्यातील गाळ पावसाळ्यापूर्वी ग्रामपंचायत व ग्रामस्थांच्या सहकार्याने काढण्यात आला जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी दौलत चव्हाण, उपविभागीय कृषि अधिकारी धनराज जगताप, तंत्र अधिकारी प्रिया नवने, सहाय्यक प्रकल्प अधिकारी सुनीता खरवडे, मंडळ कृषि अधिकारी सोमेश्वर गिरी, तंत्रज्ञ समन्वयक यशोदा सपकाळ, सहाय्यक कृषि अधिकारी किसन रंगे, दीपक कऱ्हाळे, सूर्यकांत पाटील, श्रीमती नंदीनी इजागत यांच्या प्रमुख उपस्थितीत सरपंच जगन्नाथराव गोरे व अन्य ग्रामपंचायत सदस्य तसेच अन्य ग्रामस्थांच्या उपस्थितीत श्रमदानाद्वारे बंधाऱ्यातील गाळ काढण्यात आला.

यावेळी लोकसहभागाची कास धरुन गावचा विकास या विषयी तज्ञांनी मार्गदर्शन केले. श्रमदानातून गावकरी एकत्रित करुन जल व मृद संधारणाची कामे या संदर्भात उहापोह करण्यात आला. यावेळी सरपंच गोरे, वैजनाथ गोरे, कृष्णा गोरे, प्रसाद गोरे, भारत गोरे, अशोक इंगळे, मुंजाभाऊ माने, अशोक गोरे, ऋषिकेश गोरे, शिवाजी गोरे, शिल्पा पवार, मंगलबाई कांबळे आदी उपस्थित होते. शिबीराचे आयोजन दिपक कऱ्हाळे यांनी केले होते. प्रसाद गोरे व अन्य मंडळींची शिबिराचे नियोजन केले होते.

# वाढत्या तापमानामुळे उष्माघाताचा धोका वाढला; महानगरपालिकेचे नागरिकांना सावधगिरीचे आवाहन

## अवकाळी वारे, गारपीट आणि पावसाचा वनामकृविने दिला पुढील दोन दिवस इशारा

**परभणी,/प्रतिनिधी-** एप्रिल महिन्यात सूर्याची तीव्रता वाढत असून तापमानात सातत्याने वाढ होत आहे. सरासरीपेक्षा सुमारे ३ अंशांनी तापमान वाढल्याने उष्माघाताचा धोका अधिक तीव्र झाला आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.



महापौर सय्यद इकबाल, आयुक्त नितीन नार्वेकर आणि महापालिका आरोग्य अधिकारी डॉ. कल्पना सावंत यांनी पत्रकार परिषदेत याबाबत सविस्तर माहिती दिली. यावेळी सहाय्यक आयुक्त गजानन जाधव उपस्थित होते.

उन्हात काम करणारे मजूर, ज्येष्ठ नागरिक, लहान मुले, गर्भवती महिला, जादा वजन असलेले व्यक्ती, अपुरी झोप झालेली व्यक्ती तसेच मधुमेह, हृदयविकार किंवा मद्यपानाची सवय असलेल्यांना उष्माघाताचा धोका अधिक असल्याचे सांगण्यात आले. सुरुवातीच्या अवस्थेत चक्कर येणे, ताप येणे, हात-पायांना गोळे येणे अशी लक्षणे दिसतात. तर गंभीर अवस्थेत त्वचा कोरडी पडणे, तीव्र डोकेदुखी, रक्तदाब वाढणे, मानसिक अस्वस्थता, बेशुद्धावस्था अशी लक्षणे दिसून येतात. काही वेळा ही स्थिती जीवघेणीही ठरू शकते.

उष्माघाताची लक्षणे आढळल्यास संबंधित व्यक्तीला तातडीने थंड व हवेशीर ठिकाणी ठेवावे. पंखा किंवा कुलरचा वापर करून शरीराचे तापमान कमी करण्याचा प्रयत्न करावा. थंड पाण्याने अंघोळ घालणे किंवा कपाळावर थंड पाण्याच्या पट्ट्या ठेवणे यासारख्या उपाययोजना कराव्यात, असे तज्ञांनी सांगितले. नागरिकांनी भर उन्हात कष्टाची कामे टाळावीत, शक्यतो दुपारच्या वेळेत घराबाहेर पडणे टाळावे, लहान मुलांना बंद वाहनात ठेवू नये, तसेच मद्यपान, चहा, कॉफी आणि शीतपेये टाळावीत. शिळे अन्न खाणे टाळून स्वयंपाकघर हवेशीर ठेवण्याचाही सल्ला देण्यात आला आहे.

उष्माघातापासून बचावासाठी भरपूर पाणी पिणे, हलक्या रंगाचे सैलसर कपडे वापरणे, बाहेर पडताना टोपी, छत्री, सनग्लासेस व पादत्राणे वापरणे, तसेच सनस्क्रीन किंवा कोरफडीचा वापर करणे उपयुक्त ठरते. घरात पंखा किंवा कुलरच्या मदतीने वातावरण थंड ठेवण्याचेही आवाहन करण्यात आले आहे.
महापाकेद्वारे शहरात चार ठिकाणी उष्माघात कक्ष सुरू....

वाढत्या तापमानाचा विचार करून महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाने शहरातील चार नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये उष्माघात कक्ष सुरू केले आहेत. साखला प्लॉट, इनायत नगर, खंडोबा बाजार आणि खानापूर येथील केंद्रांमध्ये ही सुविधा उपलब्ध असून उष्माघाताची लक्षणे दिसल्यास नागरिकांनी तातडीने जवळच्या आरोग्य केंद्राशी संपर्क साधावा, असे आवाहन महापौर सय्यद इकबाल व आयुक्त नितीन नार्वेकर यांनी केले.

### खरबा येथे किरकोळ कारणावरून तिघांकडून मारहाण; जीवे मारण्याची धमकी, गुन्हा दाखल

**मानवत,/प्रतिनिधी :** खरबा येथे किरकोळ कारणावरून तिघांकडून मारहाण; जीवे मारण्याची धमकी, गुन्हा दाखल करण्यात आलाआहे. तालुक्यातील खरबा येथे किरकोळ कारणावरून शेजाऱ्यांमध्ये वाद होऊन तिघांनी मिळून एका कुटुंबीयांना मारहाण केल्याची घटना घडली आहे. शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी मानवत पोलीस ठाण्यात तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी संजय अप्पाराव कांबळे (रा. खरबा, ता. मानवत) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, दि. १७ एप्रिल रोजी सायंकाळी आरोपी दादाराव सटवाजी कांबळे यांनी दारूच्या नशेत फिर्यादीस शिवीगाळ केली होती. त्यावेळी समजूत काढण्यात आली होती. मात्र दुसऱ्या दिवशी दि. १८ एप्रिल रोजी सायंकाळी ७ वाजण्याच्या सुमारास आरोपी दादाराव सटवाजी कांबळे, माऊली दादाराव कांबळे आणि भाग्यश्री सटवाजी कांबळे हे तिघे फिर्यादीच्या घरासमोर आले. ''काल मला दारू पिऊ नको असे का म्हणालात?'' या कारणावरून त्यांनी वाद घालत फिर्यादीस तसेच त्यांच्या नातेवाईक महिलांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याचे तक्रारीत नमूद आहे. तसेच चाकूने मारून ठार करण्याची धमकी देत अश्लील शिवीगाळही केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

## पूर्णेत परशुराम जयंती उत्साहात साजरी

**पूर्णा,/प्रतिनिधी-** सर्वांनी एकसंघ राहून प्रखरपणे हिंदुत्वाच्या रक्षणासाठी कटिबद्ध राहावे,तरच येणारा आपला भविष्यकाळ उज्ज्वल होईल,असे प्रतिपादन राष्ट्रीय कीर्तनकार योगेश महाराज साळेगांवकर यांनी केले. ब्रह्म वृंदानी आपले आचरण,विचार व कृती यात समन्वय राखण्याची गरज व्यक्त केली.
पूर्णा येथील शनी मंदिरात रविवारी(दि.१९) सायंकाळी सहा वाजता ब्राह्मण महासंघ शहर शाखाच्या वतीने आयोजित श्री भगवान परशुराम जन्मोत्सवात ते बोलत होते.
अध्यक्षस्थानी गंगाधरराव रानडे तर प्रमुख अतिथी म्हणून नगराध्यक्ष प्रतिनिधी नितीन उर्फ बंटी कदम,शिवसेनेचे जिल्हाप्रमुख विशाल कदम, डॉ.चंद्रकांत बुरटे,नगरसेवक लक्ष्मीकांत कदम,विश्वनाथ होळकर व्यासपीठावर उपस्थित होते.
गोविंद चौधरी,विष्णुपंत पूर्णेकर यांच्या हस्ते श्री भगवान परशुराम यांच्या प्रतिमेचे विधिवत पूजन करून वैदिक मंत्रोच्चाराच्या



उद्घोषात जन्मोत्सव साजरा केला.
कार्यक्रमाचे प्रास्ताविक मधुकर जोशी यांनी केले. गीत प्रभू दयाल ओझा यांनी म्हटले यावेळी साळेगावकर यांनी ब्राह्मणांच्या बौद्धिक व शौर्याच्या इतिहासाचे दाखले देत एकसंघ समाज व राष्ट्रासाठी समाजधुरींनी बलिदान दिल्याचा गौरवपूर्ण उल्लेख केला. एकता टिकवून ठेवली पाहिजे.टीका करणाऱ्यांना आपल्या कृतीतून ठोस उत्तर देण्याची वेळ आल्याचे त्यांनी परखडपणे सांगितले.
विशाल कदम यांनी हिंदू तितका एक व्हावा,एकमेकातील मतभेद दूर व्हावेत,समताधिष्ठित राष्ट्र आपण निर्माण करावे,अशी अपेक्षा व्यक्त केली तर नितीन कदम यांनी जन्मोत्सवाच्या सर्वांना शुभेच्छा देत समाजाच्या अडीअडचणी,सार्वजनिक प्रश्न सोडविताना आपण पूर्ण सहकार्य करू,असे आश्वासन दिले.
सूत्रसंचालन, डॉ. हरिभाऊ पाटील आभारप्रदर्शन लक्ष्मण वांगे यांनी केले या कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. प्रशांत कुलकर्णी , श्रीकांत आहेरवाडकर ,सतीश टाकळकर, गिरीश जोशी, मकरंद कुलकर्णी, अभिजीत चिटणीस, अरविंद घन, अविनाश आहेरवाडकर यांनी परिश्रम घेतले.

## नागरीकांनी स्वतःसह आपल्या कुटूंबियांची माहिती स्व गणनेद्वारे भरावी : जिल्हा प्रशासनाद्वारे आवाहन

**परभणी,/प्रतिनिधी-** : भारत सरकारकडून देशाची १६ व्या जनगणनेच्या कामास सुरुवात झालेली असुन या जनगणनेमध्ये यावेळी 'डिजिटल सेन्सस' आणि 'स्व-गणना' ही सुविधा पहिल्यांदाच नागरीकांकरीता उपलब्ध करुन दिली जात आहे. परभणी जिल्ह्यातील शहरी व ग्रामीण भागातील सर्व नागरिक, विशेषतः तरुण, शिक्षित बांधवांनी पुढाकार घेऊन स्वतःची व आपल्या कुटुंबाची माहिती स्व-गणनेद्वारे भरावी, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा प्रधान जनगणना अधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी केले आहे.

स्व-गणना म्हणजे काय?
आपण स्वतः आपल्या मोबाईल किंवा संगणकावरून जनगणनेच्या पोर्टलवर आपल्या कुटुंबाची संपूर्ण माहिती लिंकद्वारे भरू शकतो. यासाठी आधार कार्ड, मोबाईल नंबर यापैकी एकाच्या आधारे लॉगिन करावे लागेल. स्व-गणना कालावधी हा १ मे ते १५ मे २०२६ असा आहे, ही प्रक्रिया पूर्णपणे सुरक्षित आणि गोपनीय आहे.

सामान्य नागरिकांना स्व-गणना करुन जनगणनेच्या कार्यात प्रत्यक्ष सहभागी होता येणे शक्य होईल. जनगणनेच्या कार्याकरिता परभणी जिल्हयातील ग्रामीण व नगरपरिषद शहरी क्षेत्रात एकुण २ हजार ४८६ घरयादी गट बनविण्यात आले असुन एक घरयादी गट हा जवळपास १८०-२०० घरे किंवा ६५० ते ८०० लोकसंख्येपासुन तयार केला जातो. याकरिता एकुण २ हजार ६७७ प्रगणक तसेच प्रत्येक ६ प्रगणकांकरिता १ याप्रमाणे एकूण ४५४ पर्यवेक्षक यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. प्रगणक व पर्यवेक्षक यांचे प्रशिक्षण दिनांक २७ एप्रिलपासून ८ मे २०२६ या कालावधीत चार्ज अधिकारी तथा तहसिलदार व मुख्याधिकारी यांच्या स्तरावर घेण्यात येणार आहे.

जे नागरिक तंत्रज्ञानाचा वापर करु शकत नाहीत, ज्येष्ठ नागरिक, किंवा ज्यांच्याकडे मोबाईल नाही, त्यांच्यासाठी प्रशिक्षित प्रगणक दिनांक १६ मे ते १४ जुन २०२६ या कालावधीत प्रत्येक घरी भेट देऊन ॲपद्वारे माहिती नोंदवतील. जनगणनेतून मिळालेली आकडेवारी पुढील १० वर्षांसाठी शाळा, दवाखाने, रस्ते, रेशन, पाणीपुरवठा, रोजगार योजना यांचे नियोजन ठरवते. तुमची एक अचूक नोंद म्हणजे परभणी जिल्ह्याच्या विकासाला हातभार आहे, असे जिल्हाधिकारी चव्हाण यांनी म्हटले आहे.

१ मे २०२६ पासून सुरू होणाऱ्या स्व-गणना टप्प्यात सहभागी व्हावे, काही अडचण आल्यास आपले तालुक्यातील तहसिल कार्यालय तसेच नगरपरिषद/नगरपंचायत कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा प्रधान जनगणना अधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी केले आहे.

### ताडकळस येथे भारतीय स्टेट बँकेची शाखा नव्या इमारतीत स्थलांतरित :
### २४ एप्रिलपासून पूर्णा रोडवरील नव्या शाखेतून कामकाज; ग्राहकांना अधिक सुविधा उपलब्ध

**परभणी,/प्रतिनिधी :** पूर्णा तालुक्यातील प्रमुख बाजारपेठ असलेल्या ताडकळस येथील भारतीय स्टेट बँकेची स्थानिक शाखा ग्राहकांच्या सोयीसाठी पूर्णा रोडवरील नव्या व प्रशस्त इमारतीत स्थलांतरित करण्यात आली आहे. शुक्रवार २४ एप्रिलपासून या नव्या शाखेतून नियमित कामकाज सुरू होणार असल्याची माहिती शाखा व्यवस्थापक नवीन मायकलवार यांनी दिली.

जुन्या ठिकाणाहून नव्या इमारतीत स्थलांतर झाल्यामुळे ग्राहकांना अधिक सुलभ आणि आधुनिक सुविधा उपलब्ध होणार आहेत. नव्या शाखेमध्ये प्रशस्त हॉल, स्वतंत्र कॅश काउंटर, अत्याधुनिक सुविधा तसेच डिजिटल बँकिंग सेवांसाठी विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. यामुळे व्यवहार करताना ग्राहकांचा वेळ वाचणार असून सेवा अधिक जलद आणि सोयीस्कर होणार आहे.

बँक प्रशासनाने सर्व ग्राहकांना पुढील सर्व व्यवहार नव्या शाखेतूनच करण्याचे आवाहन केले आहे. तसेच खातेदारांनी आपले नोंदणीकृत पत्ते व आवश्यक कागदपत्रे अद्ययावत ठेवावीत, असेही सांगण्यात आले आहे.

## देशमुख हॉटेल चौकातील मध्यभागातील पोलवरील बेकायदा होर्डींगमुळे एक व्यक्ती जखमी

**परभणी ,/प्रतिनिधी:** देशमुख हॉटेल चौकातील मध्यभागातील पोलवरील बेकायदा होर्डींगमुळे एक व्यक्ती जखमी झाली आहे.
परभणी कारेगांव रस्त्यावरील देशमुख हॉटेल चौकातील मध्यभागी पोलवर बेकायदेशीरपणे लटकवलेल्या होर्डींगच्या धक्क्याने जखमी झालेल्या दुचाकीस्वाराचा डोळा निकामी होता होता वाचला.

महानगरपालिका हद्दीतील चोहोबाजूंच्या प्रमुख चौकांसह रस्त्या रस्त्यांवर गेल्या कित्येक वर्षांपासून बेसुमार होर्डींग झळकत आहेत. संत-महंतांसह महापुरुषांच्या जयंती, पुण्यतिथी असो, वाढदिवस किंवा नियुक्त्यांच्या अभिनंदनाचे असो, या छोट्या मोठ्या आकाराच्या होर्डींग्जमुळे संपूर्ण महानगर विद्रुप दिसत आहेत. परंतु, सत्तारुढ असो किंवा विरोधी पक्षांना संस्था व प्रतिष्ठानांच्या पदाधिकाऱ्यांसह सदस्यांना किंवा मित्रमंडळ असो, अन्य सामाजिक कार्यकर्त्यांना, व्यापाऱ्यांनासुध्दा त्याचे भान नाही, हे विदारक सत्य आहे. त्याचा परिणाम संपूर्ण महानगराच्या चोहोबाजूंनी तसेच मध्यवस्तीतील चौकांसह रस्त्या रस्त्यावर, इमारतीवर झळकणारे हे हजारो होर्डींग्ज दररोज अपघातांना निमंत्रण देणारे ठरले आहेत. या बेकायदा होर्डींग्जमुळे या पूर्वी जिंतूर व वसमत रस्त्यावर काहींना कायमस्वरुपी जायबंदी व्हावे लागले. परंतु, त्या गोष्टीचा या साऱ्या मंडळींनी असो, महानगरपालिका प्रशासनाने काडीचाही बोध घेतला नाही, त्याचा परिणाम होर्डींग्ज उभारणाऱ्या कंपन्यांसह या साऱ्या मंडळींचे गेल्या काही महिन्यांपासून चांगलेच फावले आहे. त्यामुळेच अलिकडे संपूर्ण शहरात चोहोबाजूंनी व मध्यवस्तीतील चौकांमधून व रस्त्या रस्त्यांवर दर्शनी भागात थेट रस्त्यापर्यंत झळकलेले हे हजारो होर्डींग्ज आता धोकादायक ठरले आहेत. त्याचे उत्तम उदाहरण मंगळवारी सकाळी कारेगांव रस्त्यावरील देशमुख हॉटेल चौकात गणपती मंदिरासमोरील पथदिव्याच्या खांबावर दोन्ही बाजूंनी झळकविलेले एक उभ्या आकाराच्या होर्डींग्जमुळे एका वाहनधारकाच्या डोळ्याजवळ धडकेमुळे गंभीर स्वरुपाची दुखापत झाली. या चौकातून वळसा घालतांना त्या होर्डींग्जचा कॉर्नर या वाहनधारकाच्या कानापासून डोळ्यापर्यंत घासला. रक्तबंबाळ अवस्थेतील त्या वाहनधारकास प्रत्यक्षदर्शनींनी तात्काळ दवाखान्यात पोहोचवले. तो पर्यंत मोठ्या प्रमाणावर रक्तस्त्राव झाला. त्या वाहनधारकाचे सुदैव असे, डोळा बालंबाल बचावला.

दरम्यान, महानगरपालिका प्रशासना पाठोपाठ शहर वाहतूक पोलिस यंत्रणेनेसुध्दा वारंवार दिलेल्या इशाऱ्यांकडे साफ दुर्लक्ष करीत मध्यवस्तीसह चोहोबाजूंच्या वसाहतीतील प्रमुख रस्ते व चौकांमधून बेसुमार होर्डींग्ज झळकवलेल्या एजन्सीधारकांसह या अतिउत्साही कार्यकर्त्यांविरोधात सरकारी यंत्रणांनी खरोखरच कठोर कारवाई करणे नितांत गरजेचे बनले आहे. वारंवार नुसते इशारे देऊन या तथाकथित मंडळींवर काडीचाही परिणाम होऊ शकणार नाही, हे विदारक सत्य आहे.

## अग्रलेख...

# अधमांचा उधम रोखा!

सातत्याने संकटांना सामोरे जाण्याची वेळ येऊ लागली की त्याची सवयच होऊन जाते. संकटे हा जीवनशैलीचाच एक भाग वाटू लागतो आणि सततच्या संकटांची सवय झाली की त्याचे गांभीर्यही कमी होऊ लागते. काही संकटे साधीसुधी नाहीत, तरीही त्याबाबतच्या सावधगिरीचे भान मात्र अद्याप म्हणावे तितक्या गांभीर्याने समाजात रुजलेले दिसत नाही. गेल्या काही वर्षांत सातत्याने आदळणाऱ्या काही बातम्यांची मुळे या संकटामध्ये रुतलेली असावीत असे वाटण्याजोगी परिस्थिती आता मात्र प्रकर्षाने जाणवू लागली आहे आणि समाजाचा, कुटुंबांचा महत्त्वाचा घटक असलेल्या महिलांपर्यंत या संकटाचे पाश पोहोचू लागले आहेत. खरे म्हणजे, नाशिक जिल्ह्यातील भोंदू कॅप्टन अशोक खरातच्या अटकेनंतर एकामागून एक उजेडात येत असलेल्या गुन्ह्यांतून लैंगिक अत्याचाराच्या कहाण्या समोर येऊ लागल्यावर या संकटाची जाणीव समाजात तीव्र होऊ लागली असली, तरी त्याची सुरुवात मात्र, त्याआधी कित्येक दशकांपासूनच झालेली असावी. लोकांच्या श्रद्धा आणि अंधश्रद्धांच्या समजुतींमागील एक धूसर सीमारेषा पुसून टाकून अंधश्रद्धा म्हणजेच खरी श्रद्धा असे भासविण्याच्या धंद्यातून या संकटाने शिरकाव केला असला, तरी अलिकडच्या काही घटना पाहता, त्याचे रूप केवळ लैंगिक अत्याचार, आर्थिक गुन्हेगारी, श्रद्धा आणि अंधश्रद्धा यांच्यापुरते सीमित राहिलेले नसून त्याला कट्टर धर्मवेडाचीही किनार असल्याचे दिसू लागले आहे. खरात नावाच्या भोंदूच्या कारवाया अंधश्रद्धांचा स्वार्थी फायदा उपटून लैंगिक विकृतीचे कंड शमविण्यापुरत्या आणि लोकांची आर्थिक लुबाडणूक करण्यापुरत्या मर्यादित असतील, पण विदर्भाच्या अमरावतीमधील परतवाडा-अचलपुरातून उघडकीस आलेल्या लैंगिक शोषणाच्या विकृत गुन्हेगारीने त्या मर्यादाही ओलांडल्याचे दिसत आहे. या गुन्ह्याच्या तपासातून उघडकीस येत असलेल्या तपशिलांचा विचार केल्यास, धर्मद्वेषाच्या आणि धर्मप्रसाराच्या कट्टरतेचा एक व्यापक कट आखला गेल्याच्या अगोदरपासूनच व्यक्त होत असलेल्या शंकेला बळ मिळत असल्याच्या भावनेने संपूर्ण समाजजीवन ढवळून निघाले आहे. अचलपुरातील एका १९ वर्षांच्या तरुणाविरोधात दाखल झालेल्या गुन्ह्याचा तपशील अस्वस्थ करणारा तर आहेच, पण या भयंकर संकटाचे संकेत देणारेही आहे. गेल्या काही दिवसांत समाजमाध्यमांच्या वेगवेगळ्या मंचावरून असंख्य अश्लील चित्रफिती फैलावत गेल्या आणि लैंगिक विकृतीचा कंड शमविताना धार्मिक कट्टरतावादाच्या कटाचे संकेतही स्पष्ट होऊ लागले. जवळपास १८० युवती या लैंगिक विकृतीची शिकार झाल्याची शंका व्यक्त होत असून त्यापैकी अनेकजणी अल्पवयीन असल्याचे सांगण्यात येते. या युवतींना समाजमाध्यमाच्या मंचावरून आपल्या प्रेमाच्या आभासी जाळ्यात ओढून त्यांच्यावर लैंगिक अत्याचार करणे व त्याच्या चित्रफिती समाजमाध्यमांवरच प्रसृत करण्याची धमकी देऊन त्यांच्यावर धार्मिक बाबींची सक्ती करण्याचा संशयही व्यक्त केला जात आहे. खरात प्रकरणापाठोपाठ असेच एक प्रकरण नाशिकमधील नामांकित बहुराष्ट्रीय कंपनीत उघडकीस आले होते.

गेल्या सुमारे दोन वर्षांत महाराष्ट्रात महिला व अल्पवयीन मुली बेपत्ता होण्याच्या वाढत्या घटनांनी समाजमन अस्वस्थ झाले आहे. केवळ बेपत्ता होणाऱ्या महिला-मुलींची वाढती संख्या एवढे एकच या अस्वस्थतेचे कारण नाही. प्रत्येक वेळी एखादी मुलगी हरवते, तेव्हा तिच्या सुरक्षिततेची चिंता, कुटुंबीयांची हतबलता आणि पोलिस यंत्रणेवर वाढणारा ताण या सर्व बाजू स्पष्टपणे दिसून येत होत्या. आता मात्र या गंभीर प्रश्नाकडे पाहताना आणखी एक वेगळाच मुद्दा पुढे येऊ पाहात आहे. काही घटना, काही आरोप आणि काही राजकीय विधानांमुळे महिला व मुलींचे बेपत्ता होणे आणि काही कट्टरवाद्यांकडून आखल्या जाणाऱ्या धर्मांतराच्या कटाच्या कहाण्या यांच्या संबंधींचीही चर्चा सुरू झाली आहे. वास्तवाच्या कसोटीवर हे संबंध किती टिकतात, हे अद्याप पुरेसे स्पष्ट झालेले नसले, तरी महिला व मुलींचे बेपत्ता होणे आणि नाशिक, परतवाडा येथील काही घटनांतून समोर येणारे धागेदोरे जोडल्यास याकडे गांभीर्याने पाहण्याची गरज मात्र आता अधोरेखित होऊ लागली आहे. महाराष्ट्रात गेल्या दोन वर्षांत सुमारे ९४ हजार महिला व मुली बेपत्ता झाल्याची आकडेवारी जाहीर झाली आहे. त्यापैकी सुमारे ७२ टक्के प्रकरणांचा छडा लागला असला तरी अद्याप काही महिला-मुली मात्र सापडलेल्या नाहीत. याची कारणे शोधताना संबंधित यंत्रणा आजवर काही पठडीबाज मीमांसा करताना दिसत असत. या बेपत्ता होणाऱ्यांपैकी काही प्रकरणे प्रेमसंबंधाशी जोडली गेलेली असतात, तर काही प्रकरणांत घरगुती वादातून महिला-मुली घराबाहेर पडत असल्याचे निष्कर्ष निघतात. अत्याचार, दडपण अशा कारणांमुळे घर सोडून निघून जाण्याची मानसिकता एखाद्या क्षणी बळावते, असेही या यंत्रणांना वाटत होते. काही महिला बेपत्ता होण्याच्या प्रकरणांत मानवी तस्करी करणाऱ्या व महिलांना अनैतिक धंद्यांच्या जाळ्यात ओढणाऱ्या टोळ्यांचा सहभाग असावा असेही निष्कर्ष काढले गेले होते. यवतमाळमधील प्रकरणात, मुलींची तस्करी करून त्यांना अनैतिक व्यवसायात ढकलण्याचा कट असावा अशीही चर्चा होती. नाशिकमधील बहुराष्ट्रीय कंपनीतील धार्मिक कंगोरे समोर येऊ लागल्याने आता मात्र, या प्रकरणांच्या तपासाच्या शोधास धार्मिक कट्टरतावादाच्या दिशेने नेण्याची गरज निर्माण झाली आहे. किशोरवयीन मुलींच्या बाबतीत प्रेमसंबंधातून घरातून पळून जाण्याचे प्रमाण लक्षणीय आहे. यामध्ये धर्मांतराचा घटक काही वेळा नंतर येऊ शकतो; परंतु ते मूळ कारण नसते. म्हणजेच, धर्मांतर हे मुलींच्या किंवा महिलांच्या बेपत्ता होण्याचे कारण नसले, तरी यानंतरचा परिणाम म्हणून याकडे डोळेझाक करता येणार नाही, असा इशारा देणारी अनेक प्रकरणेही अलिकडे उघडकीस आली आहेत. महाराष्ट्रातील अनेक भागांत मानव तस्करीचे जाळे अजूनही सक्रिय आहे. गरीब कुटुंबांतील मुलींना नोकरीच्या आमिषाने बाहेर नेले जाते आणि नंतर त्यांचे शोषण केले जाते. काही ठिकाणी अल्पवयीन मुलींचे जबरदस्तीने लग्न लावले जाते. शहरी भागांत सोशल मीडियाद्वारे ओळखी होतात, विश्वास संपादन केला जातो आणि त्यानंतर फसवणूक केली जाते. घरगुती हिंसा, शिक्षणातील खंड आणि आर्थिक असुरक्षितता हे देखील महत्त्वाचे घटक आहेत. या सर्व वास्तव समस्या असल्या तरी धर्मांतराच्या मुद्याकडे दुर्लक्ष करता येणार नाही, अशी परिस्थिती मात्र आता दिसू लागली आहे. त्याकडे दुर्लक्ष करून कालपरवापर्यंतच्या पठडीबाज कारणांनाच वास्तव समस्या मानून उपाययोजना केल्यास त्याची दिशा भरकटण्याचीही शक्यता आता नजरेआड करता येणार नाही. अर्थात, प्रत्येक प्रकरणात धर्मांतराचे कारण असेलच असे नसले तरी एकही घटना धर्मांतराशी संबंधित नाही असेही म्हणता येणार नाही. त्यामुळे, 'बेपत्ता' प्रकरणांकडे केवळ शोधमोहीम म्हणून नव्हे, तर संभाव्य गुन्ह्याच्या दृष्टिकोनातून पाहणे आवश्यक आहे. यवतमाळमधील राळेगाव तालुक्यातील ३४ आदिवासी मुली गेल्या काही महिन्यांत बेपत्ता झाल्या असून त्यांची विक्री करून धर्मांतर करण्यात आल्याच्या आरोपामुळे या भीतीत भर पडली आहे. या संदर्भातील तक्रारीनंतर पोलिसांनी गोळा केलेल्या काही कथित ध्वनिफितींमधून हाती आलेले धागेदोरे अस्वस्थ करणारे आहेत. गरीब आदिवासी मुलींना पैशांचे आमिष दाखवून त्यांची तस्करी करणे, अल्पवयीन मुलींची प्रौढ पुरुषांसोबत लग्ने लावून देणे व धर्मांतर करणे असे प्रकार घडत असल्याचा आरोप केला जात आहे. नागपुरातही काही युवतींचे लैंगिक शोषण करून धर्मांतर करण्याचा प्रयत्न झाल्याची घटना उघडकीस आली आहे. हा प्रकार गेल्या काही वर्षांपासून सुरू असावा असा पोलिसांचाही कयास आहे. त्यामुळे लैंगिक अत्याचारतून महिलांचे शोषण करणे हा धर्मांतराच्या सक्तीचा नवा कट आखला गेला असावा या भीतीने समाज अस्वस्थ आहे. राज्याच्या विधिमंडळ अधिवेशनात सक्तीच्या धर्मांतराविरोधातील विधेयक संमत झाले आहे. त्याचे कायद्यात रूपांतर होण्याची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत अशी किती प्रकरणे पुढे येत राहणार ही भीती मात्र समाजाला सतावते आहे. समाजाला निर्भय बनवायचे असेल तर या साऱ्या अधमांचा उधम रोखलाच पाहिजे! ▮


## आंतरराष्ट्रीय

# हंगेरीतील सत्तांतराचा अमेरिकेला धक्का

प्रा. जयसिंग यादव

हंगेरीचे मावळते पंतप्रधान व्हिक्टर ऑर्बन यांनी सत्तेचा वापर करून माध्यमे, न्यायव्यवस्था आणि निवडणूक यंत्रणा यांच्यावर प्रभाव टाकत जवळपास १६ वर्षे सत्तेवर पकड कायम ठेवली. त्यांच्यात आणि ट्रम्प यांच्या राजकीय कार्यक्रम पत्रिकेमध्ये साम्य आढळते, ही बाबही अनेकांच्या चर्चेचा विषय ठरली होती. ट्रम्प यांनी ऑर्बन यांच्या पुनर्निवडीसाठी जोरदार पाठिंबा दर्शविला होता. अगदी इराण युद्धाच्या पृष्ठभूमीवरही अमेरिकेचे उपाध्यक्ष जे. डी. व्हान्स यांना हंगेरीच्या बुडापेस्ट येथे पाठवून त्यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. तथापि, ऑर्बन यांच्या पराभवाने वेगळेच वास्तव अधोरेखित केले. जागतिक संघर्षांच्या छायेत परदेशातील राजकीय समीकरणांवर प्रभाव टाकण्याची अमेरिकेची क्षमता मर्यादित होत चालली आहे. या निकालाचे व्यापक परिणाम होणार हे निश्चित. ऑर्बन हे रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांचे युरोपमधील निकटचे सहयोगी मानले जात होते. त्यांनी युरोपीय महासंघाकडून युक्रेनला मिळणाऱ्या मदतीत अडथळे निर्माण केले होते. त्यांच्या पराभवामुळे युरोपीय राजकारणात नव्या घडामोडींना वेग येण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे, या निकालाचे स्वागत अमेरिकेतील दोन्ही प्रमुख पक्षांकडून करण्यात आले. काही नेत्यांनी तर इतर लोकशाही देशांच्या निवडणुकांमध्ये हस्तक्षेप करण्याच्या धोरणावरच टीका केली. लोकशाही व्यवस्थेत अखेरीस जनतेचीच भूमिका निर्णायक ठरते, असा व्यापक संदेश यावरून जातो.

लोकशाहीमध्ये कुणीही 'अपराजित' नसतो. वेळ आल्यास जनता सत्तांतर घडवून आणते, हे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. ट्रम्प आणि पुतिन यांच्यासारख्यांचा पाठिंबा, हंगेरीतील माध्यमे ताब्यात, सत्तेचे केंद्रीकरण असे सर्व प्रकार असतानाही जनतेने ऑर्बन यांची १६ वर्षांची सत्ता उलथवून टाकली. जनतेला गृहीत धरणे चुकीचे असते, हा संदेश हंगेरीच्या निवडणुकीने जगाला दिला. हंगेरीच्या राजकारणात नुकत्याच घडलेल्या सत्तांतराने युरोपीय राजकीय पटावर एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. जवळपास १६ वर्षे सत्तेवर असलेल्या व्हिक्टर ऑर्बन यांच्या नेतृत्वाखालील फिडेज या पक्षाला पराभवाचा धक्का बसणे हा केवळ निवडणूक निकाल नसून दीर्घकाळ एकाच विचारसरणीच्या वर्चस्वाला मिळालेला जनतेचा प्रतिसाद मानावा लागेल. ऑर्बन यांच्या कारकीर्दीमध्ये 'बिनउदारमतवादी लोकशाही' ही संकल्पना पुढे आली. राष्ट्रवाद, सांस्कृतिक परंपरा आणि स्थलांतरविरोधी भूमिका या त्रिसूत्रीवर त्यांनी आपली राजकीय घडी बसवली. युरोपीय महासंघासोबतचे त्यांचे संबंध अनेकदा तणावपूर्ण राहिले. न्यायव्यवस्थेतील हस्तक्षेप, माध्यम स्वातंत्र्यावरील निर्बंध आणि नागरी स्वातंत्र्यांवरील मर्यादा यामुळे हंगेरीवर वारंवार टीका झाली;



मात्र देशांतर्गत पातळीवर त्यांनी आर्थिक स्थैर्य, रोजगार आणि पारंपरिक मूल्यांचे रक्षण यांची मांडणी करून जनाधार टिकवून ठेवला. या निवडणुकीमध्ये विरोधकांनी प्रथमच एकसंध आघाडी उभी केली. विविध विचारधारांचे पक्ष एकत्र येऊन सत्ताधारी व्यवस्थेविरुद्ध लढले. या नव्या राजकीय पर्यायाने मतदारांना 'पर्याय' उपलब्ध करून दिला, जो गेल्या अनेक वर्षांमध्ये नव्हता.

निवडणुकीमध्ये शहरी मध्यमवर्ग, तरुण मतदार आणि युरोपीय मूल्यांना पाठिंबा देणारा वर्ग या बदलाच्या बाजूने उभा राहिला. महागाई, भ्रष्टाचाराचे आरोप आणि लोकशाही संस्थांवरील विश्वासाचा अभाव हे मुद्दे निर्णायक ठरले. हंगेरीतील मतदारांनी दिलेला कौल हे केवळ सत्तांतर नाही, तर संतुलनाच्या शोधाची प्रक्रिया आहे. दीर्घकाळ एकाच पक्षाच्या वर्चस्वामुळे निर्माण झालेली अस्वस्थता, सत्तेचे केंद्रीकरण आणि पर्यायांचा अभाव या घटकांनी मिळून बदलाची पायाभरणी केली. सत्ताधाऱ्यांनी माध्यमे आणि संस्थांवर प्रभाव टाकला असला, तरी डिजिटल माध्यमे आणि सामाजिक नेटवर्किंग प्लॅटफॉर्ममुळे माहितीचे पर्यायी स्रोत उपलब्ध झाले. यामुळे जनमत तयार करण्यात पारंपरिक माध्यमांच्या प्रभावाला मर्यादा आल्या. नव्या सत्ताधाऱ्यांसमोर आव्हानांची कमतरता नाही. आर्थिक स्थैर्य टिकविणे, युरोपीय महासंघाशी संबंध सुधारणा आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे लोकशाही संस्थांवरचा विश्वास पुनर्स्थापित करणे ही त्यांची प्राथमिक जबाबदारी असेल. विविध विचारसरणींच्या आघाडीला एकत्र ठेवणे हेही सोपे काम नाही. अंतर्गत मतभेद आणि धोरणात्मक विसंगती यामुळे सरकार अस्थिर होण्याची शक्यता कायम राहील. हंगेरीचा हा राजकीय बदल जागतिक पातळीवरही महत्त्वाचा संदेश देतो. लोकशाहीमध्ये कितीही मजबूत वाटणारी सत्ता असली, तरी जनतेचा कौल अंतिम असतो. राष्ट्रवाद आणि केंद्रीकरणाच्या राजकारणाला मर्यादा असतात आणि वेळोवेळी लोकशाही स्वतःचे संतुलन स्वतः साधते, हे या निकालाने अधोरेखित केले.

हंगेरीतील सत्तांतर केवळ एका देशापुरते मर्यादित न राहता युरोप तसेच जगातील लोकशाही प्रक्रियेतील बदलत्या प्रवाहांचे प्रतिबिंब आहे. आता खऱ्या अर्थाने कसोटी नव्या सत्ताधाऱ्यांची आहे. ते बदलाची आशा पूर्ण करतात की पुन्हा जुन्याच चक्रात अडकतात, हे येणारा काळच ठरवेल. तिस्झा पक्षाचे नाव आणि 'मॅग्यार' हे आडनाव हंगेरीच्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक ओळखीशी घट्ट जोडलेले आहे. म्हणजेच ऑर्बन यांची व्यवस्था संपवणारी शक्ती बाहेरून आली नव्हती, तर हंगेरीच्या आतून, त्याच राष्ट्रवादी भावनेतून उभी राहिली. हंगेरीतील सत्तांतराचा शेवटचा टप्पा समजून घेताना एक गोष्ट स्पष्टपणे जाणवते. ही केवळ निवडणुकीची कथा नाही तर समाज, विचारसरणी आणि राजकीय मर्यादांची कहाणी आहे. ऑर्बन यांची दीर्घकाळ टिकलेली सत्ता केवळ संस्थात्मक नियंत्रणावर आधारित नव्हती तर तिच्या पाठीशी एक खोल सामाजिक आधार होता. साम्यवादानंतरच्या काळात हंगेरीमध्ये उदारमतवादी बदल झाले; पण त्या बदलांनी सर्वांना समान लाभ दिला नाही. अनेकांसाठी तो काळ अस्थिरतेचा, विषमतेचा आणि मोठ्या प्रमाणावर स्थलांतराचा होता. त्यामुळे 'मजबूत राष्ट्रवादी राज्य' ही कल्पना लोकांना सुरक्षिततेची हमी देणारी वाटू लागली.

ऑर्बन यांनी याच भावनेचा अचूक वापर केला. त्यांनी विरोधकांना व्यक्ती म्हणून नव्हे, तर व्यवस्था म्हणून उभे केले. ते केवळ युरोपियन महासंघाचे केंद्र नव्हते, तर एका संपूर्ण व्यवस्थेचे प्रतीक होते; मात्र २०२२ नंतर परिस्थिती बदलू लागली. युक्रेन युद्धामुळे अर्थव्यवस्थेवर मोठा ताण आला. रशियन ऊर्जेवर अवलंबून असलेल्या हंगेरीमध्ये महागाई २५ टक्क्यांवर गेली, चलन घसरले आणि लोकांचे वास्तविक उत्पन्न कमी झाले. युरोपीय महासंघाने सुमारे ३० अब्ज युरोचा निधी रोखल्याने परिस्थिती आणखी गंभीर झाली. ऑर्बन यांनी मतदारांशी केलेला एक प्रकारचा अघोषित करार आता ढासळू लागला. शेजारी देशांची अर्थव्यवस्था पुढे जात असताना हंगेरी मागे राहू लागले. त्यातच सत्ताधाऱ्यांच्या जवळच्या लोकांची वाढती संपत्ती आणि भ्रष्टाचाराच्या आरोपांनी लोकांमध्ये असंतोष वाढवला. याच पृष्ठभूमीवर पीटर मॅग्यार यांचा उदय झाला आणि हेच ऑर्बन यांच्या व्यवस्थेसाठी सर्वात मोठे आव्हान ठरले. मॅग्यार हे बाहेरून आलेले विरोधक नव्हते तर त्या व्यवस्थेतीलच होते. त्यामुळे त्यांचा आरोप अधिक विश्वासार्ह ठरला. ही व्यवस्था भ्रष्ट आहे आणि मी ती आतून पाहिली आहे, हा त्यांचा सूर मतदारांना आश्वासक वाटला. त्यातूनच पुढचे सत्तांतरनाट्य घडून आले. ▮

(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

नितीन शिरसाट

# इंधन टंचाईवर इलेक्ट्रिक वाहन पर्याय

भविष्याचा वेगवान प्रवास आजच्या वेगाने बदलणाऱ्या जगात वाहतूक व्यवस्थेचा प्रश्न हा केवळ सोयीपुरता राहिलेला नाही तर तो पर्यावरण, अर्थव्यवस्था आणि सार्वजनिक आरोग्य यांच्याशी थेट जोडलेला आहे. वाढती लोकसंख्या, शहरीकरण, वाहनांची वाढती संख्या यामुळे वायुप्रदूषण, ध्वनिप्रदूषण, पेट्रोल, डिझेल संकट यांसारख्या समस्या गंभीर होत आहेत. या पृष्ठभूमीवर ई-बस आणि ई-बाईक यांनी केवळ पर्यायी नव्हे तर आवश्यक उपाय म्हणून स्वतःचे महत्त्व सिद्ध केले आहे. बदलत्या काळाची गरज पारंपरिक पेट्रोल-डिझेल वाहनांवर अवलंबून असलेली वाहतूक व्यवस्था आता पर्यावरणासाठी मोठा धोका ठरत आहे. हवामान बदलाचे दुष्परिणाम, उष्णतेची वाढ, अनियमित पाऊस आरोग्याच्या समस्या या सर्वांचा मूळ संबंध प्रदूषणाशी आहे. त्यामुळेच शाश्वत विकासाच्या दृष्टीने इलेक्ट्रिक वाहनांकडे वळणे ही काळाची गरज बनली आहे. ई-बस आणि ई-बाईक या केवळ नवीन तंत्रज्ञानाचे प्रतीक नसून त्या पर्यावरणपूरक आणि आर्थिकदृष्ट्या फायदेशीर पर्याय आहेत.

केंद्र व राज्य सरकारांनी आजपर्यंत मोठ्या प्रमाणावर इलेक्ट्रिक वाहनांचा प्रसार करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. ई-बस या पूर्णपणे इलेक्ट्रिक ऊर्जेवर चालतात. त्यामुळे त्यातून कार्बन डायऑक्साईड किंवा इतर घातक वायूंचे उत्सर्जन होत नाही. शहरांतील प्रदूषण कमी करण्यासाठी ई-बस अत्यंत प्रभावी ठरत आहेत. ई-बस पारंपरिक बसच्या तुलनेत खूपच कमी आवाज करतात. त्यामुळे शहरी भागात शांतता राखण्यास मदत होते. ई- बाईक, कार बसची सुरुवातीची किंमत जास्त असली तरी दीर्घकालीन दृष्टीने त्यांचा खर्च कमी असतो. इंधन खर्च, देखभाल खर्च कमी असल्यामुळे सामान्य नागरिकांना तसेच नगरपालिकांना मोठा आर्थिक फायदा होतो. अक्षय्य तृतीयेच्या मूहूर्तावर हजारो ग्राहकांनी इलेक्ट्रिक वाहनांना पसंती दिली आहे. ऑटोरिक्षाने प्रवास करणाऱ्या प्रवाशांना डिझेल व पेट्रोल टंचाई व दरवाढीचा फटका दिवसेंदिवस बसत आहे. एक किलोमीटर अंतरासाठी ऑटोचालक वीस रुपये भाडे घेतात. त्या तुलनेत ई-रिक्षाचे भाडे कमी आहे. त्याचा फटका पेट्रोल, डिझेलवर चालणाऱ्या ऑटोरिक्षांना बसला आहे. भारतातील ईव्ही क्रांतीमध्ये दोन आणि तीन चाकी वाहनांचा वाटा सर्वाधिक आहे.

केंद्र व राज्य सरकारने पीएम ई-ड्राईव्हसारख्या योजनांमुळे सबसिडी आणि पायाभूत सुविधा (चार्जिंग स्टेशन) वाढवण्यावर भर दिला आहे. देशात सार्वजनिक चार्जिंग स्टेशनच्या संख्येत मोठी वाढ झाली आहे. वाढत्या मागणीसोबतच, बॅटरीची किंमत, चार्जिंग स्टेशनची अपुरी उपलब्धता आणि वाहनांच्या उच्च सुरुवातीच्या किमती ही काही प्रमुख आव्हाने अजूनही ग्राहकांसमोर आहेत. चार्जिंग नेटवर्कच्या विस्तारामुळे नवीन मॉडेल्सच्या लाँचमुळे हा कल कायम राहण्याची शक्यता आहे. बुलढाणा एसटी आगारात १७ ई-बसेस प्रवासी सेवेत दररोज धावतात. या बसेस अमरावती, अकोला, जालना, छत्रपती संभाजी नगर जाणे येणे साधारण सहाशे-सातशे किमीपर्यंत प्रवास करतात. या बसेस वातानुकूलित असल्याने प्रवास भाडे दुप्पट आहे. तसेच कोणतीही प्रवास सवलत या बसमध्ये नाही. त्यामुळे सर्वसामान्याच्या खिशाला परवडणारी नसल्याने कमी प्रवासी प्रवास करीत असल्याने सध्या तरी तोट्यात बसेसचा प्रवास सुरू आहे. या बसेसचे भाडे लालपरी, शिवशाही बस इतकेच ठेवा अशी मागणी प्रवासी सेवा मंडळाने व प्रवाशांनी केली आहे. असे असले तरी भविष्यात इंधनाची टंचाई बघता ईव्ही वाहनांना लोकांची पसंती आहे. त्याचे अनेक फायदेही आहेत. इलेक्ट्रिक वाहने ही खूप उत्तम निवड आहे. विशेषतः आपण ज्या वातावरणात राहतो त्यासाठी व सभोवतालच्या लोकांसाठी ती महत्त्वाची आहे. येणाऱ्या काळात वाहतूक हे एक मोठे शाश्वत आव्हान आहे. त्यामुळे निर्माते आणि आपल्यासारखे लोक इलेक्ट्रिक फ्लीट वाहनांकडे वळण घेत मोठी भूमिका बजावू शकतात. पेट्रोल किंवा डिझेलवरील वाहनांच्या तुलनेत या वाहनांचा दैनंदिन खर्च व मेंटेनन्स खर्च खूप कमी असतो. सामान्य कारच्या तुलनेत ईव्हीचा मेंटेनन्स खर्च सुमारे ५० टक्के कमी असतो. इलेक्ट्रिक वाहने आरामदायी व अधिक सहज ड्रायव्हिंगचा अनुभव देतात. बॅटरीचे वजन वाहून नेण्यासाठी सस्पेंशन मजबूत असले पाहिजे. गोंगाट नसल्यामुळे चालवताना आरामदायक वाटते. मुख्य मुद्दा प्रदूषणाचा आहे. जगभरातील शहरे प्रदूषणाशी लढत असताना भारतही त्याला अपवाद नाही. सध्या जग हवामानविषयक आव्हानांना सामोरे जात असताना, भविष्यात अशी वेळ येईल की, देशातील काही भाग विशेषतः मोठ्या शहरांमध्ये शून्य उत्सर्जन झोन असतील. रस्त्यावर वाहताना इलेक्ट्रिक कार शून्य उत्सर्जन देतात. ईव्ही कोणतेही उत्सर्जन करत नाही. त्यामुळे इलेक्ट्रिक वाहने पर्यावरणपूरक आहेत आणि पुढील इंधनाचा धोका पाहता लोकांची या वाहनांना पसंती आहे. ▮

९८८१७१७८२८

## इतस्ततः

# रोजगारातील संधी आणि दर्जेदार रोजगार!

दत्तात्रेय आंबुलकर

'रायटर'चे भारताच्या आर्थिक प्रगतीच्या संदर्भात गेल्या आर्थिक वर्षासाठी केलेल्या सर्वेक्षणामध्ये या कालावधीत भारताची आर्थिक प्रगती सुमारे आठ टक्के असल्याचे आवर्जून नमूद केले असतानाच, तुलनेने रोजगार संधी कमी प्रमाणात असल्याचेही अधोरेखित केले आहे. मात्र, याच सर्वेक्षणातील तपशिलात नमूद केल्यानुसार, सध्या भारतात रोजगार संधींची कमतरता नसून विद्यार्थी-युवकांसाठी त्यांच्या इच्छा-अपेक्षांनुरूप रोजगार मिळत नसल्याचे प्रामुख्याने लक्षात येते. या मुद्यावर विशेष भर देण्यात आला असून, यातूनच दर्जेदार रोजगारांची उपलब्धता नसणे, हा नवा व महत्त्वाचा मुद्दा चर्चेला आला आहे. याच संदर्भात 'प्राईस'च्या एका अभ्यासानुसार, सध्या देशात नोकरी-रोजगार करणाऱ्या व विविध पदांवर कार्यरत असणाऱ्यांपैकी लक्षणीय संख्येतील म्हणजेच, सुमारे ४० टक्के अधिकारी-कर्मचारी हे त्यांच्या प्रचलित नोकरी-रोजगाराच्या संदर्भात समाधानी नाहीत. या कर्मचाऱ्यांच्या असमाधानी असण्याचे मोठे व महत्त्वाचे कारण म्हणजे, त्यांना मिळणारे पगार-वेतन आणि फायदे त्यांच्या अपेक्षेनुरूप नाहीत. अशी भावना असणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या लक्षणीय स्वरूपात व सुमारे ७४ टक्के इतकी या अभ्यासात नमूद करण्यात आली आहे, हे यासंदर्भात उल्लेखनीय आहे.

त्याखालोखाल आपल्या सध्याच्या नोकरी-रोजगाराबद्दल समाधानी नसणाऱ्यांपैकी १४ टक्के जणांनी पगार-वेतनातील अनियमितता, तर सहा टक्के कर्मचाऱ्यांनी त्यांना व्यवस्थापनातर्फे पुरविण्यात येणाऱ्या सामाजिक सुरक्षाविषयक तरतुदी पुरेशा नसल्याचे स्पष्ट केले आहे. यासंदर्भातील विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे, सकृद्दर्शनी राहत्या घरापासून कार्यालय वा कामाचे ठिकाण यामधील वाढते अंतर व त्यासाठी दररोज ये-जा करण्यासाठी लागणारा मोठा कालावधी व परिश्रम या मुद्यांचा उल्लेख प्रतिसाद देणाऱ्या कर्मचाऱ्यांकडून या अभ्यासात झालेला नाही. असे असले, तरी भारतातील कर्मचारी-कामगारांपुढील प्रमुख व जिव्हाळ्याचे मुद्दे मात्र यातून स्पष्ट होतात.

वर नमूद केलेले समस्यावजा मुद्दे हे केवळ असंघटित क्षेत्रातील अथवा मध्यम स्वरूपातील उद्योग-आस्थापनांमध्ये काम करणाऱ्यांशीच संबंधित आहेत, असे नाही. उलट, संघटित क्षेत्रातील कर्मचाऱ्यांना पण या समस्यांचा सामना करावा लागतो, असे स्पष्ट झाले आहे. अभ्यासातील निष्कर्षात नमूद केल्यानुसार प्रस्थापित उद्योगातील काम करणाऱ्या व भविष्य निर्वाह निधी, आरोग्य विमा, ग्रॅच्युइटी यांसारखे वेतनासह लाभ मिळणाऱ्या कर्मचाऱ्यांनासुद्धा त्यांना मिळणारे वेतन व त्याच्याशी निगडित फायदे त्यांच्या अपेक्षेपेक्षा कमी वाटतात. अभ्यासात नमूद केल्याप्रमाणे, अशा कर्मचाऱ्यांची टक्केवारी सुमारे ३५ टक्के आढळून आली. त्याचदरम्यान, देशांतर्गत संघटित क्षेत्रात काम करणाऱ्या सुमारे २५ टक्के कर्मचाऱ्यांना अद्याप आरोग्य व सामाजिक सुरक्षाविषयक फायदे अद्याप मिळत नसल्याचे दिसून येते. यामुळे या कामगार-कर्मचाऱ्यांना उदरनिर्वाहाचे साधन तर मिळते. पण, त्यांच्या वैयक्तिक व कौटुंबिक गरजांची पूर्तता होत नसल्याची भावना त्यांच्यामध्ये कायमस्वरूपी राहते. या सर्व मुद्यांवरून देशांतर्गत कर्मचारी-कामगार म्हणून काम करणाऱ्यांमध्ये प्रचलित अपेक्षांनुसार त्यांना मिळणारे वेतन, इतर सोयी व अप्रत्यक्ष आर्थिक फायदे इ. संदर्भात असमाधान असल्याचे स्पष्टपणे दिसून येते. त्यामुळेच या मंडळींचा स्वाभाविक कल हा केवळ नोकरी-रोजगार मिळविणेच नव्हे, तर त्याच्या जोडीला सध्या मिळणाऱ्या पगारापेक्षा अधिक वेतन-पगार व फायदे मिळणे यावर असतो. कर्मचाऱ्यांच्या नोकरीतील बदलांच्या संदर्भात हे एक महत्त्वाचे कारण ठरते. याच्याच जोडीला नोकरी-रोजगार मिळाल्यानंतर पदोन्नतीसह प्रगती व त्यातून पगारवाढ यावर कंपन्यांमधील प्रचलित कर्मचाऱ्यांचा स्वाभाविकपणे भर असतो. ज्या कंपन्यांमध्ये कर्मचाऱ्यांच्या कामकाज व क्षमतेनुसार त्यांना पगारवाढ व पदोन्नती दिली जाते, अशा ठिकाणी कर्मचारी साधारणतः तुलनेने अधिक वा बरेचदा दीर्घकालीन स्वरूपात कायम राहतात. यातून असे कर्मचारी व कंपनी या उभयतांची प्रगती होत जाते.

त्यामुळेच अशा मूलभूत व महत्त्वाच्या मुद्यांवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी कंपनी व कर्मचारी या उभयतांना फायदेशीर निर्णय घेऊन त्याची दीर्घकालीन व धोरणात्मक स्वरूपात अंमलबजावणी करणे उभयपक्षी फायदेशीर ठरू शकेल. यातून कंपनी-व्यवस्थापनाला कार्यक्षम कामगार-कर्मचारी, तर कर्मचाऱ्यांना समाधानकारक रोजगार संधी मिळू शकतील.

यासाठी अर्थातच, संबंधित कंपनी व उद्योगाचा आर्थिक-व्यावसायिक विकास होण्याच्या जोडीलाच स्थायी स्वरूपात आर्थिक विकास साधून, त्यातून कामगार-कर्मचाऱ्यांना दीर्घकालीन स्वरूपात फायदे होण्यासाठी पुढील उपाययोजनांचा विचार करता येईल.

**शिक्षण व कौशल्याला प्रगत तंत्रज्ञानाची साथ** : आपल्याकडे शिक्षणाची सांगड प्रामुख्याने शैक्षणिक पात्रता व अभ्यासक्रमाशी घातली जाते. विद्यार्थ्यांपासून विद्यापीठापर्यंत साधारणपणे हीच भूमिक असते. या मानसिकतेला कौशल्य विकासाची जोड देऊन प्रचलित पात्रताधारक विद्यार्थ्यांना कौशल्यप्रवण व रोजगारक्षम बनविणे खऱ्या अर्थाने आवश्यक आहे.

**रोजगारक्षम उद्योग-व्यवसायांना चालना व प्राधान्य देणे** : प्रत्येक उद्योग-व्यवसायातून रोजगारनिर्मिती होत असते. यातील रोजगारनिर्मितीचे प्रमाण कमी-अधिक होऊ शकते. मात्र, तुलनेने मोठ्या प्रमाणात व स्वरूपात रोजगारनिर्मितीसाठी रोजगाराभिमुख व अधिकाधिक रोजगारप्रवण उद्योग-व्यवसायांना चालना देणे गरजेचे ठरते. यातून पुढे अनुभवी उमेदवार-कर्मचाऱ्यांना त्यांच्या इच्छेनुसार, म्हणजेच दर्जेदार-मनाजोगते रोजगार मिळू शकतात, हे यासंदर्भात उल्लेखनीय आहे.

**कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण व विकास** : प्रचलित व नव्याने येणाऱ्या, रुजू होणाऱ्या कर्मचाऱ्यांना आवश्यकतेनुसार प्रशिक्षण देऊन त्यांचा कौशल्यांसह गुणात्मक विकास करणे फार महत्त्वाचे असल्याने, प्रत्येक व्यवस्थापन व व्यवस्थापकांनी यावर भर देणे महत्त्वाचे ठरते. यातूनच कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता व उद्योगाची विकास क्षमता या उभयतांची वाढ होते.

**धोरणात्मक निर्णय व अंमलबजावणी** : उद्योगांतर्गत व्यवसाय प्रक्रियेसाठी आवश्यक अशा प्रचलित व प्रस्तावित गरजा लक्षात घेऊन, त्याची पूर्तता करण्यासाठी कर्मचाऱ्यांना सक्षम व प्रेरित होऊन कार्यरत होण्यासाठी व्यापक स्वरूपात व कंपनी स्तरावर धोरणात्मक निर्णय घेऊन त्यांची अंमलबजावणी व्हायला हवी. तसे नियोजन व सातत्यपूर्ण प्रयत्न फार महत्त्वाचे ठरतात. आज नव्याने नोकरी-रोजगार क्षेत्रात समाविष्ट होणाऱ्या नव्या पिढीला नोकरी-रोजगाराच्या जोडीलाच पगार-पगारवाढ व प्रगतीचा ध्यास लागलेला आहे. यालाच प्रचलित परिभाषेत नवागतांच्या अपेक्षेपलीकडे जाऊन वाढत्या अपेक्षा-आकांक्षाची जोड प्राप्त झाली आहे. त्यामुळे आज कर्मचाऱ्यांच्या आकांक्षांची पूर्तता करण्याचे नवे आव्हान निर्माण झाले आहे. ▮

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)

९८२२८४७८८६

## वाचक पत्रे

### आरक्षणाला महिलांचाच विरोध

देशाच्या संसदेने महिला आरक्षण घटनादुरुस्ती विधेयक पारित केले नाही. विरोधी पक्षाने हे विधेयक नाकारले हा समस्त महिलांचा अपमान आहे. महिलांना सर्व क्षेत्रात समान संधी दिली जाते. देशातील न्यायव्यवस्थेने देखील वेळोवेळी महिलांना झुकते माप दिले आहे. पुरुष आणि महिला यांचे देशातील प्रमाण सारखे असल्याने महिलांना पुरुषांइतकेच प्रतिनिधित्व दिले पाहिजे. दोन्हीमध्ये समानता आणून सध्या महिलांवर होत असलेल्या अन्यायाला वाचा फोडता आली असती. वर्षानुवर्षे महिलांवर होत असलेला अन्याय दूर करण्यासाठी हे महिला आरक्षण विधेयक उपयुक्त ठरणारे होते. परंतु काही स्त्री लोकप्रतिनिधीच संसदेत एकत्र येऊन

### जंगल गिळणारा राक्षस

उन्हाळा सुरू होताच जंगलात आग लागण्याच्या घटनांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. दरवर्षी मार्च महिना सुरू झाला की जंगलांमध्ये वणवा लागण्याच्या घटना अचानकच सुरू होतात. काही घटना नैसर्गिक असतात तर अनेक घटना मानवनिर्मित सुद्धा असतात. जंगलात लागणारे हे वणवे विझवण्यासाठी वनकर्मचाऱ्यांचा कस लागतो. अनेकदा काही कर्मचारी आग विझवताना जखमी सुद्धा होतात. आजपर्यंत तरी वनकर्मचाऱ्यांजवळ पुरेसे साधन नसल्यामुळे त्यांना आपला जीव धोक्यात घालून या आगी विझवाव्या लागतात. आत्तासुद्धा कर्मचारी झाडांच्या फांद्या वापरून आग विझवण्याच्या त्या जुन्या पारंपारिक पद्धतीवरच अवलंबून जीव धोक्यात घालून आग विझवावी लागत आहे. मागील महिन्यात अशाच पद्धतीने आग विझवत असताना एका कर्तव्यदक्ष कर्मचाऱ्याला आपला जीव गमवावा लागला होता. यवतमाळ जिल्ह्यातील हिवरी वनपरिक्षेत्रात लागलेली आग विझवताना वनपाल विजय शिंगनजुडे यांचा होरपळून मृत्यू झाला होता. त्यांच्याकडे जंगलात लागलेली आग विझवण्यासाठी ब्लोअर पंप वगैरे सारखे कुठलेही उपकरण नव्हते. त्यामुळे ते पारंपरिक पद्धतीने झाडांच्या फांद्या वगैरे वापरून आग विझवण्याचा प्रयत्न करत होते परंतु आग काही शर्थीचे प्रयत्न करून सुद्धा त्यांना वाचवता आले नाही. यापूर्वी सुद्धा जंगलात लागलेली आग विझवताना अनेक कर्मचारी जखमी झाले आहेत परंतु शासनाने त्यापासून काहीही धडा घेतलेला दिसत नाही. आतातरी शासनाने या घटनेमधून धडा घ्यावा आणि कर्मचाऱ्यांना आग विझवण्यासाठी आधुनिक उपकरणे आणि पुरेशी सुरक्षा साधने उपलब्ध करून द्यायला हवीत. ▮

**संजीव हरिदास हेडाऊ**/९३७०१६९५८२

### एनडीएच्या चक्रव्यूहात इंडिया आघाडी धराशायी

चक्रव्यूहात, विरोधी आघाडी स्वतःहून धराशयी झाली. जर विरोधकांनी सुज्ञपणा दाखवून विधेयक पारित करण्यात सहकार्य केले असते तर त्यांना त्याचे श्रेय लाटता आले असते. संस्कृतमध्ये एक सुभाषित आहे. बुद्धीत विकृती शिरली की अशी विकृत प्रज्ञा कुलं च विभवं च यशश्च हन्ति । आज विरोधकांच्या बाबतीत, विशेषतः काँग्रेसच्या बाबतीत हेच घडते आहे. दूरदृष्टी, सारासार विवेक, सुज्ञपणा आणि सकारात्मक विचारांशी विरोधकांनी नाते तोडले आहे. तसेही आता विरोधकांकडे दूरदर्शी कृष्ण कोणी राहिला नाही. राहुल गांधींच्या अपरिपक्व नेतृत्वाखाली काँग्रेससह विरोधकांची आघाडी रसातळाला जात आहे. मात्र शशी थरूरांची अवस्था भीष्माचार्यांसारखी आहे. आहे तेथे समाधान नाही आणि धरले ते सोडवतही नाही. असे म्हणतात की माणसाळलेल्या हत्तीच्या

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# केज - धारूर रोडवरील जीवघेणा धोकेदायक पूल तात्काळ दुरुस्त करा : 29 एप्रिल रोजी रस्ता रोको

**केज/प्रतिनिधी** | खामगाव-पंढरपूर महामार्गावर केज-धारूर रोडवर साने गुरुजी निवासी Smartphone जवळचा पूल पूर्णपणे खचला असून हा पूल अत्यंत धोकेदायक स्थितीत आहे. या पुलाचे काम पूल उकलून पुन्हा नव्याने करा या मागणीसाठी केज विकास संघर्ष समितीने येत्या बुधवार दि 29 एप्रिल रोजी सकाळी 10 वाजता केज-धारूर रोडवर पुलाच्या ठिकाणीच तांबवा व परिसरातील नागरिकांच्या सहभागाने बेमुदत रस्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा समितीच्या वतीने सामाजिक कार्यकर्ते हनुमंत भोसले यांनी दिला आहे.

खामगाव-पंढरपूर महामार्गावर केज ते माजलगाव दरम्यानचे रस्त्याचे काम अत्यंत निकृष्ठ दर्जाचे झाल्याने हा रस्ता वाहतूकीसाठी अत्यंत धोकेदायक बनला आहे. केज नजीक सानेगुरुजी विद्याल्याजवळचा पूल गेली अनेक वर्षांपासून खड्डे पडल्याने धोकेदायक बनला आहे. वेळोवेळी मागणी केल्यानंतर पुलाचे काम तात्पुरते केले गेल्याने सतत या भागातील नागरिकांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. तांबवा व परिसरातील नागरिकांना हा पूल म्हणजे मृत्यूचा सापळा बनला आहे. या रस्त्यावरून प्रथमच प्रवास करणाऱ्या दूर गावच्या वाहनचालकांच्या पुलावर पडलेले खड्डे लक्षात येत नसल्याने सतत अपघात घडत आहेत. 21 एप्रिल रोजी सकाळी 11 च्या सुमारास याच ठिकाणी दुचाकीचा अपघात होऊन दुचाकीवरील महिला व पुरुष गंभीर जखमी झालेले आहेत.

आजपर्यंत या खचलेल्या पुलावर अनेक अपघात झाले आहेत ज्यामध्ये कांही लोकांचे प्राणही गेले आहेत.

त्यामुळे हा पूल आता त्यातील सर्व दोष दूर करून नव्यानेच त्याचे बांधकाम करावे या मागणीसाठी केज विकास संघर्ष समितीने या परिसरातील नागरिकांच्या सहभागाने 29 एप्रिल रोजी सकाळी ठीक 10 वाजता पुलाच्या ठिकाणी रस्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा समितीच्यावतीने दिला आहे.

# नारीशक्ती वंदन अधिनियमाला विरोध; काँग्रेसचा महिलांच्या हक्कांवर राजकीय घाला : शंकर देशमुख

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यात प्रमुख प्रशासकीय पदांवर महिलांना संधी दिली



बीड दि. — देशाच्या राजकीय इतिहासात महिलांना समान प्रतिनिधित्व देण्याच्या दृष्टीने मैलाचा दगड ठरणाऱ्या नारीशक्ती वंदन अधिनियम विधेयकाला काँग्रेससह विरोधी पक्षांनी दर्शविलेला विरोध हा केवळ राजकीय दुटप्पीपणा नसून देशातील सुमारे ७० कोटी महिलांच्या हक्कांवर घाला असल्याची जोरदार टीका भाजपचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी केली आहे.

महिलांच्या सक्षमीकरणाच्या निर्णायक टप्प्यावर विरोधकांनी अडथळे निर्माण करून आपली महिलाविरोधी मानसिकता उघड केली असल्याचा आरोपही त्यांनी केला.

शंकर देशमुख यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या सक्षम आणि दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाखाली केंद्र सरकारने महिलांना राजकीय, सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रात समान संधी मिळावी यासाठी ऐतिहासिक पावले उचलली आहेत. नारीशक्ती वंदन अधिनियम हा महिलांना सत्तेच्या केंद्रस्थानी नेणारा क्रांतिकारी निर्णय असून, यामुळे देशाच्या लोकशाही व्यवस्थेत सकारात्मक परिवर्तन घडणार आहे. मात्र, काँग्रेससह काही विरोधी पक्षांनी केवळ राजकीय अस्तित्व टिकवण्यासाठी या विधेयकाला विरोध करून महिलांच्या प्रगतीच्या मार्गात अडथळे निर्माण केले आहेत. "महिलांना ३३ टक्के आरक्षण देण्याच्या या निर्णयाला विरोध करणे म्हणजे त्यांच्या स्वप्नांवर पाणी फेरण्यासारखे आहे," असे देशमुख यांनी ठामपणे सांगितले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या काही वर्षांत महिलांना केवळ सामाजिकच नव्हे तर राजकीय व आर्थिक स्तरावरही सक्षम करण्यासाठी अनेक महत्त्वपूर्ण योजना राबवल्या आहेत. 'बेटी बचाओ, बेटी पढाओ', 'उज्ज्वला योजना' यांसारख्या उपक्रमांमुळे महिलांच्या जीवनमानात मोठा बदल घडून आला आहे. त्याचबरोबर प्रशासनातील विविध उच्च पदांवर महिलांना संधी देऊन त्यांच्या नेतृत्वगुणांना चालना दिली गेली आहे. राज्यातही महिलांच्या सक्षमीकरणासाठी ठोस पावले उचलण्यात आली असल्याचे सांगताना त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसजी यांच्या कार्याचा विशेष उल्लेख केला. त्यांच्या नेतृत्वाखाली राज्य प्रशासनातील सर्वोच्च आणि निर्णायक पदांवर महिलांची नियुक्ती करून प्रत्यक्ष सत्ताकेंद्रात महिलांना स्थान देण्याचे काम करण्यात आले. मनीषा म्हैसकर, सुजाता सौनिक , रश्मि शुक्ला अश्विनी भिडे तसेच इतर वरिष्ठ महिला अधिकाऱ्यांना महत्त्वाच्या जबाबदाऱ्या देत प्रशासनात महिलांचे नेतृत्व सक्षम करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. देशमुख यांनी पुढे म्हटले की, "महिलांना केवळ घोषणांमध्ये नव्हे तर प्रत्यक्ष निर्णयप्रक्रियेत स्थान देण्याचा आमचा ठाम प्रयत्न आहे. मात्र विरोधकांना महिलांचे सशक्तीकरण नको असून त्यांना केवळ मतांसाठी महिलांचा वापर करायचा आहे, हे त्यांच्या भूमिकेतून स्पष्ट झाले आहे."

या पार्श्वभूमीवर भाजपच्या वतीने विरोधी पक्षांच्या भूमिकेचा तीव्र शब्दांत निषेध करण्यात येत असून, आगामी काळात महिलांच्या सन्मान आणि हक्कांसाठी जनआंदोलन उभारण्याचा इशाराही देशमुख यांनी दिला. महिलांच्या सक्षमीकरणासाठी केंद्र व राज्य सरकार कटिबद्ध असल्याचे शंकर देशमुख यांनी प्रसिद्धी पत्रक म्हटले आहे

# धारूर पोलिसांची कारवाई; गावठी दारूसह मोटारसायकल जप्त

**धारूर (प्रतिनिधी)** | धारूर पोलीस स्टेशनचे कर्तव्यदक्ष प्रभारी अधिकारी सपोनि. देवदास वाघमोडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी अवैध धंद्यांविरुद्ध धडक मोहीम उघडली आहे. काल रात्री कासारी फाटा येथे करण्यात आलेल्या एका धाडसी कारवाईत पोलिसांनी गावठी दारूच्या बाटल्या आणि एक मोटारसायकल असा एकूण १,०२,८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून एका आरोपीला बेड्या ठोकल्या आहेत.

या कारवाईबाबत मिळालेली सविस्तर माहिती अशी की, दिनांक २० एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ७:०० वाजेच्या सुमारास धारूर ते कासारी फाटा दरम्यान एक इसम बेकायदेशीर रित्या दारूची वाहतूक करत असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे सपोनि. देवदास वाघमोडे यांनी तातडीने पथक रवाना केले. कासारी फाटा येथे सापळा लावून पोलिसांनी संशयित मोटारसायकल अडवली असता, आरोपी बाळू अंबादास मैंद (वय ३० वर्षे, रा. मैंदवाडी, ता. धारूर) याच्या ताब्यात पांढऱ्या पिशवीत देशी दारू 'बॉबी संत्रा' कंपनीच्या ७० सीलबंद बाटल्या मिळून आल्या.

**पोलिसांची धडक कामगिरी** | या कारवाईमध्ये पोलिसांनी २,८०० रुपये किमतीची दारू, ९०,००० रुपये किमतीची होंडा शाइन मोटारसायकल (क्र. MH-44-AF-8467) आणि १०,००० रुपये किमतीचा व्हिवो कंपनीचा मोबाईल असा एकूण १ लाख २ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. आरोपीविरुद्ध दारूबंदी कायद्याच्या कलम ६५ (ई) आणि ८१ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**वाघमोडे यांच्या नेतृत्वाचे कौतुक** | सपोनि. देवदास वाघमोडे यांनी पदभार स्वीकारल्यापासून तालुक्यातील गुन्हेगारी आणि अवैध व्यवसायांवर वचक निर्माण केला आहे. त्यांच्या या विशेष कार्यतत्परतेमुळे आणि प्रभावी नेतृत्वामुळेच ही यशस्वी कारवाई पार पडली. या कारवाईत फिर्यादी पोह/९५३ शिवाजी श्रीराम सानप यांच्यासह दाखल अधिकारी पोह/९६९ घुले आणि तपास अधिकारी पोह/१३०५ पुरी यांनी अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली. वाघमोडे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी दाखवलेल्या या कर्तव्यनिष्ठेबद्दल सर्व स्तरांतून त्यांचे विशेष कौतुक होत आहे. तालुक्यात शांतता आणि सुव्यवस्था राखण्यासाठी अशा कारवाया यापुढेही सुरूच राहतील, असा ठाम विश्वास पोलीस प्रशासनाकडून व्यक्त करण्यात आला आहे.

# सिरसदेवी तलवडा येथील अंमली पदार्थ गांजा विक्रेत्यावर छापा; 08 किलो 888 ग्रॅम गांजा जप्त



**बीड** | पोलीस निरीक्षक श्री. शिवाजी बंटेवाड स्थानिक गुन्हे शाखा बीड यांना गुप्त बातमीदारा मार्फत माहिती मिळाली की, मौजे सिरसदेवी ता. गेवराई जि.बीड गावामध्ये एक इसम अंमली पदार्थ गांजा जवळ बाळगुन त्याची चोरटी विक्री करत आहे.

मिळालेल्या बातमीच्या ठिकाणी जावुन खात्री करून कारवाई करण्याचे आदेश पोलीस निरीक्षक श्री. शिवाजी बंटेवाड यांनी पोउपनि सुशांत सुतळे, पोह/आनंद मस्के, विकास राठोड, राहुल शिंदे, अंकुश वरपे, बबन सलगर, चापोह अतुल हराळे तसेच पोस्टे तलवडा येथील सपोनि जंजाळ, पोउपनि अन्नलदास, पोह/देवकते, गडदे, जावळे, राठोड, जाधव व मपोअ/मदने असेंना आदेश दिल्याने सदर पथकाने नमुद ठिकाणी जावुन मौजे सिरसदेवी येथील इसम नामे शेख रईस शेख युसूफ वय 25 वर्षे रा.सिरसदेवी ता. गेवराई जि.बीड याच्या राहते घरी छापा टाकुन त्याच्या राहते घरातुन बेकायदेशिररित्या 8 किलो 888 ग्रॅम वजनाचा किंमती 2,66,640/- रूपयाचा अंमली पदार्थ गांजा विक्री करण्यासाठी जवळ बाळगतांना मिळुन आला म्हणुन त्याचे विरूध्द पोस्टे तलवडा येथे गुरन. 120/2026 कलम 8(क), 20 (ब) एनडीपीएस अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी मा. पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत, मा. अप्पर पोलीस अधीक्षक श्री. सचिन पांडकर, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. अनिल कटके, पोलीस निरीक्षक श्री. शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोउपनि सुशांत सुतळे, पोह/आनंद मस्के, विकास राठोड, राहुल शिंदे, अंकुश वरपे, बबन सलगर, चापोह /अतुल हराळे व पोस्टे तलवडा येथील सपोनि जंजाळ, पोउपनि अन्नलदास, पोह/ देवकते, गडदे, जावळे, राठोड, जाधव व मपोअ/मदने सर्व नेमणुक पोलीस ठाणे तलवडा यांनी मिळून केली आहे.

# केज येथे चाईल्ड प्रायमरी स्कूलचा "स्वराज्य बालमहोत्सव – 2026" उत्साहात संपन्न

**केज (प्रतिनिधी)** | येथील चाईल्ड प्रायमरी स्कूलच्या वतीने आयोजित "स्वराज्य बालमहोत्सव – 2026" हा वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रम मोठ्या उत्साहात व जल्लोषात संपन्न झाला. कार्यक्रमाला विविध क्षेत्रातील मान्यवर, पालक, पत्रकार तसेच नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाचे उद्घाटन गट शिक्षणाधिकारी मा. श्री. सुनीलजी केंद्रे यांच्या हस्ते करण्यात आले, तर अध्यक्षस्थानी केंद्र प्रमुख मा. श्री. संजयजी चौरे होते. या प्रसंगी अंबा सहकारी साखर कारखाना, अंबाजोगाईचे चेअरमन मा. श्री. रमेशरावजी आडसकर साहेब विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते.

तसेच प्रमुख अतिथी म्हणून मा. श्री. भाई मोहन गुंड, मा. श्री. डॉ. हनुमंतजी सौदागर, मा. श्री. हनुमंतजी भोसले, मा. श्री. डॉ. नागेशजी कराळे, मा. श्री. ॲड. अविनाशजी धायगुडे, मा. श्री. शिवाजी (दादा) ठोंबरे, मा. श्री. कृष्णाजी थोरात, मा. श्री. गोविंदजी ससाणे, मा. श्री. उपेंद्रजी शिंदे, मा. श्री. ज्ञानेश्वर बिराजदार, मा. श्री. एच. पी. देशमुख, मा. श्री. शरीफजी सय्यद, मा. श्री. चंद्रकांतजी पाटील, मा. श्री. दत्ताजी मुजमुले, मा. श्री. अनिलजी गलांडे, मा. श्री. विष्णु (आबा) तपसे, मा. श्री. मदन (बप्पा) तपसे, मा. श्री. अजयजी चाटे, मा. श्री. साईनाथजी गावडे, मा. श्री. अलीमजी सय्यद, मा. श्री. अक्षयजी येवले आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली.

या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी नृत्य, गीत, नाटिका, शेतकरी गीत तसेच देशभक्तीपर सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. लहानग्या विद्यार्थ्यांच्या आकर्षक व रंगतदार सादरीकरणामुळे प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना उपस्थितांनी भरभरून दाद दिली.

# लाच घेताना महिला एसीबीच्या जाळ्यात

## लाचखोरांचा सुळसुळाट ! सोलर प्रकल्प पडताळणीसाठी मागितली लाच

**बीड(प्रतिनिधी)** | बीड जिल्ह्यात लाचखोरीचे प्रकार दिवसेंदिवस वाढत असल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे. विशेष म्हणजे, गेवराई तालुक्यात ग्रामसेवकाला लाच घेताना रंगेहात पकडल्याची घटना ताजी असतानाच अवघ्या २४ तासांत आष्टी येथे महिला सहाय्यक अभियंता एसीबीच्या जाळ्यात अडकल्याने जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे.

या कारवाईमुळे पुन्हा एकदा सिद्ध झाली की बीड जिल्ह्यात लाच मागण्याच्या प्रमाणात प्रचंड वाढ झाली असून कोणत्याही शासकीय निमशासकीय कार्यालयात पैसे दिल्याशिवाय कामात होत नसल्याच्या तक्रारी देखील आहेत. लाच मागण्यांमध्ये महिला कर्मचारी अधिकारी देखील कमी नाहीत हे या कारवाईवरून सिद्ध झाले आहे. मंगळवारी (दि. २१) आष्टी येथील महावितरण कार्यालयातील सहाय्यक अभियंता कोमल शिंदे यांना १८ हजार रुपयांची लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) रंगेहात अटक केली.

मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदाराच्या सोलर प्रकल्पाची पडताळणी करून देण्यासाठी शिंदे यांनी १८ हजार रुपयांची मागणी केली होती. तक्रारदाराने याबाबत एसीबीकडे तक्रार दाखल केल्यानंतर सापळा रचण्यात आला.

दरम्यान, तक्रारदाराकडून लाच स्वीकारताना एसीबीच्या पथकाने शिंदे यांना रंगेहात पकडले. ही कारवाई उपअधीक्षक सोपान चिटमपल्ले यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. मागील दोन महिन्यापासून लाचखोरावर होत असलेल्या सलग कारवायांमुळे महावितरणसह शासकीय विभागांत खळबळ उडाली असून एसीबीकडून पुढील तपास सुरू आहे. या कारवाईत मच्छिंद्र बीडकर, अमोल खरसाडे, प्रदीप सुरवसे आणि अंबादास पुरी यांनी सहभाग घेतला.



लोकनेते विनायकराव मेटे साहेब यांचे सहकारी महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे मा.श्री.विष्णु चव्हाण साहेब यांची कन्या कु हर्षदा चव्हाण यांची Town Planner या पदासाठी MPSC मार्फत घेतलेल्या परीक्षेत महाराष्ट्रतुन ७ वा रँक मिळवून निवड झाल्याबद्दल सत्कार करतांना सुहास पाटील,मा नगरसेवक श्री.अरुण चौरे व श्री.विष्णु चव्हाण साहेब.

# विश्वंभर कोकिळ जीवन विकास व्याख्यानमाला : पुष्प- 1 ले

## संतवाङमय मानवाला बाह्य जगतापेक्षा अंतर्मुख होऊन स्वतःचा शोध घेण्यास प्रवृत्त करते - ह.भ.प. प्रणव महाराज पटवारी

**केज प्रतिनिधी: दि. २१ एप्रिल** | संतवाङमय हे केवळ धार्मिक नसून ते मानवी मूल्यांचे संवर्धन करणारे एक समाजशास्त्र आहे. साक्षर असणे म्हणजे सुशिक्षित असणे नव्हे, संत हे साक्षर नसले तरी ते सुशिक्षित होते. वर्तमान काळातील हिंसक आणि स्वार्थी मानसिकतेला योग्य दिशा देण्यासाठी संतांचे विचार आत्मसात करण्याची गरज आहे. पूर्वी ज्ञानाची प्रचंड भूक होती, परंतु पर्यायी साधने उपलब्ध नव्हती. दुर्मिळ गोष्ट मिळवायला कष्ट लागते. संतवाणीतूनच शुद्ध आचरण कसे असावे हे स्पष्ट होते. काळ कुठलाही असो संतांची प्रासंगिकता कायम तीच राहते. कारण माध्यम जरी बदलली तरी नैतिक मूल्यांची आवश्यकता बदलत नाही. संतवाङमय हे अनुभवातून निर्मिलेले साहित्य आहे. तसेच संत साहित्य हे मानवाला बाह्य जगतापेक्षा अंतर्मुख होऊन स्वतःचा शोध घेण्यास प्रवृत्त करते असे प्रतिपादन ह.भ.प. प्रणव महाराज पटवारी यांनी केले.

केज येथील स्वामी विवेकानंद विद्या मंदिर या शाळेमध्ये दि. २० एप्रिल वार सोमवार पासून स्व. विश्वंभर कोकिळ जीवन विकास व्याख्यान मालेला नुकतीच सुरुवात झाली. यावर्षी या व्याख्यानमालेने २६ व्या वर्षात पदार्पण केले. तेंव्हा या व्याख्यानमालेचा शुभारंभ प्रमुख वक्ते ह.भ.प. प्रणव महाराज पटवारी कवी, लेखक, प्रबोधनकार, माजलगाव. यांच्या शुभहस्ते दिपप्रज्वलनाने झाला. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून ह.भ.प. केशव महाराज शास्त्री भगवान श्रीकृष्ण आश्रम बीड रोड केज. हे उपस्थित होते. इतर मान्यवर उपस्थितीमध्ये संस्थेचे सचिव जी. बी. गदळे, सहसचिव उपेंद्र कोकीळ, कोषाध्यक्ष फजीलोद्दीन काजी आदी उपस्थित होते.

# मराठी पत्रकार परिषदेच्या राष्ट्रीय अधिवेशनात मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख यांच्याकडून वैद्यकीय मदत कक्षाचे कौतुक..!

## आरोग्य कक्षप्रमुख डॉ.राजेश इंगोले यांची पत्रकारांसाठी वैद्यकीय मदत कक्षाची संकल्पना ; 350 पत्रकारांची तपासणी




**अंबाजोगाई** | अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या उदगीर येथे नुकत्याच आयोजित केलेल्या 44 व्या राष्ट्रीय अधिवेशनात मराठी पत्रकार परिषदेचे महाराष्ट्र राज्याचे आरोग्य कक्षप्रमुख डॉ.राजेश इंगोले यांच्या अभिनव संकल्पनेतून या राष्ट्रीय अधिवेशनात पत्रकारांसाठी आरोग्याची समस्या निर्माण झाल्यास आपत्कालीन व बाह्य रूग्ण विभाग असलेला वैद्यकीय मदत कक्ष स्थापन करण्यात आला होता. मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख यांच्याकडून वैद्यकीय मदत कक्षाचे कौतुक केले. या कक्षाच्या माध्यमातून 350 पत्रकारांची तपासणी करण्यात आली.

अधिवेशना दरम्यान एखाद्या पत्रकाराला आरोग्याची काही समस्या निर्माण झाल्यास त्याला तात्काळ वैद्यकीय मदत मिळावी यासाठी हा कक्ष स्थापन करण्यात आला होता अशी माहिती मराठी पत्रकार परिषदेचे वैद्यकीय कक्षप्रमुख डॉ.राजेश इंगोले यांनी यावेळी दिली. या अभिनव उपक्रमाचे मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त माननीय एस.एम. देशमुख यांनी कौतुक करीत डॉ.राजेश इंगोले यांचे अभिनंदन केले. पत्रकारांच्या आरोग्यांप्रती संवेदनशील असणारा डॉक्टर या शब्दांत एस.एम.देशमुख यांनी डॉ.इंगोले यांचे कौतुक केले. यावेळी प्रत्यक्ष एस.एम. देशमुख यांनी या वैद्यकीय मदत कक्षाला भेट देऊन, पाहणी करत व यांश कक्षात स्वतःची आरोग्य तपासणी करून या उपक्रमाचे विशेष कौतुक केले. यावेळी बोलताना मुख्य विश्वस्त एस.एम. देशमुख यांनी पत्रकारांनी आपले आरोग्य जपले पाहिजे. कारण, जीवनातील ताण-तणावामुळे व पत्रकार यांच्या धकाधकीच्या आयुष्यामुळे पत्रकारांना त्यांच्या आरोग्याकडे लक्ष देणे सहजपणे शक्य होत नाही. त्यामुळे अनेक पत्रकारांवर आरोग्याकडे केलेल्या दुर्लक्षामुळे अकाली डायबेटीस, रक्तदाब व इतर गंभीर आजारांना तोंड द्यावे लागते. नियमित तपासणी केल्यास या मोठ्या आजारांना वेळीच प्रतिबंध केला जाऊ शकतो. डॉ.राजेश इंगोले यांच्या माध्यमातून मराठी पत्रकार परिषदेला सक्षम असा वैद्यकीय कक्ष प्रमुख मिळाला आहे. आगामी काळामध्ये प्रत्येक तालुक्यामध्ये मराठी पत्रकार परिषदेच्या वैद्यकीय कक्षाची स्थापना डॉ.राजेश इंगोले यांच्या मार्गदर्शनाखाली करून पत्रकारांच्या आरोग्याला जपण्याचे काम मराठी पत्रकार परिषद करणार असल्याचे सुतोवाच मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख यांनी यावेळी केले. महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यामध्ये वैद्यकीय कक्षाची कार्यकारणी लवकरच डॉ.इंगोले हे जाहीर करणार आहेत अशी माहिती श्री. देशमुख यांनी यावेळी दिली. अधिक माहिती देताना वैद्यकीय कक्षप्रमुख डॉ.राजेश इंगोले यांनी मुख्य विश्वस्त देशमुख सरांच्या सूचनेनुसार महाराष्ट्रामध्ये प्रत्येक तालुक्यात पत्रकारांसाठी वैद्यकीय कक्ष स्थापन केला जाणार आहे. तालुकास्तरीय कार्यकारणीच्या निवडी लवकरच घोषित करणार असल्याची माहिती त्यांनी दिली. वैद्यकीय कक्षाच्या मदतीने महाराष्ट्रामध्ये पत्रकारांसाठी वर्षातून एकदा मोफत आरोग्य तपासणी शिबिर तसेच आवश्यक असलेल्या रक्त तपासण्या ही मोफत करून देणार असल्याची माहिती डॉ.राजेश इंगोले यांनी यावेळी प्रसिद्धी माध्यमांना दिली. यावेळी मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त किरण नाईक, शरद पाबळे, राज्यअध्यक्ष मिलिंद अष्टीवकर, शिवराज काटकर, सुरेश नाईकवाडे, मन्सूर भाई शेख, रवी उबाळे, अनिल वाघमारे, शोभा जयपुरकर, दीपक केतके, संदीप कुलकर्णी यांच्यासह संयोजन समितीचे सचिन शिवशेट्टी, युवराज धोत्रे, विभीषण, अर्जुन जाधव, सिद्धार्थ सूर्यवंशी यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ.राजेश इंगोले यांचा हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी

# डोकेवाडा हरिनाम सप्ताहाची सांगता!

## महंत प्रेममुर्ती शिवाजी महाराजांचे आशीर्वाद सदैव बहुजनांच्या पाठीशी— राजेंद्र मस्के

**बीड प्रतिनिधी** | महाराष्ट्राच्या समृद्ध संतपरंपरेचा वारसा जपत गावोगावी अखंड हरिनाम सप्ताह मोठ्या उत्साहात साजरे केले जातात. संत परंपरे नुसार नामस्मरण आणि ज्ञान भक्तीचा आनंद प्रत्येक अनुयायी घेतो.

भागवत धर्माचा हा जागर समाजात भक्ती, समता आणि मानवतेचा संदेश रुजवतो. "राम कृष्ण हरी" नाम गजरातून सर्वजण एकत्र येत समतेचा मूलमंत्र दृढ होतो, असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी केले.

श्रीक्षेत्र नारायण गडाच्या मा माध्यमातून महंत शिवाजी महाराज यांचे अध्यात्मिक मार्गदर्शन व संस्काराचे पुण्य कर्म अविरतपणे चालू आहे. त्यांच्या कार्यामुळे लोकांना दिलासा मिळतो.

त्यांचे कार्य आणि आशीर्वाद सदैव बहुजनांच्या पाठीशी आहेत असा विश्वास यावेळी राजेंद्र मस्के यांनी व्यक्त केला.

वार्षिक परंपरेनुसार श्री क्षेत्र नारायण गडाचे महंत हभप शिवाजी महाराज यांच्या मार्गदर्शना खालील मौ.डोकेवाडा, वाळेकरवाडा-कदमवाडी येथील अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता प्रेममुर्ती शिवाजी महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत हभप गवते महाराज यांच्या काल्याच्या कीर्तनाने उत्साह पूर्ण वातावरणात संपन्न झाली. याप्रसंगी


श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थांनचे हभप तुकाराम महाराज भारती राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष श्री राजेंद्रजी मस्के, प्रा. निवृत्ती डोके यांनी उपस्थित राहून अध्यात्मिक सोहळ्याचा आनंद घेतला व उपस्थित भाविक भक्तांची संवाद साधला.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## संक्षिप्त...

## औराद शहाजानी येथे उष्माघाताने एका शेतकऱ्याचा मृत्यू



**तभा वृत्तसेवा**

**निलंगा दि. २१ एप्रिल :** तालुक्यातील औराद शहाजानी येथे गेल्या पंधरा दिवसापासून सातत्याने उन्हाची तीव्रता वाढून तापमानाचा पारा चाळीस अंशाच्या पुढे राहिला यातच सोमवारी येथील शेतकरी लक्ष्मण दादाराव भंडारे वय ६० हे काम करत असताना अचानक खाली पडले शरीरातील पाण्याची पातळी कमी होऊन तीव्र झटका आल्याने उष्माघाताने मृत्यू झाला आहे

निलंगा तालुक्यातील औराद शहाजनी परिसरामध्ये एप्रिल महिन्याच्या सुरुवाती पासून उन्हाची तीव्रता वाढत गेल्याने कमाल तापमान ४० अंशाच्या पुढे जात ४२.८ अंशापर्यत पोहोचले तर किमान तापमान ३१.५ अंशावर पोहोचल्याने रात्रंदिवस अंगाची लाही लाही होत आहे यातच येथील शेतकरी लक्ष्मण दादाराव भंडारे वय वर्ष साठ हे आपल्या शेतात सोमवारी दुपारनंतर साधारणतः चारच्या दरम्यान काम करत असताना अचानक जमिनीवर कोसळले त्यांना उपचारासाठी औराद येथील खाजगी रुग्णालयात नेण्यात आले संबंधित शेतकऱ्याची परिस्थिती नाजूक असल्याने पुढील उपचारासाठी डॉक्टरांनी त्यांना निलंगा पाठवले दरम्यान वाटतच त्यांचा मृत्यू झाला त्यांच्यावरती मंगळवारी सकाळी ११ वाजता अंत्यविधी करण्यात आले .

त्यांच्या पश्र्चात पत्नी एक मुलगा पाच मुली सुन नातु असा परिवार आहे याविषयी डॉ मल्लिकार्जुन शंकद यांच्याशी संपर्क केला असता संबंधित शेतकरी दिवसभर शेतीमध्ये उन्हात काम करत होता. उन्हाची तीव्रता जास्त असल्याने शरीरातील पाणी पातळी कमी झाली परिणामी तीव्र हृदयविकाराचा झटका आल्याने रुग्णालयात पुढील उपचारासाठी पाठवण्यात आले असता तो दगावला आहे. म्हणजे एकंदरीत हा उष्माघाताचा बळी गेला आहे

## पोलिसांकडून ८९ हजारांची अवैध दारू जप्त

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २१ एप्रिल :** अवैध दारू विक्री व हातभट्टी निर्मितीवर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने रविवारी (दि.१९) लातूर तालुक्यातील माटेफळ येथे कारवाई केली. यात एकूण ८९ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. १ हजार २०० लिटर रसायन जागेवरच नष्ट करण्यात आले.

माटेफळच्या अण्णाभाऊ साठे चौक परिसरात एकजण बेकायदेशीररित्या देशी दारूची विक्री करीत असल्याचे समजले. त्यामुळे स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने

छापा टाकला. त्यावेळी आरोपी गोविंद दिगंबर खोसे (वय ३८, रा. माटेफळ) यास ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडून देशी दारूच्या ३ हजार ५०० रुपये किमतीच्या ७० सीलबंद बाटल्या जप्त करण्यात आल्या. माटेफळ शिवारातील तळ्याजवळ दुसरी कारवाई करण्यात आली. यात आरोपी मलकू विठोबा पवार (वय ४७, रा. तुकाई नगर, मुरुड) यास ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडून ६ प्लॅस्टिक बॅरलमध्ये साठवलेले १ हजार २०० लिटर आंबट रसायन, २० लिट गावठी दारू असा एकूण ८६ हजार रुपयांच असा दोन्ही कारवाईत एकूण ८९ हजा ५०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्या आला आहे. ही कारवाई उपनिरीक्षक प्रमो देशमुख, अंमलदार संजय कांबळे, सूर्यकांत कलमे, तुळशीराम बरुरे, गोविंद भोसले पाराजी पुढेवाड, प्रदीप चोपणे, सहायक फौजदार हिंगमिरे, बाबासाहेब खोपे यांनी केली. दोन्ही प्रकरणांत आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## अपघाताचा एक महिन्यानंतर गुन्हा दाखल

तभा वृत्तसेवा

औसा दि. २१ एप्रिल : कामावरून घरी परत जात असताना एकाला रॉग साइडने आलेल्या दुचाकीने जोरदार धडक दिली. ही घटना गेल्या महिन्यात घडली असून याप्रकरणी भादा पोलिसांत तक्रारदाराने एक महिन्यानंतर फिर्याद दिली असता पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

१४ मार्च रोजी विश्र्वनाथ रूद्रप्पा स्वामी (वय ३६) रा. लिंबाळा दाऊ हे कामावरून घरी जात असताना आरोपी अमान सय्यद रा. उजनी याने आपली एम एच १३ सीएल ४१८७ ही दुचाकी निष्काळजीने चालवून फिर्यादीला पाठीमागून जोरात धडक देऊन जखमी केले. सदरील प्रकरणाबाबत सोमवार २० रोजी जखमी विश्र्वनाथ स्वामी यांनी फिर्याद दिली असता भादा पोलिसांनी पोलिसांनी आरोपी अमान सय्यद विरूद्ध गु. र. नं ६१/२०२६ विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.

# परमार्थाची कास धरणे गरजेचे : हभप बाळकृष्ण महाराज

**तभा वृत्तसेवा**

**औसा दि. २१ एप्रिल** : गळ्यात तुळशीची माळ, कपाळावर गंध,आणि वारीपुरताच परमार्थ मर्यादीत नाही. तर समाजाच्या कल्याणाकरिता आपण काय योगदान दिले आहे. आणि हे योगदान देण्याचे धाडस, दानत बंद पडलेला साखर कारखाना पुन्हा सढळ हातानी मदत करुन नव्या दमाने उभा करुन बेरोजगारांना रोजगार, शेतर्कयांच्या जिवनात आर्थिक क्रांती घडवून आणली.असा बदल घडवणारे सहकार महर्षी दिलीपराव देशमुख आहेत. त्यामुळेच अध्यात्मिक संस्कारातून वाढदिवस साजरा होत असून हेच खरे परमार्थाचे मोजमाप आहे.असे मत हभप बाळकृष्ण वसंतगडकर महाराज यांनी व्यक्त केले.

तालुक्यातील मातोळा येथे माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्या ७६ व्या वाढदिवसानिमित्त संत शिरोमणी मारुती महाराज साखर कारखान्याचे चेअरमन शाम भोसले व जिल्हा परिषदेच्या नुतन सदस्या सौ. दिपालीताई शाम भोसले यांच्या पुढाकारातून किर्तन सोहळा झाला. त्यावेळी ते बोलत होते.या किर्तसोहळ्याचा मातोळा परिसरासह तालुक्यातील पाच हजाराहून अधिक गावकऱ्यांनी सत्संग सोहळ्याचा लाभ घेतला.

हभप बाळकृष्ण महाराज म्हणाले,देह नाशिवंत असला तरी आत्मा अमर आहे. मनुष्य आपल्या कर्मानुसार जन्म घेत राहतो.या चौऱ्याऐंशी लक्ष फेंऱ्या चुकवायचा असतील तर अहंकाराचा त्याग करून परमार्थाची कास धरणे गरजेचे आहे, अहंकार हाच सर्व दुःखांचे मूळ आहे. मनुष्य जन्मभर द्वेष, राग, लोभ आणि मत्सराच्या स्पर्धेत अडकून राहतो. पण संतांचे जीवन हे निरहंकारी आणि शांत असते.असे स्पष्टीकरण हभप बाळकृष्ण महाराज यांनी करीत यशस्वी जिवनाचा मार्ग उपस्थितांना दाखवून दिला.तसेच परमार्थ हा शब्द बाह्य आचार विचार यापुरता मर्यादीत नाही. मात्र अंतकरण शुध्द करुन लोककल्याणकारी सेवा ज्यांनी केली आहे. तोच परमार्थ करु शकतो असा अध्यात्मिक उपदेश हभप बाळकृष्ण महाराज यांनी उपस्थितांना दिला.हरिनामाच्या गजरात भक्तीमय वातावरणात झालेला सत्संग सोहळा या परिसरात अविस्मरणीय ठरला आहे.या सोहळ्यास सौरभ देशपांडे पुणे हार्मोनियन वादक, पंकज शिरफाटे व्हायलन वादक, पाटील तबला वादक, व किरण माने मृदंग वादक यांनी तोलामोलाची साथ दिली. या सोहळ्यास मातोळा परिसरासह तालुक्यातील महिला व पुरुष उपस्थित होते.




### दिलीपरावांचे आदर्श प्रेरणादायी....

शेतकऱ्यांच्या घरातील चुल पेटती राहावी. त्यांच्या मुलांना चांगले भविष्य मिळावे. यासाठी दिलीपराव देशमुख सातत्याने प्रयत्नशील आहेत. त्यांच्या प्रयत्नातून बेलकुंड येथील बंद पडलेला मारुती महाराज साखर कारखाना पुन्हा सुरू झाला. यामुळे हजारो ऊस उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा मिळाला असून अनेक बेरोजगारांना रोजगाराची संधी प्राप्त झाली आहे.त्यामुळे सरकार महर्षी दिलीपरावा देशमुख यांचे विचार प्रेरणादायी असल्याचे हभप वसंतगडकर महाराज यांनी सांगितले.

### भोसले कुटुंबाने सामाजिक बांधिलकी जपली

दुष्काळाच्या कठीण काळात गावकऱ्यांना पाणी उपलब्ध करून देत शाम भोसले यांनी सामाजिक जबाबदारीचे उत्कृष्ट उदाहरण घालून दिले. यापुर्वी त्यांच्या कुटुंबाची देशसेवेची परंपरा देखील उल्लेखनीय आहे. त्यांचे आजोबा श्रीपतराव भोसले यांनी भारत-चीन युद्धाच्या काळात देशाला आर्थिक मदत व्हावी.यासाठी एक किलो सोने दिले होते. हीच पिढ्यानपिढ्यापासून चालत आलेली परंपरा पुढे शाम भोसले समाजकार्यातून चालवत आहेत. त्यांचा आदर्श समाजाने घेण्यासारखा असल्याचे गौरवोद्गार वसंतगडकर महाराज यांनी यावेळी केला.

## परशुराम जयंती उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २१ एप्रिल :** लातुरात परशुराम जयंती अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली. परशुराम जयंतीनिमित्त जयंती समितीच्या वतीने तीन दिवस सामाजिक, धार्मिक उपक्रम राबविण्यात आले. या निमित्त घेण्यात आलेल्या शिबिरात १५३ जणांनी रक्तदान केले.

यानिमित्त येथील कल्पतरू मंगल कार्यालयात झालेल्या गृह उद्योग प्रदर्शनात बिबियन महिला मंडळाच्या सदस्यांनी वस्तु दाखल केल्या होत्या. त्यास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. जुना औसा रस्त्यावरील विवेकानंद संस्कार संस्थेत घेण्यात आलेल्या शिबिरात १५३ जणांनी रक्तदान केले. मागील बारा वर्षांचे रेकॉर्ड मोडीत निघाले. परशुराम पार्क येथील परशुराम मंदिरात जन्मोत्सवानिमित्त अभिषेक, परशुराम याग घेण्यात आले. दयानंद सभागृहात ब्रह्मा भूषण पुरस्काराने पाच व्यक्तींचा सन्मान करण्यात आला. त्यानंतर पंडित जयतीर्थ मेवडी आणि त्यांच्या पथकाने संतवाणी सादर केली. यासाठी जयंती समितीचे अध्यक्ष डॉ. संतोष देशपांडे, डॉ. श्रीनिवास संदीकर, प्रा. एम. आर. कुलकर्णी, डॉ. अमित उटीकर, जितेंद्र देशमुख, धनश्री जोशी, प्रवीण देशपांडे, वल्लभ वावरे, योगेश चांदोरीकर, अनुराधा औसेकर, श्रीपादचार्य जोशी, नंदकुमार कुलकर्णी, माधव कुलकर्णी, सीमा दडपे, जगदीश कुलकर्णी, वामन पाठक, मनोज सप्तर्षी, डॉ. गिरीश कुलकर्णी, अभिजित पाटील, पुरुषोत्तम देशमुख, उदय कुलकर्णी, शैलेश कुलकर्णी, प्रवीण कस्तुरे, सुधाकर जोशी, संतोष कुलकर्णी, डॉ. राम पाटील (आरोग्य सेवा), कालिदास देशपांडे (सामाजिक सेवा), नीलेश देशमुख (उद्योग), कांचन भावठाणकर (संस्कार महिला सबलीकरण), डॉ. वृषाली देशमुख (कला शास्त्रीय गायन) यांचा ब्रह्मभूषण पुरस्काराने सन्मान करण्यात आला. नगरसेवक प्रवीण कस्तुरे, संजय पांडे यांचा १२ वर्षांपासून परशुराम जयंती उत्सवातून संघटन केल्यानिमित्त विशेष सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सचिन कुलकर्णी, अभिजित देशपांडे, किशोर कुलकर्णी, उमेश कुलकर्णी, ॲड. संजय पांडे, पापा ताथोडे, अशोक गोविंदपूरकर, डॉ. विश्र्वास कुलकर्णी, भूषण दाते, प्रसाद उदगीरकर, संजय अयाचित, संजय निलेगावकर, सुनील देशपांडे, रवी देशपांडे, श्रीराम देशपांडे, बाळासाहेब देशपांडे, संजय अयाचित, अमित कुलकर्णी, रंगनाथ पाटील, प्रा. संतोष कुलकर्णी, शिरीश कुलकर्णी, ॲड. उमेश देशपांडे, योगेश काळे, डॉ. आनंद अंबेकर, प्रसाद पांडे, विकास कुलकर्णी, मनोज जोशी, सुयोग जोशी, योगेश उन्हाळे, राजन अयाचित, सुमुख गोविंदपूरकर, उदय देशपांडे, अमित कुलकर्णी, पी. एम. कुलकर्णी, डॉ. रविराज पोरे, मुकुंद पाठक, गोपाळ जोशी, विकास कुलकर्णी, प्रसाद पांडे यांनी पुढाकार घेतला.

# पतीच्या अनैतिक संबंधांच्या संशयावरून चुलतिनेच केला पुतण्याचा खून,आरोपी चाकूर पोलिसांच्या कोठडीत कैद

**तभा वृत्तसेवा**

**चाकूर दि. २१ एप्रिल** : येथील दोन अल्पवयीन चुलत भाऊ बेपत्ता झाल्याची माहिती सकाळी चाकूर परिसरात समजली. त्यानंतर स्वामी कुटुंबीयांनी चाकूर पोलिसांत तक्रार दिल्यानंतर देवांश स्वामी वय सात वर्षे या मुलाचा मृतदेह पोलिसांना आढळून आला त्यानंतर त्या मुलाचा खून झाल्याचा संशय पोलिसांना आला आणि पोलिसांनी चार पथके तैनात करून बेपत्ता असलेला मुलगा साईचरण स्वामी वय १० वर्षे याचा शोध घेतला असता तो लातूर येथे सारोळा रोड येथे मिळून आला.



चाकूर पोलिसांनी केलेल्या तपासात खून नेमका का केला याचा उलगडा झाला असून अप्पर पोलिस अधीक्षक मंगेश चव्हाण यांनी पत्रकार परिषद घेऊन देवांश स्वामीचा खुन कशाबद्दल झाला याचा उलगडा केला आहे.देवांश स्वामी याचा त्याच्याच चुलतिने गळा आवळून खून केला असून पतीच्या अनैतिक संबंधांच्या संशयावरून चुलतीने देवांश स्वामी याचा खून करून, स्वतःच्या मुलाला बेपत्ता करण्याचा बनाव केला असून यात ज्या महिलेसोबत अनैतिक संबंध आहेत त्या महिलेवर संशय यावा या उद्देशाने पुतण्याचा खून करून त्याचा मृतदेह टायरमध्ये कोंबून ठेवून स्वतःचा मुलगा (साईचरण स्वामी ) लातूरला पाठवण्यात आले असून देवांश स्वामी याचा खून केला असल्याची कबुली चौकशी दरम्यान आरोपी अनिता स्वामी यांनी पोलिसांना दिली आहे.आरोपीला न्यायालयात हजर केले असता २४ तारखेपर्यंत पिसीआर देण्यात आला.चाकूर पोलीसांत गुन्हा रजिस्टर नंबर ०१९६/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम १०३(१) व २३८ अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला असून आरोपी अनिता दिनेश स्वामी हिला अटक करण्यात आले असून या अरोपिला ज्यांनी सहकार्य केले आहे किंवा पुरावा नष्ट करण्यासाठी ज्यांनी मदत केली आहे त्यांना ताब्यात घेऊन पुढील तपास करीत असल्याचे अप्पर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांनी पत्रकार परिषदेत माहिती दिली.यावेळी ठसे तज्ञ, मोबाईल हॅन,डॉग स्कॉड पथक, एलसिबी पथक तसेच पोलिस अधीक्षक अमोल तांबे, अप्पर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण, उपविभागीय पोलिस अधिकारी रविंद्र चौधर, पोलिस निरीक्षक बालाजी भंडे, पथकातील विविध पोलिस अधिकारी,एलसिबी पथक, अंमलदार यांनी तपास करून एका दिवसात गुन्ह्याचा उलगडा करून आरोपिला अटक केले आहे.तसेच या खुन प्रकरणात अनखीन कोणी सहभागी आहे का ? याचाही तपास करण्यात येत असल्याची माहिती पत्रकार परिषदेत अप्पर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांनी दिली.

## आरटीईच्या प्रवेश प्रक्रियेला मुदतवाढ

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २१ एप्रिल :** आरटीई २५ टक्के प्रवेश प्रक्रिया २०२६-२७ सोडत (लॉटरी) द्वारा निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे कागदपत्रे पडताळणी करुन प्रवेश निश्र्चित करणेसाठी दि. २० एप्रिल पर्यंत मुदत होती. या कालावधीत जिल्हयात केवळ ४४६ प्रवेश झाले आहेत. उर्वरीत १ हजार ८१७ प्रवेश निश्र्चित होण्यासाठी शिक्षण विभागाने या प्रवेश प्रक्रीयेस दि. २१ ते दि. ३० एप्रिल पर्यंत मुदतवाढ दिली आहे. या अनुषंगाने आ रटीई २५ टक्के पोर्टलवर प्रवेशासाठी शाळा व पालकांना सुविधा उपलब्ध करुन दिली जाणार आहे.

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ मधील कलम १२ (सी) (१) नुसार दुर्बल व वंचित घटकांतील बालकांना स्वयं अर्थसहाय्यित शाळा, विना अनुदानित शाळा या शाळांमध्ये आरटीई २५ टक्के २०२६-२७ या वर्षासाठी प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात येत आहे. आरटीईतंर्गत पालकांच्या पाल्यांना पहिलीच्या वर्गासाठी २५ टक्के मोफत प्रवेश देण्यासाठी लातूर जिल्हयातील स्वंय अर्थसहित, विना अनुदानीत २०७ शाळांची चुकीच्या भाडे करारामुळे ६ प्रवेश झाले रद्द आरटीई २५ टक्के प्रवेशाचा ऑनलाईन अर्ज भरताना बालकाच्या घरापासून ज्या शाळा जवळ आहेत. त्या शाळांचे पसंती क्रम देणे आवश्यक आहे. तसेच ज्या ठिकाणी बालकाचा रहिवास आहे. त्या घराचे कागदपत्र, भाडयाने रहात असाल तर अर्ज नोंदवण्याच्या पूर्वी घर मालकासोबतचा दुय्यम निबंधक कार्यालयातील भाडेकरार आवश्यक आहे. मात्र पालकांनी बॉड पेपरवर भाडेकरार करून नोटरी केल्याचे तालुकास्तरीय प्रवेश समितीला निदर्शनास आले.

## जि. प. उपाध्यक्ष दयानंद सुरवसे यांचा सत्कार उत्साहात साजरा




**तभा वृत्तसेवा**

**चाकूर दि. २१ एप्रिल** : लातूर जिल्हा परिषदेच्या उपाध्यक्षपदी दयानंद दामोदरराव सुरवसे यांची निवड झाल्याबद्दल तालुक्यातील झरी बु.येथे भव्य सत्कार समारंभ रविवार, दि. १९ एप्रिल २०२६ रोजी संपन्न झाला. या कार्यक्रमास परिसरातील नागरिक आणि मान्यवरांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती. सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, जिल्हा परिषद अध्यक्ष उषाताई पाटील तळेगावकर, मच्छिंद्र नागरगोजे यांनी आपल्या भाषणातून जिल्हा परिषद उपाध्यक्ष दयानंद सुरवसे यांना शुभेच्छा देऊन त्यांच्या कार्याचा गौरव केला.

यावेळी सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील तसेच लातूर जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा उषाताई पाटील-तळेगावकर यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडला.या कार्यक्रमास विविध मान्यवर उपस्थित होते.यावेळी सत्कारमूर्ती दयानंद सुरवसे यांचा सहकार मंत्री बाबासाहेब पाटील व मान्यवरांच्या हस्ते भव्य सत्कार करण्यात आला व त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

बांधकाम व आरोग्य सभापती ज्ञानेश्र्वर बिराजदार, समाज कल्याण सभापती उत्तमराव माने, महिला व बालकल्याण सभापती शिवकन्या गोडभरले, कृषी व पशुसंवर्धन सभापती कविता गोरे, चाकूर पंचायत समिती सभापती प्रतिनिधी मच्छिंद्र नागरगोजे, उपसभापती भुजंग शिंदे, तसेच जिल्हा परिषद सदस्य भानुदास पोटे, प्रफुलकुमार गुंडरे, आश्र्विनी नागराळे, रंजना चाटे, महादेव साळुंखे यांचा समावेश होता.

तसेच, राष्ट्रवादीचे तालुका अध्यक्ष शिवाजी काळे, पद्माकर पाटील, अनिल वाडकर, तुकाराम पाटील, युवराज सूर्यवंशी, बाळासाहेब सूर्यवंशी, नितीन पाटील यांच्यासह पंचायत समिती सदस्य मनीषा जाधव, सावित्री केदार, गजू होनराव यांनीही कार्यक्रमास हजेरी लावली.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गोपाळ सुरवसे, रामदास सुरवसे,गोविंद सुरवसे, शिवशंकर सुरवसे, राहुल सुरवसे, शिवशंकर मुदाळे, उमाकांत डोंगरे, दशरथ भंडे, हैदर सय्यद, विलास वाघमारे, बागन शेख, मेहबूब पठाण, चांद पठाण, भास्कर वाघमारे, धोंडराम वाघमारे, धोंडीराम मुदाळे, गणेश डोंगरे, ओंकार सुरवसे, सिद्धू चव्हाण, बालाजी हलगुंडे, गजानन सुरवसे, व्यंकट पाडुळे, बिरू डोंगरे, आरमान सय्यद आणि लिंबराज सुरवसे यांनी विशेष परिश्रम घेतले.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन मारोती बुद्रुक पाटील यांनी केले तर प्रस्ताविक राहूल सुरवसे यांनी केले.यावेळी या सत्कार सोहळ्यात ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महात्मा बसवेश्वरांनी मूल्याधिष्ठित समाजाची निर्मिती केली : इंजि.कोरे

**तभा वृत्तसेवा**

**निलंगा दि. २१ एप्रिल** : बाराव्या शतकात महात्मा बसवेश्र्वरांनी समाजातील अनिष्ट, रूढी परंपरा , कर्मठपणा नाकारून वचन साहित्याच्या माध्यमातून वैचारिक क्रांती घडवून आणली. कायक वे कैलास हा मूलमंत्र देऊन महात्मा बसवेश्र्वरांनी सर्वप्रथम जगाला श्रमाचे महत्त्व पटवून देत समाजात सामाजिक समतेचे मूल्य व माणुसकीचा विचार रुजवण्याचा प्रयत्न केला असल्याचे प्रतिपादन इंजि. किरण कोरे यांनी केले.




निलंगा येथे महात्मा बसवेश्र्वर जयंती निमित्त लिंगायत समाज व साई क्रिटिकेअर हॉस्पिटल निलंगा यांच्या संयुक्त विद्यमाने बसवेश्र्वर नगर येथील महात्मा बसवेश्र्वर सार्वजनिक वाचनालयात आयोजित व्याख्यानात इंजि. किरण कोरे बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मठाधिपती मनिप्र संगनबसव महास्वामीजी होते. यावेळी शिवाजी रेशमे गुरुजी, डॉ. मन्मथ गताटे , व्याख्याते इंजिनियर किरण कोरे, डॉ. अरविंद भातांब्रे, अजय शिवणे, शुभम शेरसांडे आदी विचारपीठावर उपस्थित होते. पुढे बोलताना इंजि. किरण कोरे म्हणाले, १२ व्या शतकात महात्मा बसवेश्र्वरांनी अंधश्रद्धा,जातीभेद , न मानता श्रम हीच पूजा हा मूलमंत्र देत क्रांती घडवून आणली. १२ व्या शतकात पहिली लोकशाही कसे असते ते अनुभव मंटप च्या माध्यमातून जगाला दाखऊन दिले.

सर्वांच्या मनात महात्मा बसवेश्र्वरांचे विचार,कार्य , वचन रुजवले पाहिजे आणि याची सुरुवात सर्वांनी आपल्या घरातून केले पाहिजे .महात्मा बसवेश्र्वर यांची प्रतिमा डोक्यावर घेऊन जयंतीच्या कार्यक्रमात नाचण्यापेक्षा महापुरुषांचे विचार विचार डोक्यात घेणे काळाची गरज असल्याचे किरण कोरे यांनी सांगितले .

इंजि. किरण कोरे यांनी आपल्या ओजस्वी वाणीने महात्मा बसवेश्र्वरांचे कार्य उपस्थितांसमोर मांडले. अनुभव मंटपाची संकल्पना व वचन साहित्याचे आजच्या काळातील महत्त्व त्यांनी सोप्या भाषेत समजावून सांगितले. त्यांच्या प्रभावी वक्तृत्वाने श्रोते मंत्रमुग्ध झाले होते. यावेळी संगन बसव महास्वामीजी यांचे समायोचित भाषण झाले.


व्याख्यानाच्या सुरुवातीला निलंगा अनुभव मंटपाच्या महिला शरणी कल्पना सोरडे, शोभाताई सलगरे, निर्मला सोरडे, संगीता गडवंती यांनी वचन सादर केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आयोजक डॉ. अरविंद भातांब्रे यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक इंजि. एम के कस्तुरे यांनी केले. आभार डॉ मन्मथ गताटे यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी, प्रकाश शेटकार , युवराज बिराजदार, चक्रधर शेळके, ,बुद्धिवंत मुळे, बसवराज बसपुरे, संतोष सोरडे, प्रकाश पटणे,अशोक शेटकार , संजय स्वामी, मल्लिकार्जुन कोळळे, व साई क्रिटिकेअर हॉस्पिटल चे कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. यावेळी बसव प्रेमी नागरिक व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तिहेरी खून प्रकरणातील फरार आरोपीस अटक

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २१ एप्रिल -**
शहरातील भारत ई-स्केअरजवळील तिहेरी खून प्रकरणातील प्रमुख आरोपी शेख शाहरुख उर्फ कबूतर शेख अजगर आणि शेख उबेद शेख अजगर या दोघांना स्थानिक गुन्हा शाखेने तेलंगणातून सोमवारी शिताफिने जेरबंद केले. एलसीबीचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराव यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक मिलिंद सोनकांबळे आणि त्यांच्या पथकाने ही कामगिरी पार पाडली. या कामगिरीबद्दल पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी या पथकाचे कौतुक केले आहे.

नांदेडमध्ये भारत ई-स्केअरजवळ ४ एप्रिल रोजी मध्यरात्रीनंतर प्रफुल्ल उर्फ अर्जितसिंग गजानन चव्हाण हा त्याच्या मित्रासोबत ई-स्केअर येथे चित्रपट पाहून कॅनॉल रोडने घरी जात होता. त्यावेळी साईलाला, शाहरुख कबूतर, सोनू राऊत, आवेश सम्यद, मोहम्मद अरबाज, उबेद आणि साहेर यांनी जुन्या वादातून प्रफुल्ल उर्फ अर्जितसिंग याच्यावर चाकू, तलवारीने हल्ला केला. यात अर्जितसिंग जागीच ठार झाला होता. या प्रकरणात भाग्यनगर पोलिसांनी सोनू राऊत आणि साहेर या दोघांना अटक केली होती.



या गुन्ह्यातील साईलाला, शाहरुख कबूतर, उबेद हे तिघेजण गुन्हा घडल्यापासून फरार होते. पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांना आदेश देत गुन्हेगारांना जेरबंद करण्याच्या सूचना केल्या होत्या. त्यानुसार स्थानिक गुन्हा शाखेने पाच पथक तयार करून आरोपींचा शोध सुरू केला होता. पोलीस उपनिरीक्षक मिलिंद सोनकांबळे आणि त्यांच्या पथकाला शेख शाहरुख उर्फ कबुतर शेख आणि शेख उबेद शेख अजगर या दोघांची गोपनीय माहिती मिळाली, त्यानुसार या दोघांनाही तेलंगणातून २० एप्रिल रोजी ताब्यात घेतले. त्यांनी गुन्हा केल्याची कबुली दिली आहे. याप्रकरणी त्यांना आता पुढील चौकशीसाठी भाग्यनगर पोलीस ठाण्यात पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

दरम्यान या तिहेरी खून प्रकरणातील मुख्य आरोपी साईलाला याला ल फरार असताना सहकार्य करणाऱ्या मन्मथ वसंतराव मंगरुळे रा. नायगाव आणि दिग्विजय गणेशराव नारागुडे रा. श्यामनगर नांदेड या दोघाविरुद्ध पोलिसांनी कारवाई सुरू केली आहे. पोलिसांकडुन साईलालाचाही कसून शोध घेतला जात आहे. शाहरुख कबूतर आणि उबेद आता ताब्यात आल्यानंतर साईलालालाही लवकरच जेरबंद करु, असा विश्वास पोलिसांकडून व्यक्त करण्यात आला आहे.

# पट पडताळणीसाठी 'विद्यार्थी शोध मोहीम'

**तभा वृतसेवा**
**इस्लापूर, दि. २१ एप्रिल -**
भिसी केंद्रांतर्गत २२ एप्रिलच्या पट पडताळणीच्या पार्श्वभूमीवर शाळांमध्ये सध्या विद्यार्थी जमा करण्याची धावाधाव सुरू आहे. वर्षभर गैरहजर असलेले विद्यार्थी अचानक शोधून काढण्यासाठी शिक्षक घरभेटी, फोन कॉल आणि पालकांशी संपर्क साधत असल्याचे चित्र समोर आले आहे.

## शिक्षकांची धावाधाव अनुदानावर प्रश्न, जबाबदार कोण?

**धावपळ वाढली, प्रश्नही तीव्र झाले**

पडताळणीच्या दिवशी एकही विद्यार्थी गैरहजर राहू नये, या सूचनांमुळे शिक्षकांवर ताण वाढला आहे. मात्र यामुळे शिक्षण व्यवस्थेतील वास्तव समोर येत असून, ही फक्त एकदिवसीय उपस्थिती आहे का? असा सवाल उपस्थित होत आहे.

**अनुदानित आश्रम शाळांवर गंभीर प्रश्न**

सदर पडताळणीमध्ये अनुदानित आश्रम शाळा व संस्था यांचाही समावेश आहे. आदिवासी विकास विभागाकडून वर्षभर विद्यार्थ्यांसाठी निवास, अन्न व इतर सुविधा पुरवण्यासाठी अनुदान दिले जाते. मात्र जर विद्यार्थी वर्षभर उपस्थित नसतील आणि फक्त पडताळणीच्या दिवशीच हजर होत असतील, तर त्या विद्यार्थ्यांचे वर्षभराचे अनुदान जाते कुठे? हा प्रश्न आता अधिकच गंभीर झाला आहे.

**जबाबदारी कोणाची?**

या संपूर्ण प्रकारावर आता थेट जबाबदारीचा मुद्दा उपस्थित होत आहे. शाळेतील मुख्याध्यापक?, वसतिगृह अधीक्षक?, संस्थेचे अधीक्षक?, की संचालक मंडळ? यापैकी नेमकी जबाबदारी कोणाची ठरवली जाणार? हा प्रश्न नागरिकांमध्ये चर्चेचा विषय ठरत आहे.

**मागण्या जोर धरतायेत**

अनुदानित शाळांची सखोल चौकशी, वर्षभर उपस्थितीची पडताळणी, जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई, निधीचा पारदर्शक वापर करावा अशा मागण्या जोर धरताहेत.

**शिक्षणासाठी अनुदान की अनुदानासाठी विद्यार्थी?**

इस्लापूर परिसरात सुरू असलेली ही पट पडताळणी आता शिक्षण व्यवस्थेतील पारदर्शकता, जबाबदारी आणि प्रामाणिकपणाची कसोटी ठरत आहे. प्रश्न अजूनही कायम जबाबदार कोण ठरणार, आणि कारवाई होणार का? असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

## आदमपूरात क्रांतीसूर्य महात्मा बसवेश्वर यांना सामुहिक अभिवादन

**आदमपूर**-समता,बंधुता,समानता समाजात अभेद्य ठणकावून सांगणारे व स्वतंत्र सर्वधर्मसमभाव विचारांची रूजवात करीत स्वतंत्र लिंगायत धर्म स्थापित करणारे संस्थापक १२ व्या शतकातील समतानायक महात्मा बसवेश्वर महाराज हे होत. बिलोली तालुक्यातील ग्राम आदमपूर येथील बसस्थानक परिसरात क्रांतीयोगी महात्मा बसवेश्वर यांच्या जयंतीनिमित्त शिवा संघटनेचे शाखाप्रमुख राम हालबुर्गे व जि.प.शाळेचे मुख्याध्यापक शेषराव पांचाळ व उपस्थित मान्यवरांकडून सामुहिक पुष्पहार अर्पित करीत अभिवादन करण्यात आले.त्याच्यां क्रांतीकारी विचारांचा जयंतीनिमित्त औचित्य साधत व समाज माध्यमातून जागर करण्यात आला. जि.प.वरिष्ठ प्राथमिक शाळा, ग्रामपंचायत कार्यालय आणि महाळप्पा पटने विद्यालयातही महात्मा बसवेश्वर यांना अभिवादन करण्यात आले.यावेळी मुख्याध्यापक शेषेराव पांचाळ, सहशिक्षक राहूल भद्रे,अर्चना जळपतवार,मुख्याध्यापक चंद्रशेखर लगडे,रामराव तुकडे,प्रल्हाद हांद्रे, जैनोद्दीन शेख,दिगांबर कोकणे हाणमंत भुसावळे,सरपंच प्रतिनिधी कपिल भुसावळे,राजू पाटील, सलीम शेख,सिद्धार्थ कांबळे, माजी चेअरमन शिवदास हालबुर्गे, शिवाजी हांद्रे,राहूल हादगले, माणिक पाटील,शिवदास मुंगडे, अरविंद वाघमारे,गजानन बिद्राळे, बसवेश्वर हांद्रे,यशवंत कांबळे, संभाजी लमले,योगेश हालबुर्गे, हर्षवर्धन भुसावळे,सर्पमित्र राजेश मुंडकर अनुयायी व समाज बांधव, गावकरी आदिंची उपस्थिती होती.




नांदेड -आरक्षण उपवर्गीकरणाच्या विरोधात आरक्षण उपवर्गीकरण विरोधी कृत समन्वय समितीच्या वतीने जिहाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले. (छाया- ज्ञानेश्वर सुनेगावकर)

## कुसुमनगर वाघलवाडा येथे इथेनॉल प्रकल्पाचेभूमिपूजन उत्साहात

**उमरी** -उमरी तालुक्यातील एम. व्ही. के. अँग्रो फुड प्रोडक्ट लि., कुसुमनगर, वाघलवाडा यांच्या वतीने १२० घङझऊ क्षमतेच्या इथेनॉल (आसवनी) प्रकल्पाचे भूमिपूजन सोहळा दि. १९ एप्रिल २०२६ रोजी सकाळी मोठ्या उत्साहात पार पडला आहे अक्षय तृतीया या पवित्र मुहूर्तावर आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाला परिसरातील शेतकरी, मान्यवर व उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधींची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होते . या भूमिपूजन सोहळ्याचे शुभ हस्ते द.भ.प. महंत १०८ श्री यदुबन गुरु गंभिरबन महाराज (दत्त मठ संस्थान, कोलंबी) यांच्या हस्ते विविध पूजा करण्यात आली तसेच शिवयोगी श्री निर्वाणी महाराज (श्री सिद्धेश्वर मंदिर संस्थान नागठाणा बु.) , अतिथी म्हणून द.भ.प. श्री आनंदपुरी गुरु दत्तपूरी महाराज (चोळाखा), या प्रसंगी व्ही. पी. के. उद्योग समूहाचे संस्थापक चेअरमन तथा उद्योजक मारोतराव व्यंकटराव पा. कवळे गुरुजी, सी ई ओ संदीप मारोतराव पा. कवळे तसेच श्रीराम आंबटवार यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमात विविध मान्यवरांनी प्रकल्पाच्या यशस्वीतेसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या. अध्यक्षीय भाषण करताना चेअरमन मारोतराव कवळे गुरुजी म्हणाले की, या भागातील शेतकरी सुखी आणि संपन्न झाला पाहिजे, हे माझे स्वप्न आहे आणि ते मी नक्कीच पूर्ण करणार आहे. त्यांनी इथेनॉल प्रकल्पामुळे स्थानिक शेतकऱ्यांना मोठा फायदा होणार असल्याचे सांगितले. ऊस उत्पादकांना योग्य बाजारपेठ, रोजगार निर्मिती तसेच ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. याच कार्यक्रमादरम्यान अक्षय तृतीया निमित्त ऊस वाहतूकदार, ठेकेदार तसेच ऊस तोड मजुरांसोबत करार करण्यात आले. यामुळे आगामी हंगामासाठी उद्योग समूहाने भक्कम तयारी केल्याचे दिसून आले. या उपक्रमामुळे परिसरातील अनेक कुटुंबांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. कार्यक्रमास दत्ताहरी पाटील चोळाखेकर, गणपतराव पाटील हसेकर, डॉ. विक्रम देशमुख तळेगावकर, उदोजक बापुसाहेब पा.कौडगावकर, गणेशराव पाटील सरसे, शिवलिंग बर्गे , प्रभाकर पा. पुयड, देवराव पा. हसेकर, नागोराव पा. हिवराळे विविध गावांतील प्रतिष्ठित नागरिक, ऊस वाहतूकदार, तोड ठेकेदार, शेतकरी व व्ही. पी. के. उद्योग समूहाचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते..

# मुदखेड येथे काँग्रेस पक्षाची संगठन सृजन अभियान अंतर्गत बैठक

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. २१ एप्रिल -**
हरकाला वेणेगोपाल यांनी नांदेड जिल्ह्यातील काँग्रेस पक्षाच्या संघटनात्मक निवडीबाबत महत्त्वपूर्ण भूमिका मुदखेड येथे आयोजित बैठकीत स्पष्ट केली जिल्ह्यातील सर्वच पदाधिकारी, विशेषतः जिल्हाध्यक्ष, तालुकाध्यक्ष आणि शहराध्यक्ष यांच्या निवडी या कार्यकर्त्यांशी थेट संवाद साधून तसेच त्यांच्या शिफारशीच्या आधारेच केल्या जाणार असल्याची ग्वाही त्यांनी दिली.

पक्ष संघटना अधिक मजबूत करण्यासाठी आणि स्थानिक कार्यकर्त्यांना योग्य न्याय देण्यासाठी ही प्रक्रिया राबवली जात असल्याचे त्यांनी सांगितले. येत्या काळात पारदर्शक आणि कार्यकर्तामैत्रीपूर्ण निवड प्रक्रिया राबवून काँग्रेस पक्षाला बळकटी देण्यावर भर दिला जाणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.




संगठन सृजन अभियान अंतर्गत मुदखेड शहरातील ठाकरे चौक येथील काँग्रेस पक्षाचे कार्यालयासमोर दि.१९ एप्रिल रोजी भोकर

विधानसभा मतदारसंघातील तिन्ही तालुक्यातील भोकर अर्धापूर आणि मुदखेड येथील काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या बैठीकीचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी अखिल भारतीय काँग्रेस समितीतील हरकाला वेणू गोपाल सामान्य लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी देश पातळीवर काँग्रेस पक्षाला मजबूत करत पक्ष संघटन बळकटीकरण करण्यासाठी भारतीय राष्ट्रीय काँग्रेस राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या सूचनेनुसारच पक्ष संघटन सृजन अभियान राबविण्यात येत असल्याचे यावेळी सांगितले.

बैठकीच्या प्रारंभी महाराष्ट्र प्रदेश कार्यकारणी सचिव अमरनाथ खानापूरकर यांनी प्रस्ताविक मांडले व तसेच भोकर विधानसभेतील कार्याध्यक्ष तिरुपती पाटील कोंडेकर यांनी उपस्थित विधानसभेतील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले यावेळी सुरेश तिवारी,नांदेड काँग्रेस उत्तर जिल्हाध्यक्ष राजेश पावडे,युवक काँग्रेस जिल्हाध्यक्ष बालाजी पाटील गाडे,भोकर तालुका अध्यक्ष बाबा गौड,अर्धापूर तालुका अध्यक्ष सुनील वानखेडे

काँग्रेस तालुका अध्यक्ष प्रतापराव देशमुख,माजी नगराध्यक्ष राजबहादुर कोत्तावार,भोकर काँग्रेसचे अध्यक्ष तोसिफ इनामदार,करीम खान साहब,मुजीब पठाण,गंगाधर डांगे, गोविंद गोपणपल्ले,

सूर्यकांत चौदंते,गिरीश कोत्तावार,विश्वनाथ पवार,

गंगाधर खतगावे,मोहम्मद खदीर खाजा मिया,अतीख अहेमद ,खदीर खुरेशी, रमेश बोडके, सुरेश ढगे, शिवानंद देवके, सुभाष चौदंते, विठ्ठल आचार्य, गजानन संबोड, प्रशांत पाटील मुंगल ,वेदांत शेवटे, मो अनीस,गौस मुल्ला, भिम पाटील महादवाड,शेख मोईन शेख राजेसाहेब याप्रसंगी भोकर विधानसभेतील तिन्ही शहरातील आणि ग्रामीण भागातील काँग्रेस कार्यकर्त्यांची मोठी उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महाराष्ट्र प्रदेश प्रवक्ता बालाजी पाटील गाडे यांनी केले.

# नापिकीच्या सावटात हरपलेला पत्रकार; कुटुंबाला परिषदेचा आधार

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि. २१ एप्रिल -**
ग्रामीण भागातील पत्रकारांच्या कठीण वास्तवाला अधोरेखित करणारी एक हृदयद्रावक आणि संवेदनशील घटना नरसी येथे घडली. पत्रकार सुभाष पेरकेवार यांनी सततच्या नापिकीच्या ताणातून काही महिन्यांपूर्वी जीवन संपवल्यानंतर त्यांच्या कुटुंबा वर दुःखाचा डोंगर कोसळला होता.या पार्श्वभूमीवर अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख यांनी सोमवार, दि. २० एप्रिल रोज सोमवार सकाळी नरसी येथे भेट देत पीडित कुटुंबाला दिलासा दिला.

देशमुख यांनी पेरकेवार यांच्या कुटुंबीयांची प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांच्या पत्नीला धीर देत सांत्वन केले. यावेळी त्यांनी चेकद्वारे स्वानुग्रह मदत प्रदान करत कुटुंबाला आर्थिक आधारही दिला. त्यांच्या या सहृदय कृतीमुळे दुःखात सापडलेल्या कुटुंबाला मोठा मानसिक आधार मिळाला.

यावेळी नायगाव तालुक्यातील अखिल भारतीय मराठी पत्रकार संघाचे पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. जि.प माजी सदस्य तथा माजी पत्रकार माणिक लोहगांवे,माजी जिल्हाध्यक्ष सूर्यकांत सोनखेड कर यांच्या नेतृत्वाखाली पत्रकारांनी पीडित कुटुंबाच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याचा निर्धार व्यक्त केला.

उपस्थितांमध्ये रघुनाथ सोनकांबळे, प्रभाकर लखपत्रेवार, सय्यद जाफर (माजी तालुकाध्यक्ष), लक्ष्मण बर्गे (तालुका अध्यक्ष), गोविंदराव टोकलवाड (उपाध्यक्ष), शेषराव कंधारे, आनंदराव सूर्यवंशी, गंगाधर गंगासागरे, तानाजी शेळगांवकर, गणेश कंदुर्के, श्याम चोंडे, मनोहर मोरे, किरण औराळ कर यासह नायगांव व बिलोली तालुक्यातील अनेक पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## डॉ. आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त बाबा फाऊंडेशन तर्फे अन्नदान

**नांदेड** -विश्वरत्न बोधीसत्व परमपूज्य महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त दरवर्षीप्रमाणे यंदाही बुद्धवासी संजय शंकरराव मोरे यांच्या स्मरणार्थ बाबा फाऊंडेशन तर्फे शिवाजीनगर नांदेड येथे भव्य अन्नदान ठेवण्यात आले होते. यावेळी नांदेड महानगरपालिकेच्या महिला महापौर कविताताई मुळे, शिवाजीनगरच्या नगरसेविका कविता गडुम, शिवसेना तालुका प्रमुख सुनील पाटील, अभय मोरे, कुणाल लोगावकर, नागनाथ गडुम, संतोष मुळे, सुभाष काटकांबळे, विजय गोडबोले, तन्मय मोरे, नितीन वाघमारे, भीमाताई संजय मोरे, सोनाली कांबळे, अश्विनी वाघमारे, अनय मोरे, आदित्य मोरे, अविनाश दाढे, सागर सूर्यवंशी, शुभम लोखंडे आरुष मोरे, आदींची उपस्थिती होती.

# उत्पादन शूल्क विभागाच्या अशिर्वादाने अवैध दारु विक्री

**तभा वृतसेवा**
**भोकर, दि. २१ एप्रिल -**
राज्य उत्पादन शूल्क विभागाच्या अकार्यक्षमतेमूळे शहरातील विविध ठिकाणी धाब्यावर विनापरवाना अवैध दारु विक्रि मोठ्या प्रमाणात होत असून याकडे संबधित विभागाचे साफ दूर्लक्ष दिसून येते.मागील अनेक दिवसापासून शहरात जागोजागी विनापरवाना अवैध दारुची विक्रि जोमात सूरु असून मद्यपीना पहाटे चार पासून रात्री बारा वाजेपर्यंत सहज अवैध देशी दारु उपलब्ध होत आहे राज्य उत्पादन शूल्क विभागातील निरिक्षकांनी अवैध दारु विक्रेत्यासोबत हातमिळवणी करित असल्याची चर्चा शहरात असून शहरातून जाणाऱ्या प्रत्येक रस्त्यावर अवैध दारु मिळते मद्यपींना देशी दारु कूठेही कोणत्याही वेळेत उपलब्ध होत असल्याने तरुण मूले नशेच्या धूंदीत रस्त्याने कूठेही पडत असल्याचे निदर्शनास येत आहे. तरुण मूलांमध्ये दारु पिणाऱ्यांची संख्या वाढली असून देशी दारुच्या आहारी जावून आपले आयूष्य बर्बाद करुन घेत असल्याचे निदर्शनास येत आहे.अवैध दारु विक्रि करणाऱ्यावर संबधित विभागाचा अंकूश राहिलेला नाही परिणामी अवैध दारु विक्रेत्याचे मनोबल वाढले आहे.संबधित विभागास विनापरवाना अवैध दारु विक्रि होत असल्याची कल्पना असताना देखील याकडे अक्षम्य दूर्लक्ष करित आहेत. आहे.उत्पादन शूल्क विभागाच्या निरिक्षकांनी भोकर भेटीदरम्यान संबधित अवैध दारु विक्रेत्यांसोबत हातमिळवणी करित असल्याने दारु विक्रेत्यांना रान मोकळे झाल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.गल्ली बोळात देशी दारु सहज उपलब्ध होत आहे.हा दारु विक्रिचा व्यवसाय सद्या जोमात सूरु असल्याचे दिसत आहे.याकडे राज्य उत्पादन शूल्क विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष देवून होत असलेली विनापरवाना अवैध दारु विक्रि बंद करण्याची मागणी शहरातील नागरीक करित आहेत.



नांदेड - भाग्यनगर पोलीस ठाण्यातील गुन्हे शोध पथकाने चार चोरट्यांना पकडून १० घरफोडीचे गुन्हे उघडकीस आणले आहेत. चोरट्यांकडून पोलीसांनी ७८ लाख ३५ हजार ६० रुपयांचा चोरीतील मुद्देमाल ४४.५ तोळे सोन्याचे दागिणे आणि १७१.४ तोळे चांदीचे दागिणे जप्त केले आहे. ही कारवाई भाग्यनगर पोलीस ठाण्यातील पोलीस निरिक्षक संतोष तांबे, गुन्हे शाखचे पोलीस निरिक्षक महेश माळी यांच्या मार्गदर्शनात पोलीस उपनिरिक्षक विनोद देशमुख, नरेश वाडेवाले, पोलीस अंमलदार विशाल माळवे, सविता केळगंद्रे, विष्णुकांत मुंडे, सुधाकर मलदोडे, राहुल लाठकर, राजीव घुले, नागनाथ, अदनान पठाण, अंकुश कांबळे, सायबर विभागाचे पोलीस उपनिरिक्षक मारोती चव्हाण व त्यांच्या सहकाऱ्यांनी केली.पोलीसांनी या कारवईत सोहेल अब्दुल सत्तार (१९) रा. जवाहरनगर नदिड, प्रदीपकुमार विरेंद्र प्रसाद कौरी (१९) रा.धनेगाव, बळीरामपूर नांदेड, अर्जुन पुरुषोत्तमराव मोरे (२८) रा. मरघाट चौफाळा नांदेड, शेख नईम शेख मैनोद्दीन (२२) रा. कैलासनगर नांदेड, आशा हरीशचंद्र तेलंग (५६) रा. शाहूनगर नांदेड आणि एका विधीसंघर्षग्रस्त बालकाला अटक केली आहे.

## रोशनताई मधुकर दवणे यांचे हृदयविकाराने निधन

**मुदखेड** -मुदखेड येथील भिमनगर भागातील रहिवासी आणि सामाजिक



कार्यकर्ते मधुकर दवणे यांच्या पत्नी रोशनताई मधुकर दवणे (वय ३१ वर्षे) यांचे दि. १८ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ८:३० वाजताच्या सुमारास हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दुःखद निधन झाले. त्यांच्या अकाली निधनामुळे मुदखेड शहरासह परिसरात मोठी हळहळ व्यक्त केली जात आहे. रोशनताई यांच्या निधनानंतर दवणे आणि चौदंते परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.दि.१८ एप्रिल रोजी सायंकाळी ३:०० वाजता स्थानिक बौद्ध स्मशानभूमी येथे त्यांच्यावर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रांतील नागरिक, राजकीय व सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. अवघ्या ३१ व्या वर्षी रोशनताईंनी जगाचा निरोप घेतल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, सासू-सासरे, आई-वडील, दीर आणि जाऊ असा मोठा परिवार आहे. सामाजिक कामात नेहमी हिरीरीने पुढाकार घेणारे मधुकर दवणे यांच्या त्या अर्धांगिनी होत्या. त्यांच्या निधनामुळे एका हसतखेळत्या कुटुंबावर काळाने घाला घातल्याची भावना व्यक्त होत आहे.

# भारतीय वायुदल करिअर मार्गदर्शन व प्रदर्शनास उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. २१ एप्रिल -**
भारतीय वायुदला तर्फे श्री गुरु गोबिंदसिंघजी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान संस्था, नांदेड येथे आयोजित करण्यात आलेल्या करिअर मार्गदर्शन सत्र व इंडक्शन पब्लिसिटी प्रदर्शन वाहन (आयपीईव्ही) प्रदर्शनास ३०० हून अधिक विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद ; या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये संरक्षण सेवांबद्दल जागरूकता निर्माण झाली.

भारतीय वायुदल करिअर मार्गदर्शन व प्रदर्शन दिनांक २० एप्रिल रोजी श्री गुरु गोबिंदसिंघजी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान संस्था, नांदेड येथे पारपडले कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संस्थेचे संचालक डॉ. मनेश कोकरे हे होते. व्यासपीठावर भारतीय वायुदलाचे विंग कमांडर लोकेंद्र सिंह



कुम्पावत, फ्लाइट लेफ्टनंट गुरजीत सिंग भुल्लर आणि फ्लाइंग ऑफिसर राहुल यादव यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच कार्यक्रम समन्वयक डॉ. रवींद्र जोशी, प्रशिक्षण व नियुक्ती अधिष्ठाता प्रा. संदीप मुंढे, विद्यार्थी कल्याण अधिष्ठाता प्रा. माधव वैद्य हे देखील उपस्थित होते. कार्यक्रमची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन समारंभाने झाले. यावेळी विंग कमांडर लोकेंद्र सिंह कुम्पावत यांनी प्रेरणादायी उद्घाटनपर भाषण केले. त्यानंतर फ्लाइट लेफ्टनंट गुरजीत सिंग भुल्लर यांनी करिअर मार्गदर्शन सत्र घेतले, तर फ्लाइंग ऑफिसर राहुल यादव यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधून भारतीय वायुदलातील संधी, निवड प्रक्रिया आणि प्रशिक्षणाबाबत सविस्तर माहिती देताना भारतीय वायुदलाचा इतिहास, भूमिका, हवाई संरक्षण, आक्रमक कारवाया, लष्करी पुरवठा व्यवस्था, आपत्ती व्यवस्थापन, आपत्कालीन मदत तसेच जखमींचे स्थलांतर (कॅज्युअल्टी एव्हॅक्युएशन) यांसारख्या महत्त्वाच्या कार्यांवर प्रकाश टाकण्यात आला. याशिवाय आधुनिक लढाऊ विमाने, हेलिकॉप्टर, हवाई निरीक्षण प्रणाली आणि संयुक्त लष्करी कारवायांची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. 'ऑपरेशन गंगा'सारख्या आपत्कालीन मोहिमांद्वारे भारतीय वायुदलाचे कार्य अधोरेखित करण्यात आले.

यावेळी इंडक्शन पब्लिसिटी प्रदर्शन वाहन (आयपीईव्ही) होते. या अत्याधुनिक व्होल्वो बसमध्ये सुसज्ज प्रदर्शनाद्वारे ५५० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना विमान तंत्रज्ञान, संरक्षण यंत्रणा व कृत्रिम कॉकपिटचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याची संधी मिळाली.या कार्यक्रमास सुमारे ३१० विद्यार्थ्यांनी संस्थेच्या सहकार्याबद्दल आनंद व्यक्त केला.

याचवेळी अध्यक्षीय भाषणात डॉ. मनेश कोकरे यांनी अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये देशसेवेबद्दल जागरूकता निर्माण होते व सेना, वायुदल आणि नौदलामध्ये करिअर करण्याची प्रेरणा मिळते, असे सांगितले. कार्यक्रम समन्वयक डॉ. रवींद्र जोशी यांनी २०२३ मध्ये झालेल्या भारतीय वायुदलाच्या भेटीला विद्यार्थ्यांचा मोठा प्रतिसाद मिळाला होता आणि त्यातून अनेक विद्यार्थी देशसेवेसाठी प्रेरित झाले असल्याचे नमूद केले.कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना भारतीय वायुदलातील करिअरच्या संधी, निवड प्रक्रिया, राष्ट्रीय संरक्षण अकादमी, संयुक्त संरक्षण सेवा परीक्षा, वायुदल सामान्य प्रवेश परीक्षा, राष्ट्रीय छात्र सेना विशेष प्रवेश तसेच कायमस्वरूपी व अल्पकालीन सेवा आयोग याबाबत सखोल माहिती मिळाली.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# प्रस्तावित भारत-अमेरिका व्यापार कराराविरोधात काँग्रेसचे धरणे



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २१ एप्रिल**

स्वस्त विदेशी शेतीमालामुळे देशांतर्गत बाजारपेठ धोक्यात येत असून केंद्र शासनाचा प्रस्तावित भारत-अमेरिका करार रद्द करावा या मागणीसाठी काँग्रेस पक्षाच्यावतीने धरणे आंदोलन करण्यात आले.

येथील महात्मा गांधी चौकातील संविधान कॉर्नर येथे आयोजित या आंदोलनात काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सुरेशअप्पा सराफ, युवक काँग्रेसचे प्रदेश सचिव प्रशांत नागरे, सुशांत लोखंडे, शामराव जगताप, मिलिंद उबाळे, शेख जुबेर मामू, संग्राम नायक, शेख अख्तर, अतुल नायक, विशाल इंगोले आदींनी सहभाग घेतला.

केंद्र सरकारचा प्रस्तावित भारत-अमेरिका व्यापारी करार हा देशातील शेतकरी, ग्रामीण अर्थव्यवस्था आणि अन्न सुरक्षेस घातक ठरणारा आहे. या करारामुळे अमेरिकेतील कृषी उत्पादनांना शून्य टक्के आयात शुल्क लागणार असून त्यामुळे स्वस्त विदेशी शेतीमाल भारतीय बाजारपेठेत मोठ्या प्रमाणावर येणार आहे. त्यामुळे भारतात शेतीमालाचे दर कोसळणार असून त्यामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान होणार असल्याचा आरोप काँग्रेसच्यावतीने करण्यात आला आहे. सदर करार शेतकऱ्यांसाठी असमान स्पर्धा निर्माण करणारा असून या करारामुळे कृषी उत्पन्न बाजार समिती व्यवस्था व हमी भाव यांची उपयुक्तता कमी होईल. व्यापारी देखील स्थानिक शेतकऱ्यांकडून शेतीमाल खरेदी करण्याऐवजी आयात केलेल्या उत्पादनांना प्राधान्य देतील. यामुळे स्थानिक बाजारपेठेत अस्तित्व धोक्यात येणार असल्याची भिती व्यक्त करण्यात आली आहे.

यासोबतच दुग्ध व्यवसायवरही या कराराचा गंभीर परिणाम होणार आहे. शेतीमालाचे दर कोसळल्यामुळे ग्रामीण अर्थ व्यवस्था कोसळणार असून यामुळे भारतीय शेतकरी त्यांच्याच जमिनीवर मजूर म्हणून काम करतांनाचे चित्र दिसेल. या सर्व बाबींचा विचार करता सदर करार रद्द करावा अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. या मागणीचे निवेदन जिल्हाधिकारी यांचेमार्फत केंद्र शासनाकडे पाठविण्यात आले आहे.

# पत्रकारांच्या घरांचा प्रश्न तातडीने मार्गी लावणार -आ. बांगर

## शासकीय विश्रामगृहात पत्रकारांची बैठक



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २१ एप्रिल**

सदैव लोकांचे प्रश्न सोडविण्यासाठी अहोरात्र काम करणार्या पत्रकारांच्या घराचा प्रश्न तातडीने मार्गी लावण्यासाठी मी तुमच्या सोबत असून लवकरच सर्व समावेशक बैठक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत लावू असे प्रतिपादन आ.संतोष बांगर यांनी केले.

हिंगोली येथील शासकीय विश्रामगृहात मंगळवार दि.२१ एप्रिल रोजी पत्रकार वेल्फेअर सोसायटी हिंगोलीच्या वतीने बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीस मार्गदर्शन करण्यासाठी आ.संतोष बांगर यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी पुढे बोलताना आ.संतोष बांगर म्हणाले की, पत्रकारांच्या घराच्या संदर्भात मी तुमच्या सोबतच आहे. आपण लवकरच मुंबई येथे आ.तान्हाजी मुटकुळे, आ.राजू नवघरे सर्व आमदार, खासदार आणि प्रामुख्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांच्या उपस्थित सर्वसमावेशक बैठक लवकरच मुंबईत लावून पत्रकारांच्या घरासाठी सर्वजण एकजुटीने प्रयत्न करु अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

बैठकीच्या सुरुवातीला पत्रकार वेल्फेअर सोसायटीच्या वतीने आ.संतोष बांगर यांचा सत्कार अध्यक्ष कल्याण देशमुख, सचिव सुनिल पाठक यांनी केला. यावेळी शिवशंभो प्रतिष्ठानच्या पदाधिकार्यांच्या वतीने आयोजित कार्यक्रमाचे निमंत्रणही देण्यात आले. बैठकीचे प्रास्ताविक कल्याण देशमुख यांनी तर सूत्रसंचालन प्रकाश इंगोले यांनी केले. शेवटी आभार सुनिल पाठक यांनी मानले.

यावेळी प्रिंट मीडिया, इलेक्ट्रॉनिक मीडिया, सोशल माध्यम मीडियाचे प्रतिनिधी व प्रेस फोटोग्राफर मोठया संख्येने उपस्थित होते.

# राज्य सरकारी मध्यवर्ती कर्मचाऱ्यांचा बेमुदत संप सुरू



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २१ एप्रिल**

जुनी पेन्शन योजना लागू करा या प्रमुख मागणीसह इतर मागण्यांसाठी राज्य सरकारी मध्यवर्ती कर्मचारी संघटनेच्यावतीने दि २१ एप्रिल पासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत संपाला सुरूवात झाली असून मोठ्या संख्येने सरकारी व निमसरकारी कर्मचारी, शिक्षक या संपात सहभागी झाले आहेत.

राज्य सरकारी मध्यवर्ती कर्मचारी संघटनेच्यावतीने राज्य सरकारला प्रलंबीत मागण्यांसाठी इशारा देण्यात आला होता. परंतु शासनाने मागण्यांची दखल न घेतल्यामुळे राज्यातील सरकारी, निमसरकारी तसेच शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, जि प शिक्षक, जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगर पालिका, नगर पंचायत, महसुल कर्मचारी यांच्या संघटनांनी या संपात सहभाग नोंदविला आहे. यावेळी कर्मचाऱ्यांकडून जूनी पेन्शन योजना लागू करण्यात यावी, आश्वासीत प्रगती योजनेचा लाभासाठी अजूनही शासनाने परिपत्रक काढले नाही. निवृत्त कर्मचाऱ्यांच्या पेन्शन रक्कमेचा प्रश्न आदी प्रलंबीत मागण्यांचा समावेश आहे. यावेळी राज्य शासनाच्या विरोधात घोषणाबाजी करीत कर्मचाऱ्यांनी बेमुदत संप पुकारला आहे. या संपात राज्य सरकारी मध्यवर्ती कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष दिलीप कदम, जी ए कंठे, ए व्ही पवार, जे एस दुधळकर, डी एस निमजे, एस ए वाईकर, ए एम भुसारे, विजय घ्यार, पी एस गोटे, बी डी पांडे, एस बी नाईकनवरे, हरि पिसाळ, एम बी डाखोरे, बी व्ही काळबांडे, एस एन कदम यांच्यासह जिल्हा परिषद शिक्षक संघटनेचे पदाधिकारी, खाजगी शिक्षक संघटनांचे पदाधिकारी तसेच शिक्षक मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत.



**हिंगोली- येथील शासकीय विश्रामगृहात धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त नियोजन बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी छावाचे संस्थापक अध्यक्ष विनायक भिसे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी त्र्यंबकराव लोंढे, पप्पू चव्हाण, शशीकांत देशमुख, वाघ यांच्यासह जिल्ह्यातील शिवप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. छाया- विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### भगवान परशुराम जयंती साजरी



हिंगोली- अक्षय तृतीया दिवशी भगवान परशुराम जन्मोत्सव आदर्श कॉलेजकडे पाणी टाकीजवळ परिसरात भगवान परशुराम जन्मोत्सव साजरा करण्यात आला यावेळी सताळकर यांच्या हस्ते भगवान परशुराम यांच्या प्रतिमेस पुष्पमाला अर्पण करण्यात आली यावेळी संजय तोडेवाले, कांचंन तोडेवाले, शंकुंतला तोडेवाले,वेदांत तोडेवाले व धीरज शर्मा आधी उपस्थित होते. तसेच एन टी सी, निर्मल बेकरी समोर आरोग्य साधना होम्योपैथिक दवाखाना इथे भगवान परशुराम यांचा जन्मोत्सव तसेच भगवान बसवेश्वर महाराज यांचा जन्मोत्सव फार उत्सव व धूम धामानी साजरी करण्यात आले. यावेळी डॉ. शालिनी धीरज शर्मा यांनी भगवान परशुराम व भगवान बसवेश्वर यांची प्रतिमेस पुष्प माला व दीप प्रज्वलन करुन आरती करण्यात आली. यावेळी धीरज शर्मा, महेश मिटकरी, सौ चैताली मिटकरी, आर्यन शर्मा, अंशिका शर्मा, प्रियांका मिटकरी उपस्थित होते.

### हिंगोलीत गो सेवकांची आढावा बैठक

हिंगोली- गोमातेला राष्ट्रमातेचा दर्जा मिळावा व संपूर्ण देशात गोवंश हत्या कायमची बंद व्हावी, या पवित्र उद्देशाने देशभर राबविण्यात येणाऱ्या 'गो सम्मान आह्वान अभियाना'च्या पार्श्वभूमीवर हिंगोली येथे महत्त्वपूर्ण नियोजन बैठक पार पडली.येथील बद्रीनारायण मंदिरात या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. सर्व गोभक्त गोप्रेमी पुरुष व युवक इष्टमित्रांसह बैठकीस उपस्थित होते. या बैठकीमध्ये गो सम्मान अभियानाबाबत जनजागृती व सहभाग, दि. २७ एप्रिल २०२६, सोमवार रोजी होणाऱ्या देशव्यापी अभियानासाठी प्रत्येक गावातून जास्तीत जास्त संख्येने पुरुष, महिला व बालकांना आमंत्रित करण्याबाबत नियोजन, याअभियानाच्या समर्थनार्थ प्रत्येक गावातून जास्तीत जास्त नागरिकांच्या स्वाक्षऱ्या गोळा करण्याबाबत चर्चा करण्यात आली. दि. २७ एप्रिल रोजी देशातील ५४०० तहसील मुख्यालयांवर एकाच वेळी महामहिम राष्ट्रपती, पंतप्रधान, सर्व राज्यांचे मा. मुख्यमंत्री व राज्यपाल यांच्या नावे तहसीलदार किंवा उपविभागीय अधिकाऱ्यांमार्फत प्रार्थनापत्र सादर करण्याच्या नियोजनाबाबत चर्चा करण्यात आली.'गो सम्मान आढावा अभियान' हे संपूर्ण भारतात अत्यंत शिस्तबद्ध व शांततामय पद्धतीने राबवले आहे.

### ६९ वाहन चालकांविरूध्द कार्यवाही

हिंगोली- अवैध वाहतुक करणाऱ्या तसेच वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ६९ वाहन चालकांविरूध्द हिंगोली पोलिसांनी कार्यवाही करीत त्यांच्या कडून ७४ हजार ५० रूपयांचा दंड वसूल केला आहे.

# तळपत्या उन्हात परीक्षा, शिक्षक विद्यार्थ्यांच्या शोधात

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २१ एप्रिल**

हिंगोली जिल्ह्याचे तापमान ४० अंशाच्यावर पोहोचले आहे. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांना शाळेत परीक्षेला यावे लागत आहे तर दुसरीकडे परीक्षांची कामे आटोपल्यानंतर तळपत्या उन्हात शाळेतील शिक्षक विद्यार्थ्यांच्या शोधात गल्लोगल्ली आणि गावोगावी फिरत असतांना दिसत आहे.

यावर्षी शिक्षण विभागाने ५ ते ८ वीपर्यंत पॅटच्या परीक्षा दि ११ एप्रिल ते २२ एप्रिल या कालावधीत ठेवल्या. शाळेतील विद्यार्थी संख्या मोजण्यासाठी शिक्षण विभागाने विविध पथके तयार करून दि ११, १५ आणि २२ तारखेपर्यंत पटपडताळणी मोहीम युध्दपातळीवर राबवली. पट टिकवून ठेवण्यासाठी शाळेतील मुख्याध्यापकासह शिक्षकांची चांगलीच तारांबळ उडाली. मागील एक आठवड्यापासून जिल्ह्यात उन्हाचा पारा ४० अंशाच्यावर असूनही विद्यार्थ्यांना तळपत्या उन्हात परीक्षांना यावे लागत आहे. बाहेरगावाहून ये-जा करणाऱ्या विद्यार्थ्यांचे तर अगदी बेहाल झाल्याचे दिसत आहे.

दुसरीकडे शाळांमधील विद्यार्थी संख्या वाढावी यासाठी संस्थाचालकासह मुख्याध्यापक आणि शिक्षक कामाला लागले आहेत. इंग्रजी माध्यमांचा शाळा गल्लोगल्ली झाल्यामुळे शहरातील नामांकीत मराठी शाळांमधील शिक्षकांना भर उन्हात विद्यार्थी आणण्यासाठी वणवण भटकावे लागत असल्याचे दिसत आहे.

# तीनच दिवसात शासकीय रूग्णालयातील एमआरआय मशीन पडली बंद



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २१ एप्रिल**

जिल्हा शासकीय सामान्य रुग्णालयातील एमआरआय मशीन तीनच दिवसात बंद पडल्यामुळे रूग्णांची हेळसांड होत आहे. शासकीय रूग्णालयाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

येथील शासकीय रूग्णालयात रुग्णांच्या होणाऱ्या गैरसोयीत दिवसेंदिवस वाढ होत आहे परंतु रुग्णालय प्रशासन हे कुंभकर्ण झोपेत असल्यामुळे रुग्णांचे प्रचंड हाल व गैरसोय होत आहे

मागील काही महिन्या पासून रुग्णालयात बंद पडलेले एम आर आय मशीन सामाजिक कार्यकर्ते निनाजी कांडेलकर यांच्या सतत पाठपुराव्यामुळे चालू झालेली एम आय आर मशीन अवघ्या तीनच दिवसात बंद करण्यात आलेली आहे. तसेच ऑपरेशन रुग्णालयातील ऑपरेशन वार्डातील फरशा या उखळलेल्या आहेत. त्यामुळे काही वेळेस रुग्ण व कर्मचारी त्या फरशात पाय अडकून पडत आहेत. याची सुद्धा दखल रुग्णालय प्रशासन घेत नाही वारंवार तक्रार केल्यानंतरही अद्याप यावर कोणताही तोडगा निघाला नाही.

महाराष्ट्र राज्य सरकारकडून विविध योजना व सवलती सामान्य रुग्णाला मिळत असून फक्त सामान्य रुग्णालयातील प्रशासन आपल्या भ्रष्ट कारभारामुळे त्या राबविण्यात सततअयशस्वी ठरत आहे. सामान्य जनतेकडून रुग्णालय प्रशासनाबाबत अतिशय संताप व्यक्त करण्यात येत आहे. त्याचा कधीही उद्रेक होऊन दवाखान्यामध्ये हिंसाचार घडू शकतो वेळीच जिल्हाधिकाऱ्यांनी या सर्व प्रकाराकडे लक्ष घालावे अशी मागणी करण्यात येत आहे.

# भोगाव शिवारात ५ हजार आंब्याची झाडे जोपासली- शेतकरी प्यारेवाले



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २१ एप्रिल**

शहरालगत असलेल्या भोगाव परिसरात सध्या निसर्गाचा एक आगळावेगळा आविष्कार पाहायला मिळत आहे. येथील प्रयोगशील शेतकऱ्यांनी मोठ्या कष्टाने जोपासलेल्या आमराईला आता फळांचा बहर आला असून, जवळपास ५ हजार आंब्याच्या झाडांना शेकडो आंबे लगडले आहेत. मात्र, या निसर्गरम्य शेती परिसरात आता 'पिंपळ खुटा' तलावाचे काम होत असल्याने ही आमराई चर्चेत आली आहे.

भोगाव शेत शिवारामधील गट नंबर १२५, १२६, १४४ आणि १६३ मध्ये शेतकऱ्यांनी केवळ आंबेच नव्हे, तर चिंचेच्या झाडांचीही [illegible] म्हणजे 'प्यारेवाले' परिवारातील अनेक शेतकऱ्यांनी एकत्र येत ही फळबाग फुलवली आहे. सध्या प्रत्येक झाड आंब्यांनी लगडलेले असून हा परिसर पूर्णपणे हिरवागार झाला आहे.या आमराईमध्ये खालील शेतकऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले असून त्यामध्ये शेख बुऱ्हाण शेख मुन्नू प्यारेवाले, खालिद बुऱ्हाण [illegible] मुन्नू प्यारेवाले, मनान कासिम प्यारेवाले, जमील इमाम प्यारेवाले,मौला चंदू प्यारेवाले यांनी परिश्रम घेतले आहेत.

याच शेती परिसरात आता पिंपळ खुटा तलावाचे काम सुरू होत आहे. एकीकडे फळांनी लगडलेली ही आमराई आणि दुसरीकडे होऊ घातलेला तलाव, यामुळे भविष्यात या भागातील जलस्तर वाढण्यास मदत होईल, अशी आशा व्यक्त केली जात आहे. शेतकऱ्यांनी लावलेली ही ५ हजार झाडे पर्यावरणाचे रक्षण करण्यासोबतच आर्थिक उत्पन्नाचा मोठा स्रोत ठरत आहेत. सध्या या आमराईतील आंब्यांचे वैभव पाहण्यासाठी परिसरातील नागरिक उत्सुकता दर्शवत आहे.

# बालविकास प्रकल्प अधिकाऱ्याला शिवीगाळ

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २१ एप्रिल**

पदोन्नतीच्या कारणावरून औंढा येथील बालविकास प्रकल्प अधिकारी महिलेस शिवीगाळ करून शासकीय कामास मज्जाव करणाऱ्या अंगणवाडी मदतनीसवर अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार औंढा नागनाथ तालुक्यातील जवळाबाजार येथील अंगणवाडीमध्ये मागील १० वर्षापासून कल्पना यंबल या मदतनीस म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी पदोन्नतीसाठी पात्रताधारण केल्यानंतर काही दिवसांपूर्वी पदोन्नतीचा प्रस्ताव औंढा नागनाथ बालविकास प्रकल्प अधिकारी कार्यालयामार्फत जिल्हा परिषदेकडे पाठविला होता. यावेळी अधिकाऱ्यांनी औंढा नागनाथ तालुक्यात पदोन्नतीसाठी पद रिक्त झाल्यानंतर तातडीने पदोन्नती देण्याचे आश्वासन दिले होते.

सोमवारी दुपारी बालविकास प्रकल्प अधिकारी कार्यालयात प्रकल्प अधिकारी संगीता इंगळे या काम करीत असतांना अंगणवाडी सेविका कल्पना तेथे आल्या. मला पदोन्नती का देत नाही असे म्हणत वाद केला. यावेळी इंगळे यांनी समजूत घालण्याचा प्रयत्न केला परंतु कल्पना यांनी संगीता इंगळे यांना शिवीगाळ करून काम करण्यास मज्जाव केला. या प्रकारामुळे एकच गोंधळ उडाला. याप्रकरणी संगीता इंगळे यांच्या तक्रारीवरून औंढा नागनाथ पोलिसात अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे.